IRBK-0100111

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे

विषय नाटक

दा क्र १११

IRBK-0100111

IRBK-0100111

श्री ग्रंथ संग्रहालय
नं. 722
991

IRBK-0100111

मराठी ग्रंथ सं…
१६३०५

# पुरुषांचें बंड.

पांच अंकी गद्य नाटक.

लेखक,

**सौ. गिरिजाबाई केळकर.**

गृहिणीभूषण व स्त्रियांचा स्वर्ग
या पुस्तकांची कर्त्री.

(सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.)

हें पुस्तक घर नंबर ४३४ ठाकुरद्वाररोड–मुंबई, येथें 'इंदुप्रकाश' छापखान्यांत
रा० रा० दामोदर सांवळाराम यंदे यांनीं मालकाकरितां छापिलें व
सौ० गिरिजाबाई केळकर यांनीं जळगांव येथें प्रसिद्ध केलें.

222
7

## पात्रें.

विकारानंद.—साधु.
राजा.—एक राजा.
युवराजा.—त्याचा मुलगा.
प्रधान.—राजाचा प्रधान.
मानसिंग.—एक पहिल्या दर्जाचा सरदार.
इतर पात्रें.—शिवाय सरदार, डॉक्टर, गवई, ब्राह्मण, शिपाई-सेवक वगैरे.

---

## स्त्रीपात्रें.

सरस्वतीदेवी.—बायकांना उपदेश करण्याकरितां निघालेली विद्वान् स्त्री.

राणी.—
कुमुदिनी.—मानसिंगाची कन्या.
सरला. } —तिच्या मैत्रिणी.
शांता. }
यमुना.—गावांतील एक सुशिक्षित स्त्री.
जानकीकाकू.—एका भिक्षुकाची बायको.
डॉक्टरीण.—भगिनीमंडळांतील स्त्री डॉक्टर.
इतर पात्रें.—शिवाय कलावंतिणी, स्त्रीनोकर, दासी वगैरे.

स्थळ:—हिंदुस्थानांतील एक शहर.

---

# उपोद्घात

मला लिहिण्यावाचण्याची गोडी लागल्यानंतर आपल्या समाजस्थितीसंबंधीं विचार करितां माझ्या मनांत पुष्कळ वेळां असें येई कीं, आपल्या समजाचें हल्लींचें जें करमणुकीचें साधन—नाटक त्या मार्गानें समाजावर कांहीं तरी परिणाम करणारीं अशीं सामाजिक नाटकें तयार झालीं पाहिजेत. कारण बोधदायक अशीं पुस्तकें कितीही चांगल्यातऱ्हेनें लिहिलीं तरी तीं पुस्तकें मुद्दाम काळजीपूर्वक घेऊन वाचीत बसणारी अशी मंडळी आपल्यामध्यें फार थोडी. शिवाय करमणुकीच्या साधनांतील जें मुख्य साधन नाटक त्यांत जीं नाटकें करितात, तीं बहुतेक ऐतिहासिक. ह्यामुळें विशिष्ट बुद्धीचीं माणसें वगळल्यास साधारण जनसमूहाला त्यापासून कांहीं फायदा होत नाहीं. तेव्हां सद्यःस्थितीचें चित्र योग्यरीतीनें दाखवून पुढें कितपत सरकतां येईल, हें दाखविणारीं नाटकें आपल्यांत पाहिजेत, असें मला वाटे पण तें काम मला स्वतःला कांहीं चांगलेंसें करतां येणार नाहीं, असें वाटत असल्यामुळें मी स्वतः त्या बाजूनें कधीं प्रयत्न करून बघण्याचें मनांत आणिलें नव्हतें. पण यंदाच्या मे महिन्यांत आम्हीं भगूर मुक्कामीं असतांना आमचे एक स्नेही आमच्या येथें आले होते, तेव्हां एकंदर सामाजिक विषयासंबंधानें बोलणें निघाले असतांना कांहीं कांहीं गोष्टी पुरुषांना करतां येण्याजोग्या असूनसुद्धां ते करीत नाहींत हें मी त्यांना दाखविलें, व स्त्रियांमधील ऊणीवीस पुरुष कारणीभूत आहेत, असें म्हटलें. ते मला सहज विनोदानें म्हणाले कीं, ' वहिनी, तुम्ही तर उलटें आम्हालाच बंडखोर ठरवलेंत ! तर याविषयीं तुम्ही एखादें सामाजिक नाटकच ल्याहना ?. तेव्हां मी त्यांना सहज म्हटलें कीं, ' बरं तर, मी जेव्हां नाटक ल्याहावयास लागेन तेव्हां पहिल्यानें

' पुरुषांचें बंड ' हेंच नाटक लिहीन ! अशा तऱ्हेनें विनोदांत झालेल्या बोलण्यानें मनाला एक प्रकारची उत्सुकता येऊन मी नाटक लिहून पहाण्याचा बेत केला आणि दुसऱ्या १५ दिवसांत हें नाटक तयार झालें. पण माझा हा प्रथम प्रयत्न, त्यांतून विषय सामाजिक; तेव्हां तें करमणुकीच्या व प्रयोगाच्या दृष्टीनें कसें झालें आहे, तें पहाण्याकरितां श्री. रा. श्री. कृ. कोल्हटकर यांस सांगितलें. त्यांनीं तें समग्र वांचून पाहून प्रयोगरूपानें रंगभूमीवर आणण्यास योग्य आहे, असें सांगितलें. ह्याच सुमारास आमची बदली नाशकाहून जळगांवास झाली. तेव्हां येथें श्रीभारत–नाटक–मंडळी होती, त्यांनीं चांगली मेहनत घेऊन तें एक महिन्यांत रंगभूमीवर आणलें. याचा पहिला प्रयोग येथें ता. ९–८–१३ ला झाला, तो पाहून कांहीं स्नेह्यांनीं योग्य त्या सूचना केल्या व ज्यांना ह्याचें ' पुरुषांचें बंड ' हें नांव ऐकून भय वाटत होतें, त्यांची खात्री झाली कीं, ह्यांत पुरुषांची निंदा न करितां हल्लींच्या काळांतील त्यांचीं कर्तव्यें व चुका शक्य तितक्या सौम्य शब्दांत दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

कोणच्याही गोष्टींत मतभेद हा असतोच पण हल्लींच्या आपल्या स्थितींत दरेक माणसाला व्यक्ती ह्या नात्यानें करितां येण्याजोग्या पुष्कळ गोष्टी आहेत, त्या न करितां ( कांहीं विशिष्ट व्यक्ती कितीतरी श्रम करीत आहेत; पण अशांची संख्या फार थोडी आहे. ) पुष्कळांनां स्त्रिया सुशिक्षित असल्याशिवाय आम्हांस सामाजिक सुधारणेंत व राष्ट्रोन्नतींत पुढें जातां येत नाहीं, असें म्हणतानां ऐकूं येतें व त्या सर्वांचा दोष ही शिष्ट मंडळी बायकांवर लादते. बायका अज्ञान असतील; नव्हे आहेतही. पण हा कांहीं त्यांचा उपजत दोष नाहीं. आपल्या आपण दुसऱ्याच्या साहाय्याशिवाय पुढें येणाऱ्या कांहीं व्यक्ती असतील; पण त्या फार थोड्या. सर्वसाधारण पुढें ढकलावयास कोणी तरी लागतें व तें काम ज्यांनां त्या अज्ञ स्त्रियांपेक्षां जास्त समजतें आहे, त्या पुरुषवर्गाचें आहे. जर माझा बंधुवर्ग प्रेम, सदयता, व सदिच्छा धरून आपल्या कुटुंबांतील स्त्रीवर्गास सुधारण्याचा प्रयत्न करील तर शेंकडा ५० स्त्रिया तरी खास सुशिक्षित होतील. पण तें न करतां किंवा त्या संबंधानें आपलें कांहीं कर्तव्य आहे ह्या संबंधाची जाणीव सुद्धां न ठेवतां, ते आपला काळ आपल्या ठराविक

व्यवसायांत घालवितात व वेळ आली असतां स्त्रियांना दोष देतात. तसेंच अशिक्षित बायकांच्या मदतीशिवाय करतां येण्याजोग्या किती तरी गोष्टींची जरूर आज हिंदुस्थानाला आहे, त्यापैकीं त्यांनीं स्वत: किती केलें आहे. व काय करावयास पाहिजे, ह्यांचे थोडेसें दिग्दर्शन ह्या पुस्तकांत आहे. सारांश, कोणच्याही तऱ्हेनें पुरुषानां म्हणजे माझ्या पुरुषबंधुवर्गाला कटु-शब्द न बोलता, किंवा त्यांचा अपमान न करितां, हल्लींच्या स्थितींतील स्त्रिपुरुषांचीं कर्तव्यें व बायकांचा आदर व मान ह्या संबंधाची थोडीशी जाणिव देण्याचा, प्रस्तुत पुस्तकांत नाटकरूपानें प्रयत्न केला आहे; तो कितपत सिद्धीस गेला आहे, तें पाहाण्याचें काम वाचकांचें आहे. येथें हेंही सांगून ठेविलें पाहिजे कीं, नाटकांतिल विषय सामाजिक असलेमुळें मत वैचित्र्य असणारच, तरी सूज्ञवाचकांनीं नाटकाची रचना, व नाटकांतील विचारासंबंधी मतभेद या दोहोंविषयीं अगदीं पृथकपणें विचार करणें, माझ्या मतें अवश्य आहे.

हें नाटक बारकाइनें पाहून ज्या मित्रांनीं सहानुभूतिपर सूचना केल्या त्या छापण्यापूर्वीं शक्य तितक्या अमलांत आणिल्याच आहेत. तथापि विद्वान वाचकांच्या हातीं हें नाटक अजून पडावयाचें आहे व नाटक कसास लावणाऱ्या निकषरूपी पुण्यपत्तनीं व मुंबापुरीस ह्याचे प्रयोग अद्याप व्हावयाचे आहेत, ह्या विचारांची जागरूकता माझे मनांत धास्ती उत्पन्न करीत आहे.

माझ्या विनंतिला मान देऊन आपला अमूल्य वेळ खर्च करून श्री. रा. रा. श्री. कृ. कोल्हाटकर ह्यांनीं ह्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली, ह्याबद्दल मी त्यांची फार फार आभारी आहे. तसेंच रा. रा. दा. सां. यंदे, ह्यांनीं हें पुस्तक छापून बाहेर पाडण्यास जी सहानुभूतीपूर्वक मतद, केली त्याबद्दल त्यांचीही मी फार आभारी आहे, शेवटीं ज्या जगच्चालकाच्या कृपेनें ही कृती माझ्या हातून निर्विघ्नपणें पार पडली, त्याचे आभार मानून मी हा उपोद्घात पुरा करतें.

ता. १ डिसेंबर १९१२.
मनोहरभुवन, जळगांव.

गिरिजाबाई केळकर.

# प्रस्तावना.

सौ. गिरिजाबाई केळकर या आजपर्यंत निबंधकर्त्री व्याख्यात्री व लघुकथा–लेखिका या नात्यांनीं महाराष्ट्रीयांस परिचित होत्या. आजपर्यंत त्यांजकडून नाटकलेखनाचा प्रयत्न झाला नव्हता. प्रस्तुत नाटक त्यांनीं लिहिलेलें पहिलें नाटक होय; व त्याबद्दल पुरुषवर्गीय नाटककारांनीं व प्रेक्षकांनीं त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करणें जरूर आहे, पण या नाटकाची व्यक्तिदृष्ट्या जी योग्यता आहे, तिजपेक्षां मराठी वाङ्मयाच्या इतिहासाच्या दृष्टीनें निराळ्या प्रकारची व पुष्कळपटीनें अधिक योग्यता आहे. कारण हें नाटक त्याच्या कर्त्रीचें जसें पहिलें नाटक आहे. त्याप्रमाणें मराठी वाङ्मयांतही स्त्रीनें लिहिलेलें व रंगभूमीवर प्रयोगरूपानें आलेलें पहिलेंच गद्य-नाटक आहे.

मनुष्यजाति निर्माण झाल्यापासून स्त्रीपुरुषांमध्यें जो श्रमविभाग सुरू आहे, त्यामुळें म्हणा किंवा त्यांच्या नैसर्गिक शरीररचनेमुळें म्हणा, पुरुषांमध्यें विचारशक्तीची व स्त्रियांमध्यें मनोवृत्तीची वाढ विशेष प्रमाणानें असलेली दिसून येते, व यामुळें शास्त्रीय ग्रंथरचनेस पुरुषांची व ललित वाङ्मयरचनेस स्त्रियांची मनोरचना स्वाभाविकपणेंच अनुकूल असते. इतर नियमांप्रमाणें याही नियमास अपवाद असतील; नाहीं असें नाहीं. पण त्या अपवादांची संख्या इतकी अल्प आहे व त्यांपैकीं विशिष्ट परिस्थितींमुळें ज्यांचें वैलक्षण्य उत्पन्न झालें आहे, अशा अपवादांची संख्या इतकी मोठी आहे कीं, अवशिष्ट अपवादामुळें मुख्य नियमांस बाध येण्याऐवजीं बळकटीच येते, असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. या निय-

मास अनुसरून मॅडमडीस्टील या प्रसिद्ध ग्रंथकर्त्रींप्रमाणें जेथें असाधारण पौरुष बुद्धिमत्तेची एक अपवादरूप स्त्री आढळून येते तेथें वाचकांच्या मनोवृत्ति हलवून सोडणाऱ्या जेन ऑस्टेन, मिस एजवर्थ, शार्लोट ब्रॉंट, जार्ज सँड जार्ज इलियट, मिसेस स्टो यांसारख्या शेंकडों स्त्रिया दिसून येतात. जेन ऑस्टेन इची तर स्वभाववर्णनांत पदवी मेकॉलेसारख्या मार्मिक टीकाकारानें शेक्सपिअरच्या खालोखाल असल्याचें लिहिलें आहे. मिसेस स्टोच्या 'टॉमकाकाची झोंपडी' या कादंबरीनें अमेरिकेंतील लोकमत गुलामांच्या व्यापाराविरुद्ध इतकें क्षुब्ध करून सोडिलें कीं, परिणामीं तो व्यापार नामशेष होऊन गेला. मिसेस हेन्रीवुड, मेरी कॉरेली इत्यादि अगदीं अलीकडील कादंबरी कर्त्यांनींही तीच परंपरा चालू ठेविली आहे. नाटकरचनेंत मात्र स्त्रियांनीं अजून फारशी आघाडी मारलेली दिसत नाहीं. याचें कारण कांहीं अंशीं प्रयोगापूर्वी तालमींस हजर राहण्याची आवश्यकता व नैसर्गिक शालीनतेमुळें स्त्रियांची त्या कामीं असलेली अक्षमता हें कांहीं अंशीं मोठ्या जनसमुदायापुढें एकसमयावच्छेदेंकरून येणाऱ्या कृतीबद्दल यांजकडून होणाऱ्या संभावनेबद्दल शंका, हें असावें. हीं कारणें आड आलीं नसतीं व स्त्रियांस पुरुषांप्रमाणें पूर्वीपासून नाटक लेखनास योग्य अवसर मिळाला असता तर पहिल्याप्रतीचा नाटककार म्हणून आज शेक्सपियरची जी कीर्ति आहे, ती त्याच्या वाट्यास आली असती कीं काय याची शंकाच आहे.

आपल्या महाराष्ट्रांत वाङ्मयांत भर घालण्याचे कामीं स्त्रियांकडून उपक्रम झाला तो पंडिता रमाबाई व सौ. काशीबाई कानिटकर यांजकडून झाला. य पैकीं पूर्वोक्त बाइ असामान्य बुद्धिमतेबद्दल व संयुक्त संस्थान वर्णनपर एका ग्रंथाबद्दल प्रसिद्ध असून उत्तरोक्त ग्रंथकर्त्रींचीं 'डॉ० आनंदीबाईचें चरित्र,' 'रंगराव,' 'चांदण्यांतील गप्पा' हीं पुस्तकें महाराष्ट्रीय वाचकास परिचित आहेत. अलीकडे श्री. रमाबाई रानडे, सौ. सरस्वतीबाई भिडे, सौ. सिंधुसुता, सौ. शारदाबाई परांजपे, कुमारी आनंदी इत्यादि अनेक लेखनपटु स्त्रिया ललितवाङ्मयांत चांगल्याप्रतीची भर टाकीत आहेत. गेल्यावर्षापर्यंत स्त्रीनें लिहिलेलें संगीत नाटक रंगभूमिवर आलें नव्हतें; ती उणीव 'दामिनी' नाटकानें भरून काढिली;

व यावर्षी महाराष्ट्र स्त्रीनें लिहिलेलें व रंगभूमीवर आलेलें पहिलें गद्य नाटक प्रसिद्ध होत आहे.

वर प्रकट केलेल्या विचारांचा जसा प्रस्तुत नाटकाच्या कर्तृत्वाशीं तसा त्याच्या विषयाशींही निकट संबंध आहे. या नाटकांत राजा व प्रजा यांचा परस्परसंबंध जरी आला आहे, तरी हें नाटक राजकीय नाहीं; यांत जरी समाजांतील कुटुंबरूप भिन्न भिन्न घटकावयवांचा परस्पर संबंध किंवा सामाजिक म्हणून आजकाल प्रसिद्ध असलेल्या प्रश्नांचा संबंधही आलेला नसल्यामुळें, तें सामाजिक या नांवासही यथार्थपणें पात्र होईल कीं काय याची शंकाच आहे. या नाटकांत जातिभेदाचा विषय आहे. परंतु तो जातिभेद ब्राह्मणशूद्रामधील भेदाप्रमाणें कृत्रिम किंवा सधन–निर्धनामधील भेदाप्रमाणें भंगुरस्वरूपाचा नाहीं. तो जातिभेदाच्या इतर प्रकारांप्रमाणें जन्मसिद्ध जरी असला तरी तो नैसर्गिक व शाश्वत असल्यामुळें त्यांहून भिन्न स्वरूपाचा आहे. तो अनादि असून मनुष्यांतल्या प्रमाणें उद्भिज सृष्टींतही दिसून येतो. हा जातिभेद म्हणजे पुरुष व स्त्री यांमधील भेद होय. या देशांतील ब्राह्मण व शूद्र किंवा अमेरिकेंतील गोरे व निग्रो यांमधील भेद कालांतरानें पूर्णपणें विलयास जाण्याची खात्री आहे. पण स्त्री व पुरुष या जातीमधील भेद शतकसहस्रांतीही नाहींसा होण्याची आशा ( अथवा भिति म्हटल्यास विशेष शोभेल. ) बाळगावयास नको.

पण हा जातिभेद जरी नैसर्गिक व शाश्वतस्वरूपाचा असला तरी त्यांत कृत्रिम व भंगुर भाग मुळींच नाहींत असें मात्र म्हणतां यायचें नाहीं. या दोन जातींमधील नैसर्गिक भेदाशी ज्यांचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं, असें मनुष्यकृत अनेक भेद त्याच्याशीं संलग्न होऊन काल-प्रभावानें दृढमूल होऊन बसले आहेत. स्त्रियांना पुरुषांप्रमाणें मत देण्याचा अधिकार नाहीं असा पाश्चात्य देशांत निर्बंध असल्यामुळें त्या प्रश्नावर तिकडे भयंकर रण माजून राहिलें आहे. आपल्या देशांत पुरातन कालापासून स्त्री ही स्वातंत्र्यास व शिक्षणास पात्र नाहीं असा नियम अप्रतिबद्धपणें चालत आला होता. तो कुठें अगदीं अलीकडे शिथिल होऊं लागला आहे. मुसलमानी देशांतून तर स्त्रियांनीं पडदपोशींतच राहिलें पाहिजे, असा कडक निर्बंध आहे. आफ्रिकेंतील हपेशी देशांत

एखादा राजा किंवा सरदार मेल्याबरोबर सती जाऊन त्याच्या पारलौकिक सौख्याची तर्तूद करणें हें त्याच्या जनानखान्याचें आवश्यक कर्तव्य होऊन बसलें आहे. ज्या देशांत स्त्रियांपेक्षां पुरुषांस अधिक स्वातंत्र्य व हक्क आहेत, त्या देशांचा हा प्रकार झाला. याच्या उलटही प्रकार कांहीं देशांत दिसून येतो. अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांतील बऱ्याच पुरुषांकडे शेतकीं उदीम इत्यादि कनिष्ठ प्रतीचीं कामें असून शिक्षणसंबंधीं व इतर प्रतिष्ठित धंदे स्त्रियांनीं आटोपले आहेत. ब्रह्मदेशांत कुटुंबांतील महत्त्वाचीं कामें स्त्रियांकडे सोपविलेलीं असून किरकोळ कामें पुरुषांनीं उचललेलीं आहेत. दक्षिण हिंदुस्थानांतील एका जातींत कुटुंबाचें कर्तृत्व स्त्रियांकडे असून पुरुषांचा दर्जा गौण मानिलेला आहे. याप्रमाणें स्त्रीपुरुषांच्या हक्कांसंबंधानें व जबाबदाऱ्यांसंबंधानें पृथ्वीवरील देशांत कमी अधिक वैषम्य दिसून येतें. ज्या देशांत शिक्षणाचा व त्याबरोबर व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेचा प्रसार होत आहे त्यांमध्यें स्त्रीपुरुषांच्या हक्कांची व जबाबदाऱ्यांची प्रवृत्ति शक्य तितकी समसमान होण्याकडे दिसून येते. दंपत्यरूपी तराजूच्या परड्यांत याप्रमाणें पासंग पडण्याचें काम सुरू असतां कांटा कधीं एका बाजूस तर कधीं दुसऱ्या बाजूस जोरानें झुकण्याचा अनेकदां प्रसंग येतो. अशा प्रसंगीं एका पक्षाकडून ' स्वातंत्र्याचा लेश नसे कधिं बंदिवास ठरला ' याप्रकारचे व दुसऱ्या पक्षाकडून ' तिळहि नसे स्वातंत्र्य तुम्हां तों इतुका अनर्थ लोकीं ' या प्रकारचे उद्गार निघूं लागतात. स्त्रीपुरुषांमधील हें वैर त्यांच्या उत्पत्ती इतकेंच पुरातन असून त्याचे लहान प्रमाणावरील मासले प्रत्येक कुटुंबांत प्रतिदिनीं पहावयास सांपडतात. संसाररथाची दोन्ही चक्रें अगदीं एकाच आकाराचीं नसल्यास तो रथ एकारून अस्निग्ध चक्राकडून कुरकुरीस सुरवात होते, हा प्रत्येक संसारी मनुष्याचा अनुभव आहे. गृहकृत्यांत मग्न असलेली पत्नी हांकेसरशी धांवत आली नाहीं कीं, लागलीच पतीची तब्येत गरम होऊन ' या बायका आतां डोक्यावर बसायला लागल्या ' असे त्याच्या मुखांतून उद्गार निघावयास लागतात; उलट त्यानें जर एखादेवेळीं संसाराच्या विवंचनेंत तिचें बोलणें मनावर घेतलें नाहीं तर, ' आम्हां बायकांचा जन्म म्हणजे निव्वळ गुलामगिरी ' असा तिजकडून ताशेरा झडूं लागतो. विवाहशृंखलेनें बद्ध

झालेले हे जोडकैदी जरी याप्रमाणें परस्परांविरुद्ध बंड उभारण्यास नेहमीं निमित्तच पहात असतात तरी विधात्यानें त्यांजमध्यें जी आकर्षणशक्ति ठेविली आहे, तिजमुळें तीं बंडें पुष्कळदां गर्भावस्थेंतच विलयास जातात किंवा तीं कांहींवेळ टिकलींच तर पुढें होणारा सलोखा तुलनेनें विशेष सुखकर भासण्यास मात्र कारणीभूत होतात. अशा प्रसंगीं उभयतांमध्यें जो तहनामा होतो, त्याच्या अटी एका पक्षानें दुसऱ्या पक्षास करभारादाखल एखादा पाळपट्टा किंवा चंद्रकळा नजर करावी, यापेक्षां विशेष जबर नसतात. व या तहनाम्यावर अखेरीस बहुधा सुंदर अपत्यरूप मोहोर करण्यांत येऊन त्यास सनदशीर स्वरूप प्राप्त होतें.

सांप्रतकाळीं इंग्लंड देशांत मताभिलषी स्त्रियांनीं पुरुषांविरुद्ध जें बंड उभारिलें आहे, त्यास बरेंच गंभीर स्वरूप आलेलें दिसतें. 'मदायत्तंतु पौरुषम्' हें ब्रीद पाळण्याचें ह्यांनीं जसें कांहीं हातांत कंकणच बांधिलें आहे. आघाताच्या तीव्रतेच्या मानानें तेथील पुरुषवर्गाकडून प्रत्याघातही बऱ्याच नेटानें करण्यांत येत आहे. या संग्रामाचा परिणाम स्त्रियांना अधिक हक्क मिळण्यांत होवो किंवा त्यांच्या बंधनांस दृढता येण्यांत होवो, कसाही झाला तरी त्यानें स्त्रीपुरुषांत कायमचें वैर उत्पन्न होण्याची भीति नाहीं. कारण ज्याप्रमाणें अंतःस्थ कलहामुळें एकमेकांत झगडणारे वीर परचक्र येतांच त्यास तोंड देण्याकरितां तो कलह विसरून जातात, त्याप्रमाणें परस्परांशीं स्पर्धा करणारे स्त्रीपुरुषही त्या स्पर्धेची मनुष्यनाशापर्यंत मजल येण्याची चिन्हें दिसूं लागतांच आत्मसंरक्षणार्थ पूर्ववत् स्नेहभावानें नांदूं लागतील, अशी खात्री आहे.

स्त्री व पुरुष यांस आपापल्या जातीचा अभिमान असणें स्वाभाविक आहे; व त्यास अनुसरून प्रत्येक जातीकडून आपल्यापक्षाचें मंडन करून दुसऱ्या जातीचा पाडाव करण्याचा प्रयत्नही करण्यांत यावयाचाच. स्त्रियांनीं स्थापिलेल्या एका स्वतंत्र राष्ट्राचा बीमोड पुरुषांकडून झाल्याबद्दल जी एक अत्यंत सुरस पौराणिक कथा आहे, तिच्या आधारें महाराष्ट्रांतील एका कुशल नाटककारानें 'बायकांचें बंड' या नांवाचें रसभरित नाटक लिहिल्याचें वाचकांस माहित आहेच. पुरुषांनीं रूपाच्या व पराक्रमाच्या बळानें स्त्रियांवर मिळविलेल्या विजयाचें पुरुषवर्गीय कारागिरानें आपलें

कौशल्यसर्वस्व खर्च करून रंगविलेलें चित्र पुरुषांमध्यें तरी अत्यंत लोकप्रिय व्हावें यांत नवल नाहीं. रा. रा. खाडिलकरांनीं पुरुषांची बाजू जितकी चांगली सजविली आहे तितकीच एखाद्या कुशल नाटककर्त्रीकडून स्त्रियांची बाजू पुढें येणें आवश्यक होतें- सौ. गिरजाबाईचा नाटकरचनेवर मुळींच व्यासंग नसल्यामुळें ' बायकांच्या बंडाच्या ' तोडीचें नाटक लिहिणें त्यांस जवळ जवळ अशक्यच होतें. परतु स्वीकृत-कार्यातील अडचणींना न भितां व अनुभवाची उणीव उत्साहानें भरून काढून त्या आपल्या भगिनींची नाटकाच्या रूपानें तरफदारी करण्यास सरसावल्या या त्यांच्या धैर्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. प्रस्तुत नाटकाच्या संविधानकाचें शेक्सपियरच्या एका नाटकाच्या कथानकाशीं बरेंच साम्य आहे; नाटकाचा विषयच अत्यंत चित्ताकर्षक असल्यामुळें त्याच्या संविधानकाशीं इतर कित्येक नाटकांचींही संविधानकें सदृश असतील. परंतु प्रस्तुतनाटकाची स्फूर्ति व्हावयास ' बायकांचें बंड ' हेंच नाटक कारणीभूत झाल्याचें त्याच्या नांवावरूनच उघड होत आहे.

' बायकांचें बंड ' हें नाटक कर्त्यानें भाषालंकारांनीं उत्तमरीतीनें नटविलें आहे व चटकदार प्रसंगांनीं मनोवेधक केलें आहे. ' पुरुषांच्या बंडांत' स्त्री सुलभ अलंकार-प्रियता फारशी दृग्गोचर होत नाहीं;व नाटकशास्त्रांतील मार्मिकांस त्यांत अनेक किरकोळ दोषही आढळून आल्यास नवल नाहीं. तथापि या नाटकांत ' बायकांच्या ' बंडातल्या प्रमाणें रूपावर व पराक्रमावर भिस्त ठेविली नसून 'पुरुषा 'च्या बंडाचा मोड नाटककर्त्रीस व एकंदर स्त्रीजातीस शोभणाऱ्या भूतदयेमुळें व कर्तव्यनिष्ठतेमुळें झालेला दाखविला आहे. हा यांतील विशेष गुण त्यांतील यच्चयावत् दोषांस पूर्णपणें लोपवून टाकण्यासारखा आहे. रसिकांचें मतही असेंच पडेल, अशी आशा आहे.

सौ. गिरिजाबाई केळकर या वाङ्मयसेवेसाठीं प्रसिद्ध असलेल्या एका कुटुंबांतील आहेत. या कुटुंबांतील एका सुप्रसिद्ध व्यक्तीनें रंगभूमीवर सदाशिवरावांची गादी फसवेगिरीनें बळकाविणाऱ्या तोतयाचें बंड मोडण्याचें श्रेय घेतलें आहे. याच कुटुंबांतील दुसऱ्या एका व्यक्तीकडून रंगभूमीवर स्त्रियांना त्यांच्या पदावरून हुसकावण्याचा दुःसाध्य हेतु धरून स्वतःची

फसवणूक करूं पाहणाऱ्या पुरुषांचें बंड मोडण्याचा सुयोग यावा, ही गोष्ट अपूर्वच म्हटली पाहिजे.

विद्वान् व रसिक पतीच्या उत्तेजनपर सहानुभूतीनें स्त्रियांस फारसें पुस्तकीशिक्षण न मिळतांही किती गोष्टी साधितां येतात, याचे सौ. गिरिजाबाई केळकर या एक उत्तम उदाहरण होत. त्यांजकडून उत्तरोत्तर यापेक्षांही सरस कृति निर्माण होऊन वाङ्मयाची व त्यांच्या भगिनीवर्गाची उत्तम सेवा होवो. अशीच त्यांच्या व्यवसायबंधूंचीं दृढ आशा आहे. ही आशा अनाठायीं व निराधार नाहीं. याचें उत्तम प्रत्यंतर ही प्रस्तावना पुरी होण्यापूर्वीं त्यांनीं दुसरें एक सरस नाटक लिहून तयार केलें आहे, हें होय. कर्त्रींचीं हीं दोन्ही अपत्यें चिरायु होवोत. अशी इच्छा प्रदर्शित करून हा प्रस्तावना लेख संपवितो.

खामगांव } श्री. कृ. कोल्हटकर.
ता. १८-११-१९१३.

ग्रा. २२२
र. नं. ४६३६ २५/१०/२०
मराठी ग्रंथ संग्रहालय

# पुरुषांचें बंड.

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

( पर्णकुटिकेंत एक संन्यासी बसला आहे, असा पडदा उघडतो ).

**विकारानंद**—(स्वगत) सच्चिदानंद ! सच्चिदानंद ! सच्चिदानंद ! काय चमत्कार आहे? आज मी इतके दिवस सारखी खटपट करितों आहे, पण हे मूढ जन अद्यापि समजत नाहींत; व या क्षणभंगुर मृत्युलोकाच्या विषयलालसेस बळी पडतात; आणि आपल्या जन्माचें मातेरें करून घेतात व शेवटीं शंकराचार्यांनीं म्हटल्याप्रमाणें 'पुनरपि जननं, पुनरपि मरणं' अशी यांची स्थिति होते. आधीं मनुष्यजन्म दुर्लभ, त्यांत पुरुषजन्म तर फारच दुर्लभ; तेव्हां तो प्राप्त झाला असतां त्याचा उपयोग आत्म्याचें स्वरूप ओळखून मोक्ष मिळविण्याकरितां करावयाचा, का संसारांत पडून प्रजोत्पत्ति करण्याकडे करावयाचा? देह म्हणजे मांसाचा गोळा, दुसरें आहे काय आणि नाहीं काय, हें तत्त्व मी आजपर्यंत कितीएकांना सांगतों; पण तें त्यांच्या मनांत कसें ठसत नाहीं? ते म्हणतात; महाराज, तसें होत नाहीं ! मायापाश सुटत नाहींत ! अरे नाहीं म्हणजे काय? मीं कसें सोडलें ! एक दिवस उठलों, दिली बायकोला टाकून !

निघालों झालें. हाच जर मी घरांत राहिलों असतों आणि बायकोला विचारीत बसलों असतों, तर आजच्या स्थितीला आलों असतों का? आज जें मला समाधिसुख मिळत आहे, आज मला जो ब्रह्मानंद होत आहे, ही माळ जपण्यांत जें प्रेम वाटत आहे, तें तेव्हां वाटलें असतें का? हें शांत अरण्य, हा गोड प्रदेश, प्रत्यक्ष ईश्वरी दर्शनाप्रमाणें वाटतात. पण हें केव्हां? जेव्हां प्रपंच सोडला, विशेषत: बायको सोडली, तेव्हां. कारण बायको असली म्हणजे नेहमीं मनांत विषयाचे व संसाराचे विचार; मग पुरुषाच्या हातून कांहींसुद्धां होत नाहीं. महात्म्यांनीं म्हटलें आहे—' स्त्री नरकस्य द्वारं ' तें उगीच का? तेव्हां आधीं बायकोशीं संबंध सुटला पाहिजे. बायको म्हणजे मोक्षाच्या आड येणारें कांटेरी कुंपण आहे. बायको म्हणजे विषाचा पेला, विषयवासनेची प्रत्यक्ष पुतळी, ईश्वरी सान्निध्याच्या वाटेंत असणारी विषारी नागीण आहे; ती नुसती घरांत संभाळण्यायोग्य सुद्धां नाहीं. आणि एकदां का मनुष्य तिच्या पाशांत अडकला, कीं तो अज्ञानरूपी अंधकाराच्या दरींत पडलाच म्हणून समजावें!

( शिष्य प्रवेश करतो. )

**शिष्य**—महाराज, साधुसिंह महाराजांची स्वारी समोरच्या ओढ्यावर आलेली दिसते आहे. इकडे येतीलसें वाटतें. आल्यास आंत आणूं का?

**वि०**—हो, घेऊन ये. मी आतां रिकामाच आहें. ( शिष्य जातो ) असो. माझ्या आजपर्यंतच्या खटपटीचें काय होतें, तें पाहण्याचीं वेळ आतां आली आहे. जर का माझ्या म्हणण्याप्रमाणें

हा राजा माझ्या म्हणण्याला कबूल झाला, तर केवढें तरी कार्य होणार आहे? आणि किती तरी माणसांना ईश्वराकडे लावल्याचें श्रेय मिळणार आहे? पाहावें काय होतें तें. तो राजा आला वाटतें.

**शि०**—( प्रवेश करून ) असें इकडून यावें सरकार, ते पहा महाराज बसले आहेत.

( राजा थोड्या परिवारासह येऊन बसतो. )

**वि०**—जय सच्चिदानंद ! जय सच्चिदानंद !

**राजा**—महाराज, मग आपण ह्या दासावर केव्हां अनुग्रह करावयाचें ठरविलें?

**वि०**—राजा, तें ठरविणें सर्वस्वी तुझ्याच हातांत आहे म्हणून मी तुला काल नाहीं का सांगितलें? माझ्या सांगण्याचा तूं नीट विचार केलास का?

**राजा**—होय महाराज, आपल्या सांगण्याचा विचार करितां, आपलें म्हणणें पुष्कळ अंशीं खरें आहे, असें आम्हांलासुद्धां वाटतें; पण एकदां जडलेला मायापाश एका क्षणांत सुटणें फार कठीण आहे. शिवाय, तो सुटण्यास त्या मार्गांत तितकी गति झाली पाहिजे. ती आमच्याजवळ मुळींच नाहीं. आणि ती व्हावी म्हणून तर आपल्या-सारख्यांच्या अनुग्रहाची इच्छा. शिवाय आमचे प्रधानजी दुसरीही एक अडचण सांगत आहेत.

**वि०**—कां प्रधानजी, आणखी कोणतें तत्त्व पुढें आणलेंत? इतक्या आपल्या वयाला आपल्याला बायकोचें वेड सुटलें नाहीं वाटतें?

**प्रधान**--नाहीं महाराज, मी तर विधुर आहें. मी यत्किंचित माणूस आपल्याला कसलीं तत्त्वें सांगणार? पण जर आपल्या सांगण्याप्रमाणें आमच्या सरकारांनीं राणीसरकारचा त्याग केला, तर राज्यामध्यें होणारीं धार्मिक कृत्यें व्हावीं कशीं? पत्नीशिवाय मनुष्य अर्धा असतो, म्हणून पत्नीशिवाय कोणताही धार्मिक विधि करण्यास सरकारला अधिकार नाहीं. आणि त्यांना मातृगृहीं पोंचविल्यास धर्मकृत्यांची वाट काय?

**वि०**—होय, तुमचें म्हणणें थोडेंसें खरें आहे. पण त्याचीही सोय करतां येईल. आतां एवढें खरें कीं, कांहीं जरी झालें तरी स्त्रीच्या सान्निध्यांत मोक्ष मिळविण्याची इच्छा करणें व्यर्थ आहे. कारण ह्या बायकांत काय विलक्षण सामर्थ्य आहे, ह्याची तुम्हाला कल्पना नाहीं का? बायका म्हणजे माया—नव्हे मी म्हणतों महा-माया!—ह्या बयेनें ऋषि, देव सुद्धां सोडले नाहींत; तेथें तुमच्या-सारख्या विषयलंपट पुरुषांची काय कथा? भगवंताला दहा अवतार घेण्यास स्त्रीनेंच लाविलें, अंबरीषाला पापांत स्त्रीनेंच पाडिलें, विश्वा-मित्रासारख्याचा तपोभंग स्त्रीनेंच केला, अलीकडील उदाहरण घेतलेंत, तर पेशवाई स्त्रीनेंच बुडविली! अशा एक कीं दोन, हजारों गोष्टी आहेत. त्या आपल्या नांवानें, रूपानें, गुणानें, स्पर्शानें दरेक गोष्टीनें पुरुषांना खालीं ओढण्याचा प्रयत्न करीत असतात. बरें इतकेंही करून संसारांत तरी त्यांच्यापासून सुख आहे का? नाहीं. तर असंतोष, कज्जेदलाली व रडव्या रोग्या मुलांची परंपरा, हेंच दृष्टीस पडतें. सारांश, त्यांना घरांत ठेवणें म्हणजे दूध पाजून विषारी साप वाढविणें आहे. म्हणून राजा, जर तुला आत्मस्वरूप

ओळखावयाला शिकावयाचें असेल, मोक्षाची इच्छा असेल, तर प्रथम स्त्रीचा त्याग कर. जर तुझ्या प्रधानाच्या म्हणण्याप्रमाणें तुला करावयाचें असेल, तर पुन्हां पुन्हां मला स्त्री शब्दाचा उच्चार करावयास न लावितां मुकाट्यानें आपला मार्ग सुधार!

रा०--महाराज, अपराधाची क्षमा करा. कोणच्याही तऱ्हेनें आपल्याला त्रास देण्याची इच्छा नाहीं. पण आमचे हे प्रधानजी वृद्ध असून, आज त्यांनीं पुष्कळ वर्षे ह्या राज्याची इमानानें चाकरी केली आहे. तेव्हां त्यांचें ह्या गादीवर निस्सीम प्रेम आहे. तरी आपण त्यांचें म्हणणें ऐकून घेऊन मग मजवर अनुग्रह करावा अशी विनंति आहे.

वि०—ऐकून घेण्यास माझी हरकत नाहीं, पण त्याच त्या गोष्टी पुन्हां बोलण्याचा मला कंटाळा येतो. जर तुझी इच्छाच असेल, तर ऐकतों. पण चला, जरा ह्या पर्णकुटिकेच्या बाहेर बसून गार हवा खात बोलूं,

रा०—चलावें, जशी महाराजांची इच्छा. (सर्व उठतात) प्रधानजी, तुम्ही माझ्याबरोबर चला आणि सरदारहो, आपण आपल्या उद्योगाला जा.

(सर्व जातात.)

---

ग्रंथ संग्र…

## प्रवेश २ रा.

( रस्त्यांतून यमुना जात आहे व पाठीमागून जानकीकाकू पाण्याची घागर घेऊन येत आहे )

**जानकीबाई**—अग कोणग ती ? यमू , अग यमू ?

**यमुनाबाई**—( थांबून ) कोण, जानकीकाकू ? तुम्ही का ? काय काम आहे ?

**जान०**—अग हो, मीच ती; तूं ओळखलंस का ? पण मी किती हांका मारल्या ! एवढ्या घाईनें कोठें चाललीस ?

**यमु०**—घाई नाहीं म्हणा, जरा काम आहे म्हणून जात होतें. थोडी जलदीनें

**जान०**—असं काय काम आहे ? नाहीं तर म्हटलं, चल, आमची मथी आली आहे, थोडी बसून जाशील घरीं; आमच्या घरीं आल्यानं यजमान कांहीं रागवणार नाहींत.

**यमु०**—नाहीं, तसं कांहीं नाहीं. पण आज कांहीं मला वेळ नाहीं, पुन्हां केव्हां तरी येईन.

**जान०**—येवढ्याशा मुली तुम्ही, तुम्हाला वेळ नसायला काय झालं ! असें काय काम आहे सांग पाहूं ?

**यमु०**—मला आज कुमारिका सरस्वतीदेवींच्या प्रवचनाला जावयाचं आहे. म्हणून मी घाईनें जात होतें.

**जान०**—कोणाचं ? बाईचं प्रवचन ? आणि ती कुमारिका आहे ? तें कोठें होणार ! जें जें ऐकावं तें तें नवलच.

**यमु०**—होय, तें कुमारिकाबाईचें आहे, आणि तें सरदार मानसिंहाच्या वाड्यांत कुमुदिनी ताईसाहेब करविणार आहेत.

**जा०**—अस्सं, मग बरोबर. कारण कुमुदिनीताई वगैरे त्यांतलाच कंपु आहे. त्यांनीं तरी कोठें अद्याप आपलं लग्न केलं आहे ? इतका पैसा, एकच मुलगी, पण त्यांच्या कपाळीं कांहीं दोन नातवंड पाहण्याचें सुख नाहीं. शिकवा म्हणावं आणखी शिकवा; म्हणजे असंच व्हावयाचं. ज्या मुली आज बापाला विचारीत नाहींत, त्या उद्यां नवऱ्याला काय विचारणार ? बरं पण प्रवचन तरी कसलं आहे ? आणि ती काय सांगणार आहे ? कीं माझ्यासारख्या कुमारिका रहा म्हणून ?

**यमु०**—छे हो काकू, असं काय ? त्या केवढ्या विद्वान् आणि साधुवृत्तीच्या बाई आहेत ! आज त्या गीतेंतील श्लोक घेऊन भक्तिमार्गाची महती सांगणार आहेत.

**जानकी०**—अगबाई, आतां ह्या बायका धार्मिक ग्रंथांकडे का वळणार आहेत ? तर मग काय म्हणतात तें एकदां ऐकलंच पाहिजे.

**यमु०**—चला तर मग, येत असलांत तर; मला आतां थांबायलों वेळ नाहीं.

**जानकी०**—मग मी आजच का येऊं ? माझी पण ओळख नाहीं.

**यमु०**—अहो ओळख काय करावयाची ! तेथें का जेवावयाला जायचं आहे ? शिवाय कुमुदिनीताईसाहेबांचा स्वभाव कितीपण

उत्तम आहे म्हणून सांगूं ? त्यांना माणसाचा मुळींच कंटाळा नाहीं, चलाच तर.

**जाणकी०**—बरं तर; म्हणतेसच आहेस, तर चल. मी जातां जातां घरांत घागर टाकतें आणि मग पुढें जाऊं. ( जातात )

---

## प्रवेश ३ रा.

---

( दोन ब्राह्मण जेवून येतात. )

**त्रिंबकभटजी**—( उपाध्ये ) कां बगंभटजी, पोट कसें काय भरलें ? दक्षणेची चैन झाली कीं नाहीं !

**बगंभटजी**—होय बोवा, झाली खरी; पण जेवणाच्या शेवटीं त्या स्वामीमहाराजांनीं उपदेश कसला केला ?

**त्रिं०**—अहो आज हें गुरुमंत्र घेतल्याबद्दलचें ब्राह्मणभोजन ! तेव्हां काल ब्राह्मण सांगावयास सांगतांना बायकोशिवायचे ब्राह्मण सांगावयास सरकार मला सांगावयास विसरले. पुढें आयत्या वेळीं स्वामींनीं पृच्छा केली; तेव्हां तशी व्यवस्था झाली नाहीं; असें कळतांच त्यांना वाईट वाटलें. तें त्यांच्या मनांत डंवचत होतें झालें; तें एकदां ओकले.

**ब०**—बायकोशिवायचे म्हणजे काय ?

**त्रिं०**—अहो तुम्हाला नाहींका ठाऊक, कीं ह्या स्वामींची दीक्षा घेतांना आमच्या महाराजांनीं एक विलक्षण अट कबूल केली आहे ?

ब०—अशी अट काय बोवा ?

त्रिं०—अट एवढीच कीं, त्यांनीं स्वतः स्त्रीचें मुखावलोकन-सुद्धां करूं नये, व आपल्या नोकरीस सर्व माणसें अशा अटीवरच ठेवायची कीं, त्यांनीं बायकांशीं संबंध ठेवायचा नाहीं.

ब०—वा ! वाहवा ! ! मोठी गम्मतच आहे म्हणावयाची-असा कोण बोवा साधू ! आणि अशी चमत्कारिक अट कां म्हणून ?

त्रिं०—स्वामी तर तुम्ही आज पाहिलातच. तो आज सहा महिने गांवाबाहेर पर्णकुटी बांधून राहिला आहे; आणि त्याचें असें म्हणणें आहे कीं, ह्या बायका म्हणजे नरकाचें साधन आहे. ह्यांच्यामुळें जे आहे त्ते मोक्षाचा नाश होतो व ईश्वरप्राप्तीच्या मार्गांत मोठ्या अडचणी उत्पन्न होतात. तेव्हां त्यांचा आधीं त्याग केला पाहिजे. त्याप्रमाणें जे आहे त्ते त्यानें महाराजांकडून कबुली घेऊन मग त्यांना गुरुमंत्र दिला आहे.

ब०—अस्सें अस्सें ? तर मग आतां आपल्याही पोटावर पाय आले म्हणायचे. का कुटुंबाला सोडचिठ्ठी देतां ?

त्रिं०—अहो दिली असती हो कुटुंबाला सोडचिठ्ठी, पण तिला पाठवायला कोठेंच जागा नाहीं. तेव्हां तूर्त पोटावर पाय आलेसें वाटतें. पाहूं या बाकी लोक काय करतात तें.

ब०—अस्सें, मग आपण रागरंग बघून करणार वाटतें ?

( दवंडीवाला व दोन तरुण मुलगे असे येतात. )

**दवंडीवाला**—समस्त लोकांस कळविण्यांत येत आहे कीं, पुढल्या महिन्यापासून ह्या राज्यांत नोकरी करणाऱ्या दरेक इसमानें

आपली बायको सोडली पाहिजे, व बायकोपाशीं संबंध ठेवूं नये, आणि तशा प्रकारचा करारनामा दरबारच्या प्रसंगीं रीतसर रुजू केला पाहिजे. यापुढें जे अविवाहित किंवा विधुर असतील अशांनाच नोकरी देण्यांत येईल. स्त्रियांशीं यत्किंचित्‌ही संबंध ठेवणाऱ्याला नोकरी मिळणार नाहीं, व कोणच्याही धंदेवाल्यास ह्या राज्यांत कोणच्याही प्रकारच्या सवलती, अगर नोकर लोकांकडून आश्रय मिळणार नाहीं.

**ब०**—अहो खरेंच कीं, पण कांहो आज दरबार असेलना?

**त्रिं०**—हो हो, आहे तर? आणि तेथील मुख्य कामगिरी माझ्याकडेच आहे. तेव्हां लवकर आपल्या उद्योगाला लागणेंच बरें. येतों तर नमस्कार.

**ब०**—आणि मला सुद्धां किरकिऱ्यांच्या घरीं टिपण द्यावयाला जायचें आहे. नमस्कार. ( जातात. )

---

## प्रवेश ४ था.

( कुमुदिनीचा बैठकीचा दिवाणखाना, ती आणि तिची मैत्रीण एका टेबलाशीं एक वही घेऊन वाचीत आहेत. )

**स०**—खरंच गडे; ताईसाहेब, हा संसारचित्राचा भाग फारच उत्कृष्ट साधला आहे. मी कांहीं तोंडापुरतें बोलत नाहीं; पण कसलेल्या उत्तम लेखकालाही लिहितां येणार नाहीं, अशी साधी

डा- ८८
२०३६
२८/१/८१



आणि सरळ परंतु गोड विचारसरणी पाहून तर मन थक्कच होतें. च प्रकरण पुरतें झाल्याशिवाय थांबवतच नाहीं. तरी अजून कांहीं प्रकरणें माझीं वाचावयाचीं उरलीं आहेत.

कु०—इतकी नको कांहीं स्तुति करायला. पण माझे विचार मीं ह्यांत दाखवावयाचा थोडासा प्रयत्न केला आहे; एकंदरींत तें छापण्यायोग्य आहे किंवा नाहीं? तुला कसें वाटतें तें सांग?

स०—मग, मी काय खोटें सांगतें का? आपली स्तुति करून आपल्याला प्रिय असें बोलण्याचें मला कांहींच कारण नाहीं. पण आपलें बहुतेक सर्व पुस्तक वाचून मी आपल्यास सांगतें कीं, ह्यांत आपण सद्यःस्थितीचें चित्र फारच नामी वठविलें आहे. हें जुन्या बाईचें चित्र पाहिलें म्हणजे एखाद्याला वाटेल, कीं हा सर्व अनुभव आपण घेतलाच आहे. सध्यांच्या काळांतील शिक्षणासंबंधीं भाग पाहिला म्हणजे किती तरी गम्मत वाटते? जेव्हां तेव्हां हे सर्व पुरुष आम्हाला अज्ञानी ठरवितात; आणि आमची सुधारणा झाल्या-शिवाय समाजाची सुधारणा होणार नाहीं, म्हणून ओरडतात, पण अशिक्षित स्त्रियांना शिक्षण देऊन त्यांच्याकडून काम होईपर्यंत, ह्या स्वतः शिक्षणानें तयार झालेल्या पुरुषांनीं आपल्या समाज-सुधारणेकरितां काय काय केलें आहे, ह्याचा विचार केला म्हणजे त्यांच्या संख्येच्या मानानें त्यांनीं फार थोडें केलें असें म्हणावें लागतें.

कु०—अग तूं फारच थोडं म्हणतेस, मी म्हणतें कांहींच नाहीं. ह्यांच्या संख्येच्या मानानें ह्यांनीं कांहींच केलें नाहीं. ह्या पुरुषांच्या इतक्या नव्हे, निम्या नाहीं चवथा हिस्सा कां होईना,

ग्र्याजुएट स्त्रिया माझ्या संगतीला भेटल्या, तर मीं किती तरी गोष्टी केल्या असत्या. पण म्हणतात ना, दांत आहेत तेथें चणे नाहींत आणि चणे आहत तेथें दांत नाहींत. तशांतली गत आहे. आम्हाला इच्छा आहे तर माणसें नाहींत आणि त्यांना माणसें आहेत तर इच्छा नाहीं, असें नाहींका तुला वाटत?

**स०**—हो वाटतं. त्यांनीं ह्यापेक्षां कांहीं तरी ज्यास्त करावयास पाहिजे होतं असं वाटतं. आतां अगदीं नाहीं त्यापेक्षां त्यांनीं थोडं थोडं केलं आहे. हल्लीं मुलींच्या शाळांची संख्या वाढत आहे; बरेच जण आपल्या मुलींना इंग्रजी वगैरे शिकवीत आहेत, असें थोडें थोडें करीत आहेत.

**कु०**—काय करताहेत, आणि तुला काय वाटतं आहे, कोणास ठाऊक? मुलींच्या शाळेंत संख्या वाढते आहे खरी, पण तिचा उपयोग काय? ह्याच वेळेस त्यांच्या शिक्षणावर कोणाची तरी नजर पाहिजे. पण तें काम कितीजण करताहेत! प्राथमिक शाळेंतल्या मुलींना काय ज्ञान आहे? बरें, पुढें शिक्षण झालेल्या मुली तरी उत्तम माता, उत्तम गृहिणी, ह्या योग्यतेला पात्र होण्या-जोग्या आहेत का? त्यांना आपल्या समाजासंबंधानें कांहीं तरी समजतें आहे का? आपल्यावरच्या जबाबदारीची त्यांना कांहीं जाणीव आहे का! तसेंच बालविधवांसंबंधींचा प्रश्न. नुसता पुन-र्विवाह करा म्हणून कांहीं भागत नाहीं. कारण केव्हांही झालें तरी पुनर्विवाह ही बाब खुषीची रहाणार. तो कांहीं लग्नासारखा प्रश्न नाहीं. मनाच्या आवडीचा प्रश्न आहे. तेव्हां जरी पुनर्विवा-

ह्याची पूर्ण मोकळीक असली, तरी ज्यांना तो करूं नयेसा वाटेल, त्यांच्याकरितां काय व्यवस्था केली आहे ? तसेंच धार्मिक शिक्षण. दिवसानुदिवस धर्माची अवनति होते आहे म्हणून कांहीं फायदा नाहीं. अशा किती किती तरी गोष्टी आमच्या समाजाकरितां पुरुषांनीं करण्याजोग्या आहेत. यांपैकीं ह्यांनीं कोणत्या कोणत्या केल्या असें तुला वाटतें ?

**स०**—हो, आतां आपण जीं कामें माझ्यापुढें मांडलीं, तीं पाहिलीं म्हणजे कांहीं नाहीं असें वाटतें खरें. व त्यासंबंधीं आपली कळकळही विशेष दिसून येते, आणि म्हणूनच मला वाटतें, तो भाग फार छान वठला आहे.

**कु०**—असेल, कदाचित् तसेंही असेल. पण नुसतें मनांत येऊन काय उपयोग ! ज्यांच्या मनांत येतें त्यांना करितां येणें शक्य नाहीं, व ज्यांना–असो, पण आणखी बरं कोणचं आहे ? आणि कोठें सुधारणा करावयास हवी आहे ?

**स०**—माझ्या दृष्टीनें तर वाईट असा भाग ह्यांत मला कोठेंच दिसत नाहीं. इतकेंच नव्हे, पण हा शेवटीं पति–पत्नीच्या प्रणयाचा भाग फारच छान साधला आहे. आपण अजून कुमारिका असून हें असलं ज्ञान मिळवावयाला कुठें बाई गेलां होतां ! आपलें साधें आणि सरळ वर्तन पाहून कोणाला सुद्धां वाटणार नाहीं कीं, आपल्याला इतकी माहिती असेल म्हणून. म्हणूनच बाबासाहेब म्हणतात कीं, आमची कुमुदिनी ना ? झांकलं माणिक आहे झाकलं ! तें खोटं का ? परवां सरस्वतीदेवी सुद्धां म्हणाल्या कीं,

ताईसाहेबांसारखी जोडीदारीण मला येथें येताक्षणीं मिळाली, हा तरी योगायोगच. त्यांची बुद्धिमत्ता, सार्वजनिक कार्याची हौस, विनय वगैरे गुण वाखाणण्याजोगे आहेत. त्यांच्या साह्याशिवाय मी माझ्या कार्याला इतक्या लवकर आरंभ करूं शकलें नसतें. तें उगींच कां ?

कु०—आहे झालं कांहीं तरी. अग थोर असतात ते नेहमींच दुसऱ्याची स्तुति करितात; पण तें सगळें कांहीं खरें नसतें. सरस्वतीदेवींची योग्यता केवढी ? त्यांचें ज्ञान किती ? त्यांची राहणी तरी किती सात्त्विकवृत्तीची ? जें पाहून मोठमोठ्या साधूंनीं सुद्धां तोंडात बोटें घालावीं. बरें इतकें असून सर्वांशीं सारख्या नात्यानें वागणें व त्यांच्या सारखें होऊन मिसळणें, हें तरी आलें पाहिजे. बरं-त्यांचा निश्चय तरी केवढा दांडगा, कीं सर्व जन्म ब्रह्मचर्यावस्थेंत घालवून समाजसेवा करावयाची. तें पाहिलें म्हणजे आपणही तसा निश्चय करावा, असें नाहीं का वाटत, सांग ? पण योगायोग कांहीं विलक्षण एवढें खरें. नाहीं तर दवाखान्याची कल्पना आपल्या मनांत यावयास आणि त्याच सुमारास सरस्वती-देवी येथें येण्यास गांठ पडली, व त्यामुळें आपल्या कार्यांत आप-ल्याला एक चांगली पुढारीण भेटली. तेव्हां ईश्वराच्या मनांत आपल्या हातून हें काम पार पाडावयाचें आहे असें दिसतें. अग पण ऐक कसली ग दवंडी ? ( इतक्यांत पूर्वोक्त दवंडी पडद्यांत ऐकूं येते.)

स०—( खिडकीशीं जाऊन परत येते ) अगबाई ! ताईसाहेब, विचित्रच दवंडी ही. म्हणे आपल्या राज्यांत नोकरी करणाऱ्यांनीं

बायका सोडून द्याव्या; नाहीं तर त्यांना नोकरीवरून काढून त्यांच्या जागेवर विधुर व अविवाहित नोकर नेमावयाचे. काय ही विलक्षण अट?

**कु०**—काय म्हणतेस! बायका सोडावयाच्या! आणि मग हे सर्व पुरुष काय करणार आहेत? बायकांनीं काय ह्यांचें घोडें मारलें? तूं नीट ऐकलें नसशील. दुसऱ्या कोणाला तपास करावयास पाठीव पाहूं.

( एक कुणबीण येते ).

**कुणबीण**—शांताबाई आपल्याकडे आल्याति.

**कु०**—बरं त्यांना आंत पाठव. पण कायग, तूं अतांची दंवडी ऐकलीस का!

**कुणबीण**—नाहीं ताईसाहेब, मी तर आंतल्या खोलींत होतें.

**कु०**—तर मग, ती दंवडी कसली होती, त्याचा तपास करून ये, आणि शांताबाईंना आंत पाठव.

( कुणबीण जाते व शांताबाई आंत येतात. )

**कु०**—या बसा, आपल्या कामाचें काय झालें?

**शां०**—ताईसाहेब, काम तर बहुतेक फत्ते झालेंच, पण मीं आज एक नवी बातमी आणली आहे.

**कु०**—काय बातमी आहे? सांगा तर खरी.

**शां०**—महाराजांनीं गुरूपदेश घेतला आणि राणीसाहेबांचा त्याग केला, व सर्वांनीं तसेंच करावें म्हणून हुकूम सोडले आहेत.

कु०—गुरूपदेशाचा आणि त्यागाचा काय संबंध !

शां०—अहो, त्यांना उपदेश करणाऱ्या गुरूचें असें म्हणणें आहे कीं, स्त्रीच्या सहसावानें मोक्षप्राप्ति होत नाहीं, म्हणून स्त्रीचें वारें घेणार नाहीं असें ठरलें म्हणजे उपदेश करावयाचा, व ती अट महाराजांनीं कबूल केली.

स०—अस्सें ? म्हणूनच ती मघांची दंवडी होती वाटतें ?

कु०—हो, आतां बरोबर.

( गेलेली कुणबीण येते. )

कुण०—ताईसाहेब, दंवडी अशी हाय कीं, समद्या बाप्या माणसांनीं आपली अस्तुरी टाकून द्यावी म्हणजे सरकार त्यास्नी चाकरी देईल.

कुमु०—बरं, जा तूं आणि माझी गाडी तयार करायला सांग; मी येतेंच.

( कुणबीण जाते. )

स०—कां, कोठें जाण्याचा विचार आहे वाटतें ?

कु०—अग हो, आतां ह्या शांताबाईनीं काय बातमी आणली आहे, ती ऐकून पुढील विचार ठरविण्याकरितां कुमारी सरस्वती-देवींकडे जाऊं या.

शां०—बातमी म्हणजे अशी कीं, बऱ्याचजणी ह्या गोष्टीला अनुकूल आहेत. आतां त्याला प्रत्यक्ष मदत करावयास जरी कोणी आल्या नाहींत, तरी त्याचा फायदा पुष्कळजणी घेतील व त्यांच्या मदतीची आज आपण अपेक्षाही केली नाहीं.

कु०—नाहीं. त्यांनीं संमति दिली म्हणजे पुष्कळ झालें. बाकी मी आतां असें ठरविलें होतें कीं, लोक कांहीं म्हणोत, पण आपण कार्याला आरंभ करावयाचा व त्याप्रमाणें सामान पाठविण्याकरितां मीं मुंबईस पत्रही लिहिलें होतें आणि त्याचें उत्तर आजच आलें आहे. उद्यां–परवांकडे औषधें येतील. परिचारिकेचें काम मला येतें आहे व मीं सरलेलाही थोडें शिकविलेंच आहे. तुमचा दोघींचाही पुष्कळ उपयोग होईल. शिवाय आपल्या कुमारी सरस्वती–देवी मदतीला आहेतच; मग कां भितां?

शां०—काय? भ्यायचें नांवच नको. आपण असल्यावर आम्हीं काय नाहीं करूं शकणार? शिवाय आपण कांहीं नुसत्या परिचारिकाच नाहीं; तर डॉक्टरीण आहां. परीक्षा दिली नाहीं म्हणून काय झालें?

कु०—अग त्यांतच तर मजा आहे. डिप्लोम्याशिवाय कोणी पुशीत नाहीं. पण बाबासाहेबांच्या आजारानें माझें काम अर्धवट झालें आणि आतां वृद्धपणामुळें ते मला लांब जाऊं देत नाहीत.

स०—पण त्यांचें तें करणें गैर का आहे? ताईसाहेब, त्यांना आपल्याशिवाय दुसरें कांहीं विरंगुळ्याला साधन आहे का?

कु०—आणि म्हणूनच मीं आग्रह धरला नाहीं. पण मला येथें चैन पडेना म्हणून मीं प्रथम महिलासमाज काढला. पण त्याहूनही ज्यास्त स्त्रियांच्या उपयोगी पडणारें असें काम काढावें ह्या विचाराचें हा दवाखाना हें फळ होय. आज तें लहान प्रमाणावर आहे. पण एकदां त्याची उपयुक्तता वाढली म्हणजे तें सहज वाढवितां येईल; असें माझेंही म्हणणें आहे व बाबासाहेबांचेंही मत तसेंच पडलें.

आतां त्याच्याकरितां एखादी पुरुष–डॉक्टराच्या तोडीची डॉक्टरीण पाहिजे, म्हणजे लोकांची चांगली श्रद्धा बसेल. त्याकरितां मी तशा बाईच्या शोधांत आहें.

**शां०**—पण ताईसाहेब, मीं त्याची तजवीज आधींच केली आहे.

**कु०**—हें खरें कीं काय? काय बरें तजवीज केली आहे? तुझ्या माहितींत तशी कोणी स्त्री आहे कीं काय?

**शां०**—होय, माझी आतेबहीण एम्. डी. च्या परीक्षेकरितां अमेरिकेंत गेली आहे. तथ ती पास झाली असून पुढल्या आठव-ड्यांत येणार आहे. तिला मी तूं पुढें काय करणार आहेस असें नुसतें विचारलें आहे व आम्हीं येथें एक स्त्रियांकरितां दवाखाना काढणार असून, त्यांत गरीबांना फुकट व वरच्या दर्जाच्या स्त्रियां-कडून नांवाला फी घेऊन औषध देण्याचा विचार आहे व रोग्यांकरितां आणि बाळंतिणीकरितां विशेष सोय करणार आहों. आणि आम्हांला चांगल्या चांगल्या स्त्रियांची फार जरूरी आहे वगैरे वगैरे लिहिलें आहे.

**कु०**—अग वा! मग तुम्ही माझें पुष्कळच काम केलेंत म्हणा-वयाचें. आणि तुमच्या म्हणण्याप्रमाणें जरा बेताचा पगार घेऊन जर त्या बाई आपल्या येथें राहिल्या, तर मग केवढें कार्य होईल! पण आपल्या कार्यायोग्य त्यांचा स्वभाव आहेना? कारण आपलें काम म्हणजे पदराला खार लावून श्रम सोसून लोकांचीं बोलणीं ऐकून घ्यावयाचीं! चिवटपणा, शांतपणा वगैरे गुण पाहिजेत.

**शां०**—होय. येथें होती तोंपर्यंत तसा तिचा स्वभाव होता. आतां तेथील परिस्थितीचा परिणाम तिच्यावर काय झाला असेल तो खरा. पण पत्रावरून तर बदल झाला नसावा असें वाटतें.

कु०—बरं मग ठीक आहे. पण जागेसंबंधानें काय काय झालें ?

शां०—आपण सांगितलेलें सर्व काम झालें. जागा नक्की होऊन रिपेरी झालेली पाहून आलें. दोन माणसें ठरविलीं. देवी सरस्वतींना भेटलें; त्या म्हणाल्या उघडण्याकरितां राणीसाहेबांना विनंति करा. आपल्या सरदारांच्या बहुतेक स्त्रियांना भेटलें, व आपली कल्पना त्यांच्या कानावर घातली. दोघी–चौघींना आनंद झाला. कोणी कांहींच बोलल्या नाहींत; आणि बाकीच्यांनीं टीका केली. पण ताई साहेब, आम्हां बायकांना नांवें ठेवणाऱ्यांना उद्यां पुरुषांनींही टाकल्या म्हणजे त्या काय करतील हो ?

स०—आणि आज अनायासें तशी वेळ आली आहे, असें सर्वांच्या दवंडीवरून दिसतें आहे.

कु०—वेळ गमतीची आहे खरी व आपल्याला काळही अनुकूल आहेसा वाटतो. पण मला चमत्कार वाटतो कीं असा हा साधु तरी कोण ? कीं ज्यानें आमच्या साधुवृत्तीच्या साधुसिंह महाराजांना भुरळ घातलीन आणि त्याचें हें चमत्कारिक शास्त्र तरी कसलें ? सगळीच गम्मत.

शां०—पण बिचाऱ्या राणीसाहेबांना कारण नसतां शिक्षा ?

स०—खरंच, त्या बिचाऱ्या गरीब, साध्वी आणि खऱ्या पतिव्रता आहेत. त्यांना हा पतिवियोग किती तरी दुःसह होईल !

कु०—खरंच. ती कल्पना आली म्हणजे वाईट वाटतें व आपण त्यांच्याकरितां कांहीं तरी करावेंसें वाटतें.

शां०—आणि ताईसाहेब, आपण मनांत आणाल तर करूंही शकाल ?

ग्र्याजुएट स्त्रिया माझ्या संगतीला भेटल्या, तर मीं किती तरी गोष्टी केल्या असत्या. पण म्हणतात ना, दांत आहेत तेथें चणे नाहींत आणि चणे आहत तेथें दांत नाहींत. तशांतली गत आहे. आम्हाला इच्छा आहे तर माणसें नाहींत आणि त्यांना माणसें आहेत तर इच्छा नाहीं, असें नाहींका तुला वाटत ?

स०—हो वाटतं. त्यांनीं ह्यापेक्षां कांहीं तरी ज्यास्त करावयास पाहिजे होतं असं वाटतं. आतां अगदीं नाहीं त्यापेक्षां त्यांनीं थोडं थोडं केलं आहे. हल्लीं मुलींच्या शाळांची संख्या वाढत आहे; बरेच जण आपल्या मुलींना इंग्रजी वगैरे शिकवीत आहेत, असें थोडें थोडें करीत आहेत.

कु०—काय करताहेत, आणि तुला काय वाटतं आहे, कोणास ठाऊक ? मुलींच्या शाळेंत संख्या वाढते आहे खरी, पण तिचा उपयोग काय ? ह्याच वेळेस त्यांच्या शिक्षणावर कोणाची तरी नजर पाहिजे. पण तें काम कितीजण करताहेत ! प्राथमिक शाळेंतल्या मुलींना काय ज्ञान आहे ? बरें, पुढें शिक्षण झालेल्या मुली तरी उत्तम माता, उत्तम गृहिणी, ह्या योग्यतेला पात्र होण्या-जोग्या आहेत का ? त्यांना आपल्या समाजासंबंधानें कांहीं तरी समजतें आहे का ? आपल्यावरच्या जबाबदारीची त्यांना कांहीं जाणीव आहे का ! तसेंच बालविधवांसंबंधींचा प्रश्न. नुसता पुन-र्विवाह करा म्हणून कांहीं भागत नाहीं. कारण केव्हांही झालें तरी पुनर्विवाह ही बाब खुषीची रहाणार. तो कांहीं लग्नासारखा प्रश्न नाहीं. मनाच्या आवडीचा प्रश्न आहे. तेव्हां जरी पुनर्विवा-

ह्याची पूर्ण मोकळीक असली, तरी ज्यांना तो करूं नयेसा वाटेल, त्यांच्याकरितां काय व्यवस्था केली आहे? तसेंच धार्मिक शिक्षण. दिवसानुदिवस धर्माची अवनति होते आहे म्हणून कांहीं फायदा नाहीं. अशा किती किती तरी गोष्टी आमच्या समाजाकरितां पुरुषांनीं करण्याजोग्या आहेत. यांपैकीं ह्यांनीं कोणत्या कोणत्या केल्या असें तुला वाटतें?

स०—हो, आतां आपण जीं कामें माझ्यापुढें मांडलीं, तीं पाहिलीं म्हणजे कांहीं नाहीं असें वाटतें खरें. व त्यासंबंधीं आपली कळकळही विशेष दिसून येते, आणि म्हणूनच मला वाटतें, तो भाग फार छान वठला आहे.

कु०—असेल, कदाचित् तसेंही असेल. पण नुसतें मनांत येऊन काय उपयोग! ज्यांच्या मनांत येतें त्यांना करितां येणें शक्य नाहीं, व ज्यांना–असो, पण आणखी बरं कोणचं आहे? आणि कोठें सुधारणा करावयास हवी आहे?

स०—माझ्या दृष्टीनें तर वाईट असा भाग ह्यांत मला कोठेंच दिसत नाहीं. इतकेंच नव्हे, पण हा शेवटीं पति–पत्नीच्या प्रणयाचा भाग फारच छान साधला आहे. आपण अजून कुमारिका असून हें असलं ज्ञान मिळवावयाला कुठें बाई गेलां होतां! आपलें साधें आणि सरळ वर्तन पाहून कोणाला सुद्धां वाटणार नाहीं कीं, आपल्याला इतकी माहिती असेल म्हणून. म्हणूनच बाबासाहेब म्हणतात कीं, आमची कुमुदिनी ना? झांकलं माणिक आहे झाकलं! तें खोटं का? परवां सरस्वतीदेवी सुद्धां म्हणाल्या कीं,

ताईसाहेबांसारखी जोडीदारीण मला येथें येताक्षणीं मिळाली, हा तरी योगायोगच. त्यांची बुद्धिमत्ता, सार्वजनिक कार्याची हौस, विनय वगैरे गुण वाखाणण्याजोगे आहेत. त्यांच्या साह्याशिवाय मी माझ्या कार्याला इतक्या लवकर आरंभ करूं शकलें नसतें. तें उगींच का?

कु०—आहे झालं कांहीं तरी. अग थोर असतात ते नेहमींच दुसऱ्याची स्तुति करितात; पण तें सगळें कांहीं खरें नसतें. सरस्वतीदेवींची योग्यता केवढी? त्यांचें ज्ञान किती? त्यांची राहणी तरी किती सात्त्विकवृत्तीची? जें पाहून मोठमोठ्या साधूंनीं सुद्धां तोंडात बोटें घालावीं. बरें इतकें असून सर्वांशीं सारख्या नात्यानें वागणें व त्यांच्या सारखें होऊन मिसळणें, हें तरी आलें पाहिजे. बरं-त्यांचा निश्चय तरी केवढा दांडगा, कीं सर्व जन्म ब्रह्मचर्यावस्थेंत घालवून समाजसेवा करावयाची. तें पाहिलें म्हणजे आपणही तसा निश्चय करावा, असें नाहीं का वाटत, सांग? पण योगायोग कांहीं विलक्षण एवढें खरें. नाहीं तर दवाखान्याची कल्पना आपल्या मनांत यावयास आणि त्याच सुमारास सरस्वती-देवी येथें येण्यास गांठ पडली, व त्यामुळें आपल्या कार्यांत आप-ल्याला एक चांगली पुढारीण भेटली. तेव्हां ईश्वराच्या मनांत आपल्या हातून हें काम पार पाडावयाचें आहे असें दिसतें. अग पण ऐक कसली ग दवंडी? ( इतक्यांत पूर्वोक्त दवंडी पडद्यांत ऐकूं येते.)

स०—( खिडकीशीं जाऊन परत येते ) अगबाई! ताईसाहेब, विचित्रच दवंडी ही. म्हणे आपल्या राज्यांत नोकरी करणाऱ्यांनीं

बायका सोडून द्याव्या; नाहीं तर त्यांना नोकरीवरून काढून त्यांच्या जागेवर विधुर व अविवाहित नोकर नेमावयाचे. काय ही विलक्षण अट ?

**कु०**—काय म्हणतेस ! बायका सोडावयाच्या ! आणि मग हे सर्व पुरुष काय करणार आहेत ? बायकांनीं काय ह्यांचें घोडें मारलें ? तूं नीट ऐकलें नसशील. दूसऱ्या कोणाला तपास करावयास पाठीव पाहूं.

( एक कुणबीण येते ).

**कुणबीण**—शांताबाई आपल्याकडे आल्याति.

**कु०**—बरं त्यांना आंत पाठव. पण कायग, तूं अतांची दंवडी ऐकलीस का !

**कुणबीण**—नाहीं ताईसाहेब, मी तर आंतल्या खोलींत होतें.

**कु०**—तर मग, ती दंवडी कसली होती, त्याचा तपास करून ये, आणि शांताबाईंना आंत पाठव.

( कुणबीण जाते व शांताबाई आंत येतात. )

**कु०**—या बसा, आपल्या कामाचें काय झालें ?

**शां०**—ताईसाहेब, काम तर बहुतेक फत्ते झालेंच, पण मीं आज एक नवी बातमी आणली आहे.

**कु०**—काय बातमी आहे ? सांगा तर खरी.

**शां०**—महाराजांनीं गुरूपदेश घेतला आणि राणीसाहेबांचा त्याग केला, व सर्वांनीं तसेंच करावें म्हणून हुकूम सोडले आहेत.

कु०—गुरूपदेशाचा आणि त्यागाचा काय संबंध !

शां०—अहो, त्यांना उपदेश करणाऱ्या गुरूचें असें म्हणणें आहे कीं, स्त्रीच्या सहसावानें मोक्षप्राप्ति होत नाहीं, म्हणून स्त्रीचें वारें घेणार नाहीं असें ठरलें म्हणजे उपदेश करावयाचा, व ती अट महाराजांनीं कबूल केली.

स०—अस्सें ? म्हणूनच ती मर्वांची दंवडी होती वाटतें ?

कु०—हो, आतां बरोबर.

( गेलेली कुणबीण येते. )

कुण०—ताईसाहेब, दंवडी अशी हाय कीं, समद्या बाप्या माणसांनीं आपली अस्तुरी टाकून द्यावी म्हणजे सरकार त्यास्नी चाकरी देईल.

कुमु०—बरं, जा तूं आणि माझी गाडी तयार करायला सांग; मी येतेंच.

( कुणबीण जाते. )

स०—कां, कोठें जाण्याचा विचार आहे वाटतें ?

कु०—अग हो, आतां ह्या शांताबाईंनीं काय बातमी आणली आहे, ती ऐकून पुढील विचार ठरविण्याकरितां कुमारी सरस्वती-देवींकडे जाऊं या.

शां०—बातमी म्हणजे अशी कीं, बऱ्याचजणी ह्या गोष्टीला अनुकूल आहेत. आतां त्याला प्रत्यक्ष मदत करावयास जरी कोणी आल्या नाहींत, तरी त्याचा फायदा पुष्कळजणी घेतील व त्यांच्या मदतीची आज आपण अपेक्षाही केली नाहीं.

कु०—नाहीं. त्यांनीं संमति दिली म्हणजे पुष्कळ झालें. बाकी मी आतां असें ठरविलें होतें कीं, लोक कांहीं म्हणोत, पण आपण कार्याला आरंभ करावयाचा व त्याप्रमाणें सामान पाठविण्याकरितां मीं मुंबईस पत्रही लिहिलें होतें आणि त्याचें उत्तर आजच आलें आहे. उद्यां—परवांकडे औषधें येतील. परिचारिकेचें काम मला येतें आहे व मीं सरलेलाही थोडें शिकविलेंच आहे. तुमचा दोघींचाही पुष्कळ उपयोग होईल. शिवाय आपल्या कुमारी सरस्वती—देवी मदतीला आहेतच; मग कां भितां?

शां०—काय? भ्यायचें नांवच नको. आपण असल्यावर आम्हीं काय नाहीं करूं शकणार? शिवाय आपण कांहीं नुसत्या परिचारिकाच नाहीं; तर डॉक्टरीण आहां. परीक्षा दिली नाहीं म्हणून काय झालें?

कु०—अग त्यांतच तर मजा आहे. डिप्लोम्याशिवाय कोणी पुशीत नाहीं. पण बाबासाहेबांच्या आजारानें माझें काम अर्धवट झालें आणि आतां वृद्धपणामुळें ते मला लांब जाऊं देत नाहीत.

स०—पण त्यांचें तें करणें गैर का आहे? ताईसाहेब, त्यांना आपल्याशिवाय दुसरें कांहीं विरंगुळ्याला साधन आहे का?

कु०—आणि म्हणूनच मीं आग्रह धरला नाहीं. पण मला येथें चैन पडेना म्हणून मीं प्रथम महिलासमाज काढला. पण त्याहूनही ज्यास्त स्त्रियांच्या उपयोगी पडणारें असें काम काढावें ह्या विचाराचें हा दवाखाना हें फळ होय. आज तें लहान प्रमाणावर आहे. पण एकदां त्याची उपयुक्तता वाढली म्हणजे तें सहज वाढवितां येईल; असें माझेंही म्हणणें आहे व बाबासाहेबांचेंही मत तसेंच पडलें.

आतां त्याच्याकरितां एखादी पुरुष-डॉक्टराच्या तोडीची डॉक्टरीण पाहिजे, म्हणजे लोकांची चांगली श्रद्धा बसेल. त्याकरितां मी तशा बाईच्या शोधांत आहें.

**शां०**—पण ताईसाहेब, मीं त्याची तजवीज आधींच केली आहे.

**कु०**—हें खरें कीं काय? काय बरें तजवीज केली आहे? तुझ्या माहितींत तशी कोणी स्त्री आहे कीं काय?

**शां०**—होय, माझी आतेबहीण एम्. डी. च्या परीक्षेकरितां अमेरिकेंत गेली आहे. तथ ती पास झाली असून पुढल्या आठवड्यांत येणार आहे. तिला मी तूं पुढें काय करणार आहेस असें नुसतें विचारलें आहे व आम्हीं येथें एक स्त्रियांकरितां दवाखाना काढणार असून, त्यांत गरीबांना फुकट व वरच्या दर्जाच्या स्त्रियांकडून नांवाला फी घेऊन औषध देण्याचा विचार आहे व रोग्यांकरितां आणि बाळंतिणीकरितां विशेष सोय करणार आहों. आणि आम्हांला चांगल्या चांगल्या स्त्रियांची फार जरूरी आहे वगैरे वगैरे लिहिलें आहे.

**कु०**—अग वा! मग तुम्ही माझें पुष्कळच काम केलेंत म्हणायाचें. आणि तुमच्या म्हणण्याप्रमाणें जरा बेताचा पगार घेऊन जर त्या बाई आपल्या येथें राहिल्या, तर मग केवढें कार्य होईल! पण आपल्या कार्यायोग्य त्यांचा स्वभाव आहेना? कारण आपलें काम म्हणजे पदराला खार लावून श्रम सोसून लोकांचीं बोलणीं ऐकून घ्यावयाचीं! चिवटपणा, शांतपणा वगैरे गुण पाहिजेत.

**शां०**—होय. येथें होती तोंपर्यंत तसा तिचा स्वभाव होता. आतां तेथील परिस्थितीचा परिणाम तिच्यावर काय झाला असेल तो खरा. पण पत्रावरून तर बदल झाला नसावा असें वाटतें.

कु०—अरं मग ठीक आहे. पण जागेसंबंधानें काय काय झालें?

शां०—आपण सांगितलेलें सर्व काम झालें. जागा नक्की होऊन रिपेरी झालेली पाहून आलें. दोन माणसें ठरविलीं. देवी सरस्वतींना भेटलें; त्या म्हणाल्या उघडण्याकरितां राणीसाहेबांना विनंति करा. आपल्या सरदारांच्या बहुतेक स्त्रियांना भेटलें, व आपली कल्पना त्यांच्या कानावर घातली. दोघी-चौघींना आनंद झाला. कोणी कांहींच बोलल्या नाहींत; आणि बाकीच्यांनीं टीका केली. पण ताई साहेब, आम्हां बायकांना नांवें ठेवणाऱ्यांना उद्यां पुरुषांनीही टाकल्या म्हणजे त्या काय करतील हो?

स०—आणि आज अनायासें तशी वेळ आली आहे, असें सर्वांच्या दवंडीवरून दिसतें आहे.

कु०—वेळ गमतीची आहे खरी व आपल्याला काळही अनुकूल आहेसा वाटतो. पण मला चमत्कार वाटतो कीं असा हा साधु तरी कोण? कीं ज्यानें आमच्या साधुवृत्तीच्या साधुसिंह महाराजांना भुरळ घातलीन आणि त्याचें हें चमत्कारिक शास्त्र तरी कसलें? सगळीच गम्मत.

शां०—पण बिचाऱ्या राणीसाहेबांना कारण नसतां शिक्षा?

स०—खरंच, त्या बिचाऱ्या गरीब, साध्वी आणि खऱ्या पतिव्रता आहेत. त्यांना हा पतिवियोग किती तरी दुःसह होईल!

कु०—खरंच. ती कल्पना आली म्हणजे वाईट वाटतें व आपण त्यांच्याकरितां कांहीं तरी करावेंसें वाटतें.

शां०—आणि ताईसाहेब, आपण मनांत आणाल तर करूंही शकाल?

कु०—अग ह्या म्हणण्यांत काय हांशिल आहे, पण आपण आतां राणीसाहेबांकडे जाऊं याना ? त्यांना दवाखाना उघडण्याची विनंति करण्याचें नक्की ठरलेंना ?

स०—हो. आणि त्यामुळें आपल्यालाही एक मोठा वशिला होईल व संस्थेला थोडी द्रव्यप्राप्ति लाभेल.

शां०—आणि आपण काढलेल्या संस्थेचा त्यांच्या हातून उघडण्याचा समारंभ करणें योग्यही होईल.

कु०—मग ठरलें तर. चला, प्रथम आपण कुमारी सरस्वतीदेवींकडे जाऊं. मग राणीसाहेबांकडे महिला–सभेचें प्रतिनिधिमंडळ म्हणून जाऊं.

( सर्व उठतात. पडदा पडतो. )

---

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

( राजाचा दरबार भरला आहे, नाच चालला आहे, असा पडदा उघडतो. )

वि०—राजा, स्त्रीचें मुखावलोकन सुद्धां करावयाचें नाहीं, हा माझा नियम तुला ठाऊक असून तूं आज मला मुद्दाम येथें माझी थट्टा करण्याकरितां कां आणलास ?

रा०—महाराज, तसें नाहीं; पण नेहमींच्या दरबारी पद्धतीप्रमाणें दरबार सुरू होण्यापूर्वीं नाच झाला. आपली गोष्ट आमच्या स्मरणांत राहिली नाहीं. नाहीं तर आजचा दिवस बंद ठेवला असता.

वि०—अरे, आजचा दिवस कां म्हणतोस ? नेहमींच म्हण. कारण तूं सुद्धां आतां स्त्रियांशीं संबंध ठेवावयाचा नाहीं, ह्या अटीनें बांधला गेला आहेस आणि मग ह्या स्त्रियांचे हे ढंग रोज पाहणार कीं काय !

रा०—बरं, जशी स्वामीजींची इच्छा. प्रधानजी, आजपासून ह्या ताफ्याच्या बाईला ताकिद द्या कीं, इतउत्तर आम्हाला ह्या बायांची जरूरी नाहीं. तरी त्यांनीं कोणच्याही दरबार–प्रसंगीं हजर राहूं नये.

प्र०—बरं आहे. त्याप्रमाणें तजवीज करितों.

रा०—बरं प्रधानजी, आपल्या नोकरांच्या नियमासंबंधीं काय काय झालें ?

त्रि०—बरं. राजा आतां मी जातों. कारण तुझ्या बायकांच्या गोष्टी ऐकत बसण्याचें मला कांहींच कारण नाहीं. पण पुन्हां तुला बजावून सांगतों कीं, ह्या महामायेच्या पाशाला जप बरं ? ह्या स्त्रियांनीं कसे व कोठें अनर्थ केले आहेत म्हणून सांगूं ? त्या वर-करणीं अमृतासारखें गोड बोलतात, पण त्यांच्या वाणींत विष भरलेलें असतें. व त्याच वाणीला तुम्ही पुरुष भुलतां. त्यांची कातडी वरून जितकी गोरी, तितक्या त्या आंतून काळ्या; हें तूं पक्कें लक्षांत ठेव. त्यांची संगति करूं नये; इतकेंच नाहीं, तर त्यांच्या वाऱ्यासही उभें राहूं नये. हें लक्षांत ठेवून वाग म्हणजे शेवटीं तो सच्चिदानंद परमात्मा तुला आत्मस्वरूपीं मिळवून घेईल. ( जातो ).

प्र०—सरकार, आपला जाहिरनामा सगळ्या गावांत वाटला. सरदार लोकांना कळविला व त्याप्रमाणें कांहींनीं आपल्या जागेचे राजीनामे दिले असून कांहीं अविवाहित तरुण मुलांनीं अर्जही केले आहेत.

**एक सरदार**—सरकार, हा जाहिरनामा प्रसिद्ध केल्यानें आपल्या प्रजेवर काय परिणाम होईल, ह्याचा आपण विचार केला आहे का ?

रा०—हें पहा, त्याचा विचार करण्याचें काम आमचें आहे. आणि तें आम्ही केलें आहे. ह्या संसारांत जन्म घेऊन मनुष्यानें निव्वळ जिवाचे ऐषआराम करण्याऐवजीं आपल्या पारलौकिक सुखा-चीही कांहीं तयारी केली पाहिजे. व त्याकरितां गुरूपदेश घेऊन गुरूच्या आज्ञेप्रमाणें वागून आपल्या आत्म्याचं सार्थक करणें हें आमचें कर्तव्य आहे.

दु० स०—व तें बजावण्याबद्दल कोणाचीही हरकत नाहीं, तरी पण गुरु करतांना गुरूची निवड व्यावहारिक दृष्टीनें व पूर्वपरंपरेला अनुसरून करावी लागते. व त्याप्रमाणें पाहतां आम्हाला वाटतें कीं, हा स्वामी नसून कोणी भोंदू अगर मूर्ख असावा.

रा०—मूर्ख माणसाला इतकें ज्ञान असणें शक्य नाहीं. कारण आमच्या गुरुमहाराजांचें सर्व बाबतींतलें ज्ञान इतकें श्रेष्ठ आहे कीं, त्यांना पूर्वकालीन ऋषि म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं.

० स०—मलासुद्धां तसेंच वाटतें.

प० स०—तर मग तो शत्रुपक्षाकडील तरी असावा. कारण जर तो ज्ञानी आहे असें म्हटलें, तर अशी मूर्खासारखी अट त्यानें घालण्याचें कांहीं कारण नव्हतें.

रा०—हें पहा, मिथ्यावाद करून गुरुनिंदा ऐकण्याचें पातक तुम्हीं माझ्यावर लावूं नये हें मला बरें वाटतें. कारण गुरुजींचें सांगणें कांहीं खोटें आहे असें मला वाटत नाहीं. पुराण–काला-पासून त्यांनीं स्त्रियांच्या योगें झालेल्या अनर्थाच्या ज्या हकीकती सांगितल्या, त्यांवर माझ्यानें आणि प्रधानजींच्यानेंही हरकत घेववली नाहीं. इतकेंच नव्हे, तर तें मला चांगलें पटलें. कारण ह्या स्त्रिया म्हणजे व्याधि आणि उपाधि आहेत. आपण सहज कोठें जावयास निघालों कीं, पुरुषांचें काय, उठले कीं चालले. पण बायका बरोबर असल्या म्हणजे मन अस्वस्थ, सर्व घोटाळा–अडचण नाहीं का वाटत! शांत आणि स्थिर मनाला स्त्रियांचा सहवास घडला कीं, विषयलालसा नाहीं का उत्पन्न होत?

**दु० स०**—सरकार, ह्या सर्व गोष्टी जरी खऱ्या असल्या, तरी त्याला दुसरी बाजू आहे. व ती पाहिली म्हणजे हा स्वामिरूपधारी कोणी तरी हेर असावा असें वाटतें.

**रा०**—आम्हाला कांहीं तसें वाटत नाहीं. व त्यामुळें आमची आज्ञा अमलांत आलीच पाहिजे. करितां तुमचे काय जे निश्चय असतील ते कळवा.

**ए० स०**—बरं आहे, तर मी माझ्या जागेचा राजीनामा लिहून पाठवतों.

**दु० स०**—मी सायंकाळीं काय तें कळवितों.

**ति० स०**—जी गोष्ट सरकारला पसंत आहे, ती आम्हालाही पसंत आहे.

**राजा**—बरं आहे; प्रधानजी, आजचा दरबार खलास करा.

**प्र०**—जशी आज्ञा.

( पडदा पडतो. )

## प्रवेश २ रा.

**यशवंतराव**—काय हो, आजच्या दरबाराबद्दल आपल्याला काय वाटतें ?

**वसंतराव**—अहो वाटायचें काय ? असें वाटतें कीं, असा प्रसंग न येता तर बरें; पण प्रसंग आलाच आहे, तेव्हां राजाज्ञेला मान वांकविलीच पाहिजे.

य०—अहो म्हणजे काय? कांहीं योग्य अयोग्य नकोका बघाला?

व०—अहो पोटाला भूक लागते म्हणून सर्व योग्य आणि ती लागेनाशी झाली कीं अयोग्य; दुसरें काय? जरी पुष्कळ अयोग्य वाटलें, तरी आज दरमहा येणाऱ्या छन्छन्ला फांटा देववतो का?

य०—देववतो का म्हणजे? वेळ आली कीं, दिला पाहिजे. पोट झालें म्हणून काय झालें? ज्याला स्वतःच्या अब्रूची, योग्य-अयोग्याची, खऱ्या–खोट्याची चाड नाहीं, तो मनुष्य कसला? नाहीं पोटाला मिळालें तर भीक मागावी.

व०—अहो येथेंच कायती खुबी आहे. मध्याह्नींची वेळ आली, चार पोरें पाठीशीं ओरडावयाला लागलीं म्हणजे कळतें. तोंपर्यंतच्या गप्पा ठीक असतात. तसें जर नसतें तर आम्हाला म्हणजे माणुसकी नाहीं का? माणुसकी आहे, राग आहे, लोभ आहे, सर्व कांहीं आहे. पण बाबा, करतां काय? ह्या पोटाकारितां, आज-पर्यंतच्या आपल्या व मुलांच्या सवयीकारितां, सर्व सोसणें भाग आहे. यथा राजा तथा प्रजा.

य०—हें तत्त्व तुम्हांला मान्य असेल; पण आपल्याला नाहीं. ज्या स्त्रीला आपण देव–ब्राह्मणांसमक्ष आपली म्हटली, त्या निरप-राधी प्राण्याला शिक्षा काय म्हणून? आणि त्यांनीं काय आपलें घोडें मारलें?

व०—अहो घोडे कां, हत्ती मारला आहे. आतां हें पहा बायको आजच टाकावी कीं नाहीं हा प्रश्न निराळा, पण त्यांच्यापासून आपल्याला त्रास होतो कीं नाहीं? आपण घरीं आलों म्हणजे त्या

कटकटीनें आपलें डोकें उठवितात ना?. पोरांच्या रडण्यानें आप-ल्याला कंटाळा येतोना? त्यांना सर्व गोष्टींचा हव्यास नसतो का? त्यांचा कधीं आणा संपला आहे का? ह्या सर्वांचा विचार करितां महाराजांचें म्हणणें खोटें म्हणवेल का?

य०—हें पहा असें बोलून दुसऱ्यावर निरर्थक दोष लादण्यांत कांहीं अर्थ नाहीं. पोराबाळांची कटकट कांहीं त्यांनीं एकठ्यांनीं उत्पन्न केली नाहीं. आजाराची पिरपिर त्या कांहीं आपल्या एकटीकरतां तुमच्या मागें लावीत नाहींत. उलट पाहिलें म्हणजे तुमच्या सुखाकरितां त्या नानातऱ्हेचे श्रम घेत असतात. तुमच्या लौकिकाकरितां तुमच्या स्नेह्यांच्या तब्येती राखतात, हें सर्व फुकटच का!

ब०—हें असें थोडेंसें जरी असलें, तरी त्याचें कांहीं एवढें स्तोम माजवायला नको आहे. निदान मी तरी माजवीत नाहीं. माझी समजूत अशी आहे कीं, बायका म्हणजे साधारण वरच्या दर्जाचे नोकर. त्या जें थोडेंसें करितात, त्याला कांहीं इतकें महत्त्व देण्याची जरूरी नाहीं. उलट त्यांच्या श्रमाच्या मानानें पाहिलें तर आम्ही त्यांना फुकट खाऊं घालतों, नव्हे वाटेल तें खाण्यापिण्याला सर्व त्यांच्या हातांत देतों, चार माणसें त्यांच्या हाताखालीं असतात, चांगला कपडालत्ता मिळतो, हें थोडेंका झालें? त्यांनीं जर कोठें नोकरी केली असती, तर दहा वीस रुपये मिळते, त्यांत चैन चालती का? मग त्या मानानें एवढें केलें म्हणून काय झालें? माझा गणू गडीसुद्धां अशीच माझी काळजी घेतो. त्याला पगार कितीं! तर सहा रुपये. तेव्हां त्यानें आमचे उपकार मानावयास नकोत का! आणि आम्ही जर हुकूम केला कीं, अमक्या ठिकाणीं जाऊन

रहा तर रहावयास नको? आतां तिला घालविल्यानें आज माझी जेवणा-खाण्याची गैरसोय होईल खरी. पण काय करावें? राजाज्ञा पाळलीच पाहिजे.

य०—बरें आहे बोवा. ह्या ठिकाणीं तुमचें आमचें पटणें शक्य नाहीं. कारण तुम्हाला पत्नी म्हणजे नोकर वाटते, मला ती मित्र वाटते. तेव्हां ह्या बाबतींत वाद घालण्यांत अर्थ नाहीं. ज्याला जो योग्य दिसेल तो मार्ग पत्करलेला बरा. आणि असें पहातां आपल्या धर्मपत्नीचा त्याग करण्यापेक्षां राजसेवा सोडलेली बरी, असं मला वाटतें. बरं आहे नमस्कार.

व०—नमस्कार.

## प्रवेश ३ रा.

( त्र्यंबकभट प्रवेश करतो. )

त्रिं०—अग ए, अग ए, आंत आहेस का? जरा बाहेर ये पाहूं!

जानकी०—( बाहेर येऊन ) हो आहें घरांत; काय म्हणणें आहे?

त्रिं०—ह्मटलें मी त्या डोलकर आळींत खोली पाहून ठेविली आहे. मग आज तूं तेथें राहावयास जा. म्हणजे तुला सोडल्याचा करारनामा लिहून मी तो आज सरकारस्वारीपुढें रुजू करतों.

जानकी०—पण एवढा करारनामा करावयास सांगितलें कोणी? मी साफ त्या खोलींत जाऊन राहणार नाहीं, हें केव्हांच सांगितलें आहे.

त्रिं०—हें पहा शहाणी असून असं वेड्यासारखं काय बरं करत्येस ! अग चारचौघांसारखें नको का करायला ? आणि तें सर्व कोणासाठीं तर माझ्या लाडकीकरतां.

जा०—चार लोकांनीं जर मूर्खपणा केला तर आपणही करावासा आहे कीं काय ? आणि माझ्याकरितां असेल तर मी साफ सांगतें कीं, आपण नोकरीचा राजीनामा द्या.

त्रिं०—( वेडावून ) राजीनामा द्या, राजीनामा द्या, म्हणणें सोपें आहे. पण दरमहा दहा रुपये ठेवले आहेत का तुझ्या बापानें ? हळुहळु गोड बोलून सांगतों तर समजत नाहीं.

जा०—माझ्या बापानें नाहीं ! पण तुमच्या बापानें ठेवले आहेत ना ! ते घ्या नी खा. माझा बाप कशाला काढता !

त्रिं०—काढीन जा, काढीन जा, एकदां नाहीं हजारदां काढीन. तुझा बाप, तुझा बाप, तुझा बाप बोलशिल पुन्हा ! आतां मी गरीबीनें न बोलतां तुला हुकूम करतो आहे. आज्ञा करतों कीं, तूं आजच्या आज त्या खोलींत जाऊन राहिलें पाहिजे. गरीबीनें बोलून उपयोग नाहीं. चांभाराच्या देवाला खेटरांचीच पुजा हवी.

जा०—बरं ! बरं ! पुरे झालं पांडित्य, ठाऊक आहे. आतां मी साफ सांगतें कीं, मी कांहीं तेथें जाणार नाहीं. मी जातें आपल्या कामाला ( जाऊं लागते ).

त्रिं०—अग ए चाललीस कोणीकडे ! इकडे ये, नीट विचार कर. आणि एकदां सांग बरं कीं, आपल्या दोघांच्या फायद्याची गोष्ट ऐकावयाची कीं नाहीं ?

जा०—( परत येते ) ऐकायचं म्हणजे रीतीची असेल ती ऐकावयाची, भलती सलती कोण ऐकतें ?

त्रिं०—हें पहा ! आपल्या महाराजांनीं ही वेड्यासारखी आज्ञा काढली आहे खरी. पण आपल्याला कांहीं एकदम दहा रुपये दरमहा सोडवत नाहीं ना ! तेव्हां तूं आपली तेथें रहा, मी तुला तीन रुपये दरमहा देत जाईन आणि मग गावांतच आहों. रात्रीं बित्रीं चोरून मारून भेटत जाईन. पण एकदां करारनामा लिहून देण्याला मोकळीक झाली.

जा०—हें पहा ! मला कांहीं तो करारनामा बिरारनामा समजत नाहीं. आणि मी कांहीं तीन रुपये दरमहा देऊन ठेवलेल्या बाई सारखी चोरून मारून रहावयाची नाहीं. आणि मला तें तसलं खोटं करणं मुळींच आवडत नाहीं.

त्रिं०—अग बरं तीन नाहीं चार घे !

जा०—पण मला कितीही दिले तरी असें खोटें करावयाचें नाहीं. मग !

त्रिं०—बरं ! बरं ! ठाऊक आहे, मोठी खरं बोलणारी, मी म्हणून ऐकून घेतों आहे. दुसरा असता तर समजलं असतं. हल्लींचा काळ कांहीं बायकानां विचारण्याचा नाहीं. त्या एवढ्या मोठ्या राणीसरकार पण गप बसल्या कीं नाहीं.

जा०—आणि पुरुषांना विचारायला तरी कोठें आहे ! राणीसरकारचं उदाहरण आपल्या गरिबाला कशाला पाहिजे. ज्यानें त्यानें आपली पाहिरी राखावी.

त्रिं०—बरं ! बरं ! गप्प बसतेस कीं नाहीं ! चालली वटवट करायला. बायकांची जातच शिंची ही—जरा सवड मिळाली पुरे कीं वाहवली.

जा०—पुरे तर पुरे. ही मी चाललें. हांक कशाला मारावी ?

त्रिं०—कशाला म्हणजे, नवरा म्हणून. ( वेडावून ) कशाला मारावी ! तुला जायचं आहे का नाहीं ? सांग एकदां ? नाहींतर मग देईन हांकून तेव्हां समजेल.

जा०—खुशाल हांका, माझी तयारी आहे. ह्यांची बायको नाहीं, असें बाहेर लिहून देऊन तशी चोरून राहणार नाहीं. मग वाटेल तें करा.

त्रिं०—हें पहा नीट विचार कर. अजून वेळ आहे, अजून वेळ आहे. मग एकदां का मी बिथरलों म्हणजे हे तीन रुपये सुद्धां मिळणार नाहींत, आणि दुसऱ्याच्या तोंडाकडे मात्र बघावें लागेल.

जा०—हें पहा ! मी सगळा विचार केला आहे. आणि पुन्हा पुन्हा सांगतें कीं नाहीं, नाहीं, नाहीं, त्रिवार नाहीं. मग माझा वेळ कां मोडता ! आणि पुन्हा पुन्हा तेंच तेंच कां वदवता ! आज म्हणून मी एवढी गप्प राहिलें, रोजच्या सारखी असतें तर सांगितलें असतें ! पण त्या सरस्वतीदेवी म्हणतात, बायानीं सहन करावयास शिकावें पण तें किती ! आतां माझं डोकं फिरायला लागलं आहे, म्हणून सांगतें पुन्हा मला विचारूं नका. आणि कांहीं देऊ नका. माझ्या पोटाची व्यवस्था मी पाहून घेईन. तुमचे पैसे घेऊन तुम्ही बसा.

त्रिं०—बरं आहे. ह्याचा तुला पश्चाताप होईलच. पण तुझ्या ह्या देवी कोण ?

**जा०**—कोण म्हणजे! नाहीं का ठाऊक त्या कुमारिका असून मोठ्या विद्वान् आहेत. त्या बायकांच्या उन्नतीकरितां त्यानां उपदेश करीत असतात. ऐका तरी एकदां म्हणजे कांहीं थोडी आली तर येईल.

**त्रिं०**—कोण कुमारिका असून विद्वान् आहे आणि उपदेश करते! आणि आपण स्त्रिया त्यांच्या शिष्यिणी झालां आहां वाटतें?

**जा०**—मीचशी काय; कुमुदिनीताईसाहेब सुद्धां त्यानां आपल्या गुरुप्रमाणें लेखतात आणि सर्व कामांत त्यांचे साह्य घेतात.

**त्रिं०**—हुं इतका लांब पल्ला पोंचला आहे का? आणि त्या उपदेश काय करतात, लग्न करूं नका! नवऱ्यानां शिव्या द्या, त्यांचें ऐकूं नका असा ना?

**जा०**—(वेडावून) हो असाच. बरं, त्या म्हणतात शांत रहा. क्षमा ठेवा, पतिव्रता धर्म पाळा, सत्य बोला, आणि अनाथाचें रक्षण करा, सर्वांवर प्रेम करा, असं सांगतात बरं; ऐकलतका, शिरलका कानांत.

**त्रिं०**—आणि म्हणून तूं माझें न ऐकण्याचा पतिव्रताधर्म पाळलास वाटतें.

**जा०**—हो, कारण कोणाचेंही असत्य ऐकूं नये, असेंही पण त्या सांगतात.

**त्रिं०**—बरं पोटाला भूक लागली म्हणजे समजेल. मी तर आतां करारनामा करणारच आणि तुला कांहीं देणार नाहीं. क्षमा मागितलीस तरी नाहीं. मग पोटाची भ्रांत पडली कीं समजेल.

जा०—खुशाल, फार चांगलें. तोंडानें प्रेम प्रेम म्हणणाऱ्या पुरुषांच्या अंतःकरणाची तरी परीक्षा झाली! पैसा जास्त कीं बायको ? माझें काय, राम राम म्हणेन आणि सरस्वती-देवीजवळ राहीन ( जाते. )

त्रिं०—हिला ही बया कोणी पक्काच गुरु भेटली, तिची आधीं उचलबांगडी केली पाहिजे, आणि आपला करारनामा करावयाचा. काय शिंचीला चांगलें सांगत होतों कीं, नांवाला निराळे होऊं, केव्हां तरी येत जाईन, पण रांडेचीनें ऐकलें नाहीं. बरें जाते कोठें (जातो.)

---

## प्रवेश ४ था.

( राणीचा महाल, राणी बसली असून महिलासभेचें प्रतिनिधी-मंडळ म्हणून आलेल्या बायका बसल्या आहेत. )

रा०—आपलें सगळें ह्मणणें मी ऐकून घेतलें, पण हल्लीं माझें चित्त मुळींच स्वस्थ नाहीं. माझें मन कशावरच लागत नाहीं, त्याला मी तरी काय करूं ?

शांता०—होय, सरकार आपलें सर्व ह्मणणें खरें आहे. व त्याप्रमाणें वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. पण कर्तव्य कांहीं केव्हांही सुटत नाहीं. आणि आपल्याशिवाय आमच्या कार्याला शोभाही येणार नाहीं.

रा०—अहो, मला दुसरें कर्तव्यच माहीत नव्हतें. हो तुह्माला ठाऊकच आहे कीं, मी कांहीं विशेष शिकली सवरलेली किंवा अली-

कडच्या काळाप्रमाणें विचार वगैरे केलेली बायको नव्हे. त्यामुळें माझें मन कधीं इकडे जातच नसे. मला फक्त एक कर्तव्य दिसत असे कीं, महाराजाना कसें सुख होईल? त्यानां काय आवडतें, काय केलें ह्मणजे बरें वाटेल? आणि त्या गोष्टी शोधण्याकडे माझें लक्ष असे. मला जर केव्हां वेळ मिळाला तर मी पोथ्या वगैरे वाची. त्यांतील द्रौपदीनें सत्यभामेला केलेला उपदेश मला फार आवडे व त्याप्रमाणें माझ्या हातून तिकडची तब्येत राखली जाते कीं नाहीं, हें पाहण्याकडे माझें सारखें चित्त असे. मी एवढी मोठी राणी ना, पण मला इतर कामाला मुळींच वेळ होत नसे. माझें तन मन सारखें स्वारीची चिंता वाहण्यांत, त्यांच्या सुखाची व्यवस्था करण्यांत आणि माझा वेळ त्यांच्या मुखचंद्राचें ध्यान करून दर्शन केव्हां होईल ह्मणून वाट पाहाण्यांत जात असे. माझा देव तेच, माझें कर्तव्य विरंगुळा, माझा नेम, धर्म, माझें करमणूकीचें साधन, सर्व कांहीं तेच होते. त्यांच्याशिवाय दुसरा विषय कधीं माझ्या डोळ्यापुढें खेळ-लाच नाहीं. मला त्यांच्याशिवाय कधीं कोठें चैन पडलेंच नाहीं. देहाबरोबर जशी छाया तशी त्यांच्या पाठीमागें मी असें, आणि नांवाप्रमाणें कृती करणाऱ्या साधुवृत्तीच्या महाराजांनीं मलाही तशीच वागविली. पण माझ्या पूर्वजन्मींच्या पापानें कोणते स्वामीमहाराज भेटले आणि त्यांनीं माझ्या सुखांत ही अशी माती कालविली. असें करून त्या बिचाऱ्या साधु ह्मणवणाऱ्याला काय मिळालें कोण जाणे! नवराबायकोमध्यें वितुष्ट आणि ज्याप्रमाणें मासा पाण्याशिवाय तळम-ळतो तसें मला तळमळायला लावणारें शास्त्र त्याला कोठें सांपडलें कोण जाणें. वानप्रस्थाश्रम घेऊन अरण्यांत जातानांसुद्धां राजे-

लोकानीं बरोबर धर्मपत्नीला नेल्याचीं उदाहरणें पुराणांतही आहेत. याज्ञवल्क्यानें सुद्धां मैत्रेयीला बरोबर येण्यास परवानगी दिली होती, आणि ह्या स्वामीच्या मोक्षांतच तेवढा स्त्रियानां मज्जाव कां, कोण जाणे. ज्या मला महाराजांच्या सान्निध्याशिवाय व दर्शनाशिवाय घटकासुद्धां जात नसे, त्या मला आतां त्यांचें नुसतें दर्शन सुद्धां नाहीं. तर माझी स्थिती कशी होणार ! आणि मला दुसरे उद्योग तरी कसे सुचणार ! अशा गोष्टी आपल्या सारख्या लहान मुलींबरोबर बोलूं नये, हें खरें आहे. पण ह्मणतातना " जळ तुंबतां तडागीं फोडावा लागतो जसा पाट " तशी माझी स्थिती झाली आहे व त्यामुळें हें असें अयोग्य असें कांहींसें बोलणें बोललें जातें. तेव्हां तुमचें कार्य चांगलें आहे खरें, पण तें तुमचें तुम्ही करा. माझें कांहीं लक्ष लागत नाहीं.

कु०—सरकार आम्हीं लहान असून आपण आमच्याशीं मोकळ्या मनानें बोलला ह्याबद्दल आम्ही आपल्या फार आभारी आहों, व आपल्या हल्लींच्या स्थितीबद्दल आम्हां सर्वांना फार वाईट वाटत आहे. त्याचबरोबर आपल्या संबंधीं आमचा आदर वाढत आहे. कारण आपल्याला इतकी स्थिती आणणाऱ्याबद्दल आपण एका सुद्धां वाईट शब्दाचा उच्चार केला नाहीं, त्या आपल्या मनाच्या थोरपणाची धन्य असो.

रा०—अहो, कोण काय करतो. आपलें पूर्वसंचित दुसऱ्याकडून कोणच्या तरी रूपानें निमित्तमात्र होऊन कार्य करवितें.

शां०—हें संचित वगैरे सर्व खरें असो कीं खोटें असो, पण अशा स्थितींतही ज्यांच्या मनाची सात्विक वृत्ति ढळत नाहीं, त्या

ह्या मृत्युलोकाच्या प्रत्यक्ष देवीच असणाऱ्या आमच्या राणीसाहेबांची धन्य असो.

कु०—आणि म्हणूनच अशा योग्य अधिकारी माणसाकडून एखाद्या उपयुक्त संस्थेचा उपक्रम केला तर, ती संस्था ह्या सात्त्विक गुणाचा आदर्शरूप होईल असें वाटतें. व त्याकरितां ह्या प्रतिनिधि-मंडळाचें म्हणणें आपण मान्य करावें, अशी सर्वांतर्फे मी विनंति करतें.

शां०—आणि त्याप्रमाणें न झाल्यास आम्हां सर्वांना तर वाईट वाटेलच पण कुमारी सरस्वती देवी आणि कुमुदिनी ताईसाहेब ह्यांना फारच वाईट वाटेल.

रा०—अहो, आतां मला ह्या जगाच्या घडामोडींत पडून काय करावयाचें आहे! पोथ्या पुराणें वाचावीं आणि तिकडच्या मुखचंद्राचें ध्यान करावें व ईश्वरभजनीं चित्त लावावें हेंच योग्य. पती जें करीत असतील किंवा त्यांना जें आवडत असेल, तेंच कृत्य त्यांच्या परोक्ष सुद्धां करणें हाच पतिव्रता धर्म होय. व त्याप्रमाणें पाहतां त्यांनीं हल्लीं मोक्षप्राप्तीचा जो मार्ग स्वीकारला आहे, त्याचप्रमाणें तो मार्ग आपणही धरावा, असा विचार करून मी तोच मार्ग धरला आहे.

कु०—ह्या बाबतींत वडील माणसांशीं आम्हांला कांहीं जास्त बोलतां येणार नाहीं पण ह्या आमच्या गुरुजी आपल्याला कांहीं सांगूं शकतील. ह्यांचें नांव कुमारी सरस्वतीदेवी असें आहे; ह्यांनीं धर्मग्रंथांचें व चालू स्थितीचें चांगलें ज्ञान मिळविलेलें आहे व त्या-

याचा आहे, त्यानें प्रथम स्वार्थाचा त्याग करून ज्यामुळें परमार्थ व परोपकार घडेल, असा उद्योग करावा, असें माझें मत आहे.

**रा०**—साधुसंतानीं देखील परमार्थसाधनाला संसार नको, म्हणून ह्मटलें आहे आणि आपण हें नवीन शास्त्र कोठून काढलें?

**स०**—पण कृष्णांनीं तर अर्जुनाला म्हटलें आहे कीं, सर्व कर्में कर, मात्र तीं मी केलीं असें वाटूं देऊं नकोस. कृष्ण म्हणतात.

**ब्रह्मण्याधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोति यः ।**
**लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवांभसा ॥**

तेव्हां हल्लींचा काळ असा आहे कीं, नुसती माळ घेऊन जप करीत बसण्यांत कांहीं फायदा नाहीं. आणि जरी असला तरी, तो एकट्याचा आहे. जसें बागेंत सुंदर फूल फुलतें आणि तें झाडावरच कोमेजतें, त्याप्रमाणें घरांत बसून राम राम म्हणणाऱ्यांची स्थिती आहे. ती आतां बदलली पाहिजे; व काळाच्या ओघाबरोबर आपले धार्मिक कृत्यांचेही ओघ बदलले पाहिजेत. व हें पुढील भविष्य समजूनच कीं काय, कृष्णानें कर्माला पुष्कळ महत्त्व दिलें आहे. मग आपण तें कर्म करावयास नको का! आपण एक मोठ्या राणी आहा. आपल्या मतावर, वागणूकीवर, आपल्या प्रजेची वागणूक अवलंबून असणें स्वाभाविक आहे. त्या आपणच जर सर्व सोडलें तर प्रजा केव्हांच आळशी होईल. नाहीं, आहेच म्हणाना! ती आणखीं होईल. आणि मग जसा प्राणाशिवाय देह त्याप्रमाणें आपल्याशिवाय ह्या स्त्रियांची स्थिती होईल. तेंच आपण मनावर घेतल्यास आज आपल्याला सर्व अनुकूल आहे. आपल्या हातून किती जणांवर मोठे

उपकार होतील, व कितीकांना संसारसुखांत पुन्हां घातल्याचें श्रेय आपणास मिळवितां येईल. आपण पहा! रामदासांनीं संसाराचें महत्त्व कां गाइलें आहे? तुकोबांनीं संसारी जनाकरितां योग्य अभंग कां रचले? ह्या साधूंनीं जितका परमार्थ सांगितला आहे, तितक्याच योग्यतेचा संसारही सांगितला आहे. मोरोपंतानीं सावित्रीच्या तोंडीं काय घातलें आहे.—

**गृहस्थाश्रमांत सर्व धर्म घडे ।**
**तेणें मळ झडे अंतरीचा ॥**

तेव्हां ह्याचा आपण एकदां विचार करावा, अशी विनंती आहे.

**रा०**—आपण काय म्हणतां ह्याचा अर्थ अद्यापही मला नीटसा कळत नाहीं. ईश्वरभजन करावें. त्यांत काळ घालवावा, असें अद्यापही मला वाटतें. आतां तें काम अवघड आहे, असें तुम्ही म्हणतां, पण मला वाटतें कीं, तें सवईनें आंगवळणी पडेल आणि त्यामुळें देहाचें सार्थक होईल. आतां तुमच्या म्हणण्याप्रमाणें जर तुम्हाला मजकडून कांहीं मदत होण्यासारखी असेल तर, मी आमच्या दिवाणजींना सांगेन.

**स० दे०**—आम्हाला आपल्या पैशापेक्षां आपली स्वतःची जास्त जरूरी आहे. आपण ईश्वरीमार्गाकडे लागूं नये, असें आमचें मुळींच म्हणणें नाहीं. पण योग्य काम तें स्वतःच ईश्वररूप आहे, असा सिद्धांत आहे. साधारण माणसाला तें समजत नाहीं. म्हणून शास्त्रांनीं आणि महात्म्यांनीं असें म्हटलें आहे कीं, कर्म हें ईश्वराजवळ जाण्याची शिडी आहे, आणि आपलीं रोजचीं कामें ह्या

वरून मनुष्यांनीं हल्लींच्या काळांत कोणत्या मार्गाचा अवलंब करावा, ह्याबद्दल त्यांनीं बराच विचार केला आहे व त्याच कार्याकरितां त्या फिरत असतां येथें आल्यावर त्यांची माझी गांठ पडून त्यांचे माझे बरेच विचार जुळले, तेव्हां हल्लीं आम्ही त्यांनां गुरुस्थानीं लेखून त्यांच्या कृपाछत्राखालीं कांहीं गोष्टी करीत असतों. आज मी त्यांनां सरकारस्वारींच्या दर्शनाकरितां आणल्या आहेत.

**रा०**—खरें कीं काय, फार चांगलें केलें. अशा चांगल्या माणसांचा सहवास मला फार आवडतो ( सरस्वतीदेवीकडे बघून ) आपलें राहणें कोठें? आपल्याला कोण कोण आप्तसंबंधीं माणसें आहेत?

**स०**—माझें गांव कनकपूर. माझ्या आईबापांची मी एकच मुलगी. त्यांनां परलोकीं गेल्याला सात वर्षें झालीं. मला सख्खें कोणी नाहीं, चुलत भाऊ वगैरे आहेत. पण ते द्रव्यवान् असल्यानें सध्या त्यांच्या डोळ्यांवर लक्ष्मीचें तेज आहे. माझ्या बापानें माझी पोटापुरती सोय केली आहे. त्यांच्या पश्चात् मी चार वर्षेंपर्यंत विद्यादेवीची आराधना केली व आतां तीन वर्षें तीर्थाटन करून देशोदेश पहात हिंडावें, अशा विचारानें बाहेर पडलें आहे. येथें येतांक्षणीं आपल्या ह्या कुमुदिनी-ताईसाहेबांची आणि माझी गांठ पडली. आणि त्यांच्या योजिलेल्या सत्कार्यांत मी निमित्तमात्र झालें. तरी पण ताईसाहेब आणि त्यांच्या प्रिय मैत्रिणी ह्यांची सार्वजनिक कामाची आवड, निराभिमान वृत्ती, दुसऱ्याविषयीं आदर, ईश्वरावर भरंवसा, वगैरे गुणांनीं त्यांनीं सर्वांनीं मला लवकरच आपलीशी करून घेतली आहे. इतकेंच नव्हे तर, आतां त्या मला आपल्या

लहान बहिणीप्रमाणें वाटतात, आणि असें वाटतें कीं, आमच्या हातून कांहीं तरी सत्कृत्य घडण्याकरितांच ईश्वरानें आमच्या गांठी पाडल्या. तेव्हां त्यांत आपणही आम्हांला सहाय करून आमच्या कार्याला उत्तेजन द्यावें. आमच्या सारख्या दहांच्या हातून जें कार्य होत नाहीं, तें आपल्या सारख्यांच्या दृष्टिक्षेपानें होतें. सात्त्विक माणसांच्या सद्गुणांची गोष्ट कांहीं निराळीच आहे. ईश्वर आपल्याला सद्बुद्धी देवो.

रा०—हें पहा आपण स्तुति करता इतकी कांहीं माझी योग्यता नाहीं. आणि मला ह्या मार्गापेक्षां मोक्षसाधन बरें वाटतें.

स०दे०—आपण मला बोलण्याची क्षमा करावी. पण सरकार, आपण कोणत्या मार्गानें मोक्षसाधन करणार ?

रा०—देवी, जो मार्ग महाराजांनीं पत्करला आहे, त्याचेंच मी अवलंबन करणार म्हणजे सर्व संसाराचा त्याग करून, मन स्थिर करून, तें ईश्वरचरणीं अर्पण करणार. आणि आयुष्याचे उरलेले दिवस काढून शेवटीं मोक्षपदीं जाणार.

स० दे०—पण तो मार्ग किती अवघड आहे, ह्याची आपल्याला कल्पना आहे का ? नुसतें संसारांतून मन काढून जर स्थिर ठेवलें तर तें टिकत नाहीं. कारण मन ही महाचंचल वस्तु आहे. तें मोठमोठ्या ज्ञान्यांना सुद्धां आवरतां आलें नाहीं. आपण जर डोळ्यापुढें क्षणभर राममूर्तीचें ध्यान धरून बसूं म्हटलें तरी, ओढाळ मन तोंपर्यंत सतरा ठिकाणीं जाऊन येतें. म्हणून त्याला कांहींतरी व्यवसाय लागतो. आतां ज्याला सर्व संसाराचा त्याग कराव-

याचा आहे, त्यानें प्रथम स्वार्थाचा त्याग करून ज्यामुळें परमार्थ व परोपकार घडेल, असा उद्योग करावा, असें माझें मत आहे.

रा०—साधुसंतानीं देखील परमार्थसाधनाला संसार नको, म्हणून ह्मटलें आहे आणि आपण हें नवीन शास्त्र कोठून काढलें?

स०—पण कृष्णांनीं तर अर्जुनाला म्हटलें आहे कीं, सर्व कर्में कर, मात्र तीं मी केलीं असें वाटूं देऊं नकोस. कृष्ण म्हणतात.

**ब्रह्मण्याधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोति यः।**
**लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवांभसा ॥**

तेव्हां हल्लींचा काळ असा आहे कीं, नुसती माळ घेऊन जप करीत बसण्यांत कांहीं फायदा नाहीं. आणि जरी असला तरी, तो एकट्याचा आहे. जसें बागेंत सुंदर फूल फुलतें आणि तें झाडावरच कोमेजतें, त्याप्रमाणें घरांत बसून राम राम म्हणणाऱ्यांची स्थिती आहे. ती आतां बदलली पाहिजे; व काळाच्या ओघाबरोबर आपले धार्मिक कृत्यांचेही ओघ बदलले पाहिजेत. व हें पुढील भविष्य समजूनच कीं काय, कृष्णानें कर्माला पुष्कळ महत्त्व दिलें आहे. मग आपण तें कर्म करावयास नको का! आपण एक मोठ्या राणी आहा. आपल्या मतावर, वागणूकीवर, आपल्या प्रजेची वागणूक अवलंबून असणें स्वाभाविक आहे. त्या आपणच जर सर्व सोडलें तर प्रजा केव्हांच आळशी होईल. नाहीं, आहेच म्हणाना! ती आणखीं होईल. आणि मग जसा प्राणाशिवाय देह त्याप्रमाणें आपल्याशिवाय ह्या स्त्रियांची स्थिती होईल. तेंच आपण मनावर घेतल्यास आज आपल्याला सर्व अनुकूल आहे. आपल्या हातून किती जणांवर मोठे

उपकार होतील, व कितीकांना संसारसुखांत पुन्हां घातल्याचें श्रेय आपणास मिळवितां येईल. आपण पहा! रामदासांनीं संसाराचें महत्त्व कां गाईलें आहे? तुकोबांनीं संसारी जनाकरितां योग्य अभंग कां रचले? ह्या साधूंनीं जितका परमार्थ सांगितला आहे, तितक्याच योग्यतेचा संसारही सांगितला आहे. मोरोपंतानीं सावित्रीच्या तोंडीं काय घातलें आहे.—

**गृहस्थाश्रमांत सर्व धर्म घडे ।**
**तेणें मळ झडे अंतरीचा ॥**

तेव्हां ह्याचा आपण एकदां विचार करावा, अशी विनंती आहे.

**रा०**—आपण काय म्हणतां ह्याचा अर्थ अद्यापही मला नीटसा कळत नाहीं. ईश्वरभजन करावें. त्यांत काळ घालवावा, असें अद्यापही मला वाटतें. आतां तें काम अवघड आहे, असें तुम्ही म्हणतां, पण मला वाटतें कीं, तें सवईनें आंगवळणी पडेल आणि त्यामुळें देहाचें सार्थक होईल. आतां तुमच्या म्हणण्याप्रमाणें जर तुम्हाला मजकडून कांहीं मदत होण्यासारखी असेल तर, मी आमच्या दिवाणजींना सांगेन.

**स० दे०**—आम्हाला आपल्या पैशापेक्षां आपली स्वतःची जास्त जरूरी आहे. आपण ईश्वरीमार्गाकडे लागूं नये, असें आमचें मुळींच म्हणणें नाहीं. पण योग्य काम तें स्वतःच ईश्वररूप आहे, असा सिद्धांत आहे. साधारण माणसाला तें समजत नाहीं. म्हणून शास्त्रांनीं आणि महात्म्यांनीं असें म्हटलें आहे कीं, कर्म हें ईश्वराजवळ जाण्याची शिडी आहे, आणि आपलीं रोजचीं कामें ह्या

त्याच्या पाहिऱ्या होत. कृष्ण-परमात्मा म्हणतो कीं, आपआपलीं कामें चांगल्या रीतीनें करण हीच सिद्धी आहे.—

**स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ।**
**स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विंदति तच्छृणु ॥**

ह्मणून आम्ही आपल्याला कार्य करावें असें ह्मणतों, आणि तें सुद्धां आपल्या अगर आमच्या स्वार्थाकरितां नसून परमार्थाकरितां, परोपकाराकरितां, ईश्वराच्या दुसऱ्या अनाथ लेंकराचीं दुःखें निवारण करण्याकरितां सांगतों आहों व तें आपण करावें, अशी आमची इच्छा आणि विनंती आहे.

रा०—तुम्ही काय काय कामें करणार आहां आणि त्याचा उपयोग काय ?

स० दे०—आज आम्ही ज्या कामाकरितां आपल्याला बोलवावयाला आलों आहों, तें दवाखान्याचें काम घ्या. त्याच्यापासून किती तरी उपयोग होईल. आपल्यामध्यें कित्येक अशीं गरीब कुटुंबें आहेत कीं, ज्यांना प्रसूतीच्या खर्चाबद्दल, माणसांबद्दल, आणि जागेबद्दल किती तरी त्रास पडतो. शेजारीण आणावी तर उपकार, नोकर मिळत नाहीं, खर्च करण्यास पैसा नाहीं. ह्यामुळें हाल होऊन नाना तऱ्हेच्या व्याधी तिला होतात आणि त्यांतील कित्येक मृत्युमुखीं पडतात. अशांची जर येथें फुकट सोय होऊन उत्तम शुश्रूषा झाली, तर परोपकार आहे कीं नाहीं ? ज्या अनाथ पोरांना लहानपणीं आईच्या अभावीं आबाळीनें मरावें लागतें, तीं वांचतील. ज्या बायकांना नवऱ्याच्या व आप्तेष्टांच्या हलगर्जीपणामुळें औषध पाणी

मिळत नाहीं व ज्यांची गरिबीमुळें वशिल्याखेरीज मोठमोठ्या दवाखान्यांत दाद लागत नाहीं, त्यांना औषधपाणी मिळेल. असे किती तरी फायदे ह्या एकाच गोष्टीपासून आहेत.

रा० — बरं, आणखी ?

स० दे०—अशीं कामें पुष्कळच करण्याजोगीं आहेत. पण आज माणसें कोठें आहेत! युरोप-अमेरिकेकडे तर बायका केवढाले उद्योग करतात. फक्त सार्वजनिक कामाबद्दल उदासीनता हिंदुस्थानाच्याच वाट्याला आलेली आहे. ती आतां घालवून उद्योगीपणांत आपल्याला तिकडील स्त्रियांचें अनुकरण केलें पाहिजे. हल्लीं तिकडच्या स्त्रियांची स्थिती मताभिलाषापर्यंत गेलेली आहे. तितकें आपल्याला नको आहे. कारण, निरुपद्रवीपणा आणि शांतता हे मुळीं आपल्या आर्यस्त्रियांचें ब्रीद आहे. तरी पण असें आहेना, कीं, साप चावला नाहीं तरी सापाला फूत्कार लागतो. त्याप्रमाणें आपणाला जरी पुरुषांवर वर्चस्व गाजवावयाचें नसलें तरी, त्यांनीं आपल्याला उगीच अन्यायाशिवाय पायाखालीं तुडवूं नये, एवढें आपण बघितलें पाहिजे. आणि तेवढेंही जर आपण केलें नाहीं तर आजच्यापेक्षां आपली स्थिती पुढें पुढें जास्त जास्त बिकट होईल. ह्या संसाररूपी गाड्याला दोन्ही चाकांची सारखी आवश्यकता आहे व त्याकरितां दोघांना सारखें ज्ञान पाहिजे. व तें देण्याचा प्रयत्न आपण करावयाचा आहे. आणि तसें झालें म्हणजे बायकांना आपली योग्यता, आपले हक्क चांगले कळूं लागतील व आम्हांला कळतें असें वाटलें कीं, मग हेच पुरुष आम्हांला जास्त आदरानें वागवितील. तसें झालें म्हणजे आपणाला परस्परांना मित्रत्वाच्या नात्यानें मदत करावी

लागेल. कारण, त्यांचे मित्र व स्नेही झाल्यामुळें त्यांची जबाबदारी हलकी करणें व त्यांच्या कार्याची सुव्यवस्था लावणें, ही कामगिरी पत्नीवर अवलंबून राहील. व ती बजावण्याकरितां आपण स्त्रियांनीं आपल्या भगिनींना ज्ञान दिलें पाहिजे. शिवाय हल्लींच्या सारख्या प्रसंगीं डोकीं बिघडलेल्या ह्या पुरुषांना शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. तसें न झाल्यास एकंदर समाजाची हानी होईल.

रा०—आणि ती हानी आपण कशी थांबवणार?

स० दे०—सरकार, ईश्वरानें अशी योजनाच केली आहे कीं, स्त्री आणि पुरुष ह्या दोघांचेंही परस्परावांचून अडावें. दोघानांही एकमेकांच्या साह्यावांचून सुख होऊं नये. एवढा मोठा समुद्र, पण तो जर म्हणेल कीं, मी नद्यांची मदत घेणार नाहीं तर कांहीं दिवसांनीं तो कोरडा पडेल व त्याच्या पोटांत राहणारे सर्व प्राणिमात्र त्याला विचारीनासे होऊन स्वैरसंचारार्थ निघून जातील, आणि त्याचें स्वतःचें वर्चस्व नाहींसे होईल. त्याचप्रमाणें पुरुषांचें आहे. त्यांचें सर्व वर्चस्व, सर्व व्यवहार, स्त्रियां करितांच आहेत. खाणींतून जरी सोनें काढलें तरी, अलंकाराकरितां स्त्रियांनीं खरेदी केलें नाहीं कीं, फुकट पडेल. रत्नपारख्यांची तीच स्थिती होईल. सारांश, संसारातील बहुतेक गोष्टी पुरुष स्त्रियांकरितांच करित असतात व त्याचा मोबदला म्हणून स्त्रिया त्यांच्यावर निस्सीम प्रेम करतात. त्यांच्या गोडवाणीशिवाय आणि कोमळ स्पर्शाशिवाय पुरुषांना सुख होत नाहीं, असा शरीरधर्म आहे. करितां हल्लींच्या परिस्थितींत आपण जरा त्यांच्याशीं उलट जोरानें वागलें म्हणजे ते

आपोआप शुद्धीवर येतील. आणि मग आपल्या सारख्या साध्वी पतिव्रतांना पतिवियोगाचें दुःख सोसावें लागणार नाहीं.

**रा०**—सरस्वतीदेवी, तुम्ही साक्षात् सरस्वती आहां, असें मला वाटतें. आणि सारखं आपल्या सहवासांत राहावेसें वाटतें. तरी मी आज आपल्याला, उद्याच्या कार्यापुरती येतें, एवढें कबुल करतें. बाकीच्याबद्दल मागाहून विचार करीन.

**स० दे०**—हा आम्हां गरीब भगिनीवर्गावर अनुग्रहच म्हणावयाचा—चलाग बायांनों, आतां आपण उठूं. आज आपण त्यांचा पुष्कळ वेळ घेतला.

( एक बाई कुंकु लावते. सर्व उठतात. )

---

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

( कुमुदिनीचा दिवाणखाना. पडदा उघडतांच कुमुदिनी नवीन डाक्टरीण सरला व शांता सुद्धां येते. दारांत जोडे काढतांच कुणबीण ते पुसून ठेवते व ह्या सर्व खुर्च्यावगैरेवर बसतात. )

**शांता०**—आजचा एकंदर समारंभ चांगला पार पडला नाहीं ?

**कु०**—होय, आणि त्यांत ह्या डाक्टरीणबाईंनीं स्वार्थत्यागानें पुष्कळच भर घातली.

**डा०**—कसलें, कांहीं नाहीं. आपण सगळ्याजणी मिळून जें एवढें मोठें कार्य करीत आहां, त्यांत मी एवढासा हातभार लाविला म्हणून काय झालें! विलायतेहून मी हिंदुस्थानांत यावयास निघतांना मला शांताबाईचें पत्र आलें आणि तेव्हांपासून आपली संस्था पाहावी, अशी माझी उत्कंठा वाढली. पुढें तुम्ही मुंबईस येऊन माझा जो सन्मान केला, तेव्हांचा तुमचा माझ्याविषयींचा आदर आणि प्रेम पाहून तर माझी उत्कंठा वाढूं लागली व त्यानंतरच्या आपल्या सहवासानें तो कायमचा घडावा, असें मला वाटलें. त्याकारितांच मी आज ह्या कार्याला आपल्याला वाहून घेतलें आहे. त्यामुळें माझ्या हातून आपल्या कार्याला व ह्या संस्थेला जर कांहीं उपयोग झाला तर त्याचा मोबदला आपल्या सर्वांच्या सहवासाच्या रूपानें मिळेलच. तेव्हां मी केलें त्यांत कांहीं विशेष आहे, असें नाहीं. उलट आपण

सर्वांनीं मिळून आज जो माझा सन्मान आणि गौरव केला, त्याबद्दल मी आपली सर्वांची फार ऋणी आहे.

**कु०**—आतां ह्या गोष्टीबद्दल आपण परस्परांनीं परस्परांचे आभार मानण्यापेक्षां आपण दोघीही शांताबाईचे आभार मानूं म्हणजे झालं.

**शां०**—वा ! हें मात्र अगदीं योग्य. अहो नुसतें बोट दाखवावयाला माझें काय हो जातें !

**स०**—अहो खरें, पण तें दाखवणारीं माणसें तरी कोठें आहेत ! आणि दाखविलें तरी पाहणारीं नाहींत. पण आमच्या राणीसाहेबांनीं मात्र आज पाहिलीं बाई ! नाहीं तर ती एक काळजीच पडली होती.

**कु०** —होय. पण सर्व चांगल्या तऱ्हेनें आणि निर्विघ्नपणें पार पडलें. कुमारी सरस्वतीदेवींनीं आपलें भाषणही त्यांच्या दर्जाला साजेसेंच केलें. आणि त्यांत बायकांच्या चातुर्मासाच्या दानधर्माचा ओघ कसा वळविला पाहिजे, ह्याचें विवेचन फार मार्मिकतेनें केलें. डॉक्टरीणबाईही अशा संस्थांची उपयुक्तता वगैरे विषयांवर चांगलें बोलल्या. तेथील सामान-सुमान आणि व्यवस्थेशीरपणानें केलेल्या तजविजी पाहून राणीसाहेबही खूष झाल्या.

**डॉ०**—होय तसें दिसलें खरें आणि आपण आपल्या शेवटल्या आभार प्रदर्शनार्थ केलेल्या भाषणानें तर सर्वांना गारेगार केलें.

**शां०**—देवींचें भाषण आणि ह्यांचा समारोप ह्या भाषणांचा असा परिणाम झाला कीं, ह्याला नांवें ठेवणाऱ्या दोन सरदारांच्या बायांनीं लगेच आंकडे घातले.

डॉ०—अहो एवढ्यानें काय झालें. जों जों आपलें कार्य वाढेल तों तों लोकानां त्याची किंमत कळेल. मात्र तेवढे ते लहान मुलांचे कपडे आणखीं थोडे करवा. कारण मोठ्या बाया आल्या तर, त्यांचीं तींच लुगडीं वगैरे धुववून ठेवतां येतात. पण जीं रोगीं मुलें येतात, त्यांचे कपडे बहुशा गलिच्छ असतात. कारितां त्यांचे कपडे बदलल्याशिवाय गतच नसते.

कु०—होय त्याप्रमाणें व्यवस्था करावयास शांताबाईना सांगितलें आहे.

डॉ०—बरं तर, मग मी आतां जातें, बराच उशीर झाला.

कु०—बरं आहे, या. (जाते.)

शां०—ताईसाहेब आपल्या सांगण्याप्रमाणें मी कापडवाल्याला आणि शिंप्याला बोलावणें पाठविलें आहे.

कु०—बरं तर, ते इतक्यांत येतीलच. मीही दिवाणजींना एक शिपाई पाहण्याकरितां सांगितलें आहे. म्हणजे तूर्त अडीव व्यवस्था झाली म्हणावयाची.

कुणबीण—बाहेर कापडवाला आणि दर्जी आले हायती.

कु०—बोलाव त्यानां आंत.

(कापडवाला आणि शिंपी येतात.)

शां०—ताईसाहेब, दवाखान्यांतल्या कापडाबरोबर आपल्या विद्यालयाच्या विद्यार्थीनींना शिवण्याकरितां कापड घ्यावयाचें आहे.

कु०—बरं घेऊन टाका; हं शेटजी कापड काढा पाहूं.

मारवाडी—कपडा कोणाकरितां पाहिजे, तें सांगा.

कु०—अहो आमच्या मुलींनां शिवण्याकरितां म्हणून कापड घ्यावयाचें आहे, तुम्ही काय नमुने आणले असतील ते दाखवा.

मा०—नाहीं बाईसाहेब, मग आम्ही नाहीं देणार. कारण, आमचं कापड सरकारवाड्यांत जातं.

कु०—म्हणजे काय?

मा०—म्हणजे आम्ही जर आपल्याला कापड दिलें, तर बायकांना कपडा दिला म्हणून सरकार दंड करील. ( जाऊं लागतो. )

शां०—अहो शेटजी, थांबा. काय तें पुरतं सांगाल तर खरें.

मा०—नाहीं नाहीं, गरीबानें कोठें मरावें. ( जातो. )

कु०—अरे, हा शेटजी तर चमत्कारिक दिसतो. ( शिंप्याकडे पाहून ) तुम्हीं कातर वगैरे आणलें आहे ना? तर मग शांताबाई तें आंतलें ठाण आणून द्या तूर्त शिवायला.

शां०—बरं आणतें. ( उठते. )

शिं०—थांबा बाई जरा थांबा. आधीं कपडे कोणाचे शिवायाचे तें सांगा.

शां०—लहान मुलांचे.

शिं०—लहान मुलांचे खरे, पण मुली कां मुलगे.

शां०—म्हणजे ह्याचा अर्थ काय? सर्व एकाच तऱ्हेचे शिवावयाचे आहत, मग ते कोणाच्याही उपयोगांत येवोत.

शिं०—तऱ्हा नका बोलूं, मला सर्व तऱ्हा येतात व लहान मुलांचे कपडे समजतात. पण त तुम्ही मुलगी असणाऱ्या लहान मुलाला वापरणार, का मुलगे असणाऱ्या लहान मुलाला वापरणार ?

कु०—अरे बाबा, आमच्या दवाखान्यांत येणाऱ्या रोगीमुलां-करितां कपडे पाहिजे आहेत; मग पुढें यणारा रोगी मुलगी येईल, कां मुलगा, तें आम्ही काय सांगावें.

शिं०—तर मग बाई माझ्या हातून आपलें काम होणार नाहीं. कारण, बायकांशीं संबंध ठेवल्यास व त्यांचे कपडे शिवल्यास आम्हांला सरकारी शिपाई चावडीवर नेईल. नको बाबा.—( जातो. )

स०—काय चमत्कार आहे, आतां हें खूळ बरेंच पिकलें वाटतें. काय तर म्हणे, बायकांना कापड-चोपड सुद्धां मिळूं नये. धंदे-वाल्यांनीं बायकांचें काम सुद्धां करूं नये.

शां०—हा एक प्रकारचा जुलूमच, नाहीं कां ताईसाहेब ?

स०—नुसता जुलूम म्हणून काय उपयोग, त्यांची खोड मोडेल अशी कांहीं युक्ति काढली पाहिजे.

कु०—अगदीं बरोबर बोललीस आतां. ह्याला एकच युक्ती. ह्यांच्याशीं अप्रत्यक्षप्रतीकार केला पाहिजे.

स०—कबूल पण तो कसा करावयाचा, तें आपण सांगा, म्हणजे आम्ही त्याप्रमाणें वागूं .

कु०— अग त्यांत काय अवघड आहे ! आपण सर्व स्त्रियांनीं आतां असा निश्चय करावयाचा कीं, सर्व उद्योग स्त्रियांनींच करावयाचे आणि सर्व व्यवहार स्त्रियांनींच ठेवावयाचा. आपल्या कंपूतील

कोणीही स्त्रीनें कोणच्याही पुरुषांशीं व्यवहार ठेवावयाचा नाहीं. आपल्या महिला विद्यालयांतील अध्यापिकानां सध्या तें काम सोडून आपल्या ह्या संपांत सामिल व्हावयास सांगा. म्हणजे एकीनें कापडाचें दुकान घालावें, एकीनें वाण्याचें घालावें. अशा तऱ्हेनें जें जें अडेल तें तें करावें. शिंप्याचें काम वरच्या वर्गाच्या मुलींकडून करवा आणि गावांत एक जाहिरनामा अगर दवंडी देववा.

**शां०**—खरेंच ताईसाहेब ! अशानें मोठी बहार होईल.

**कु०**—एक माळीण आली आहे, आणि आपल्याशीं भेटायाचें म्हणतिया.

**कु०**—तिला आण जा.

**मा०**—( येऊन ) बाईसाहेब, मी माळीण हाय; पण माझ्या दादल्यानें मला हांकून दिली हाय, तो म्हणतो सरकारचा असा हुकूम हाय कीं, अस्तुरी नग.—तवा मी चाकरी शोधण्यापाईं आपल्याकडे आलु या.

**कु०**—( सरलेला ) अग, हा चमत्कारच म्हणावयाचा, बरं झालं; ही माळ्याचीच बायको आहे, तिला बागेची माहिती असेल, तर आपण बायकोच माळी ठेवूं.

**शां०**—बाई, तूं माळ्याची बायको आहेस; तेव्हां तुला थोडी फार झाडांची माहिती असेलच.

**मा०**—व्हयजी, आमचें कामच हायना. बाप्ये काय करतात ? अर्ध काम तर आम्ही करतुया. तेवढें फूल तोडूनशान हार देण्यापुरतं पुढं, आणि पोस्त मिळालं कीं, झोंकली बाटलाबाई आणि

पडलं गटारींत. ह्या बयानं घरादाराचं वाटोळं केलं-सारा दिवस वणवण करावं, चार दोन पैस आणाव, त्यांतल अर्ध नवऱ्यासनी झोंकाया द्याव, बरं न द्यावं तर मारबी मिळतो, काय करावं, करम आमचं.

कु०--खरं बाई, अगदीं खरं बोललीस. ह्या बयेनं तर गरिबानां धुळीला मिळवलं खरं. बरं आतां तुला आम्ही आमच्या बागेवर माळ्याच्या कामावर नेमतों. आज आठ रुपये पगार मिळेल; पण तूं चांगलें काम करतेस असें दिसलें कीं, हळुहळू बारा रुपये पर्यंत वाढवूं. आहे कबूल ?

मा०--व्हायजी ताईसाब, तो परमु तुमचें कल्याण करो, (स्वगत) घे म्हणावं घे, मला हांकललीस पण आतां मी तुझ्या इतके पैसे मिळवीन आणि ते जवळ ठेऊनशानीं दागिन करीन; लई चंगळ झाली. (जाते)

कु०--बरं तर मग आपणही आतां उठुंया जेवणाची वेळ झाली (उठतात)

---

## प्रवेश २ रा.

स० दे०--(स्वगत) काय चमत्कार आहे, माझें सर्व आयुष्य ईश्वरानें चमत्कारमय बनवलें आहे! लहानपणीं बापानें मला शिकविलें, आणि पुढें विद्वान् मुलगा बघून दिली. त्यांच्या बापानें त्यांचं न ऐकतां लग्न केलें, तेव्हां ते पुढें संधी साधून

पळून गेले. मग मी पायगुणाची ठरल्यामुळें माहेरी आलें. तेथें येतांच थोड्यांच वेळांत आईबाप वारले, मी विद्या केली आणि माझे सर्व विचार तिकडच्या उलट झाले, तेव्हां आपल्या हातून आपण मिळविलेल्या ज्ञानाचा कांहीं उपयोग व्हावा म्हणून मी कुमारिका म्हणून बाहेर पडलें. कारण तसें नांव घेतल्यानें लोकांना आपली सर्व हकीकत सांगत बसावयास नको. आणि खरें पाहतां यांत वाईट कांहीं नाहीं. पण मी जेव्हां घरून निघालें, तेव्हां इतक्या लवकर स्त्रियांच्या उन्नतीसंबंधीं कामगिरी करावयाची वेळ मला येईल असें वाटलें नव्हतें, व कार्य कसें करावें, ह्याच्या विचारांत मी गढून गेलें होतें. पूर्वी आम्हाला ज्ञान होतें व हल्लीं पाहिजे अशी माझी पक्की समजूत झाली व ज्याला सारासार विचारशक्ती आहे, ते-ही हेंच म्हणतील. पण तें काम व्हावें कसें? हा एक मोठा प्रश्न माझ्यापुढें होता. कोणालाही खरे जरी असले तरी दोष दाखवलेले आणि कडू बोललेलें पत्करत नाहीं. मग स्त्रिया तर काय बिचाऱ्या अज्ञानी. बरं गोड बोलावयाचें म्हटलें म्हणजे सत्य, हितकर, व प्रिय असें बोललें पाहिजे. पण ती कला तर फार अवघड. तेव्हां ह्या अज्ञान अंधकारांत पडलेल्या बायकांना गोड बोलून त्यांचे दोष दाखवून सुधारणें म्हणजे केवढें अवघड काम! पण मी येथें यायला व येथील राजाला कोणी वेडा साधू भेटून त्यानें हा घोटाळा करावयाला एकच गांठ पडली. त्यानें केवढें कार्य झालें? केव्हां केव्हां वाईटांतून चांगलें होतें म्हणतात तें असें. ह्या पुरुषांच्या बंडानें बायकांना आपलेपणाबद्दल शुद्धीवर आणलें. आम्ही सांगितलेल्या गोष्टी त्यांना पटूं लागल्या; व आपली उन्नती आपल्या

हातांत आहे ही गोष्ट त्यांच्या मनांत नीट ठसली. शिवाय ह्या कार्याला खुद्द राणी मिळाल्यामुळें पुष्कळ बायका आमच्याकडे सहानुभूतीच्या नजरेनें बघावयास लागल्या. त्यानें आमच्या कार्यास भराभर यश येत आहे. ज्याचा हिशोब पाहिला असतां, खरोखर पुरुषांनींही तोंडात बोटें घालावीं! हा तरी ईश्वरी प्रसाद आणि नेमानेमच म्हणावयाचा. कारण जर मला कुमुदिनी आणि तिच्या सख्यासारख्या स्त्रियांचें साहाय्य मिळालें नसतें, तर मी एवढ्या अल्प अवधींत काय काय कामें केलीं असतीं? पण ज्याअर्थी परमेश्वराचाच वरद हस्त आम्हा स्त्रियांवर आहे, त्याअर्थी सर्व निर्विघ्न पार पडावयाचेंच. म्हणूनच स्त्रिया ह्या ईश्वराचीं आवडतीं मुलें आहेत, असें म्हटलें आहे; तें कांहीं खोटें नाहीं. (जरा थांबुन हंसून) पण स्त्रिया ईश्वराच्या लाडक्या, का पुरुष? हा एक मोठा प्रश्नच आहे. कारण विकारानंद साधु म्हणतो, स्त्रिया नरकाचें द्वार आहेत; आणि हेंच तत्त्व तो सर्वांच्या मनांत ठसवावयाचा प्रयत्न करतो आहे; आणि नांवाप्रमाणें साधू असणारे हे साधुसिंह–महाराजही वेड्यासारखे त्याच्या नादीं लागले आहेत. त्यांना काय करावें? त्यांनीं आपल्या अनुयायांनाही त्याचप्रमाणें करावयास लावलें आहे; आणि त्या सर्वांनीं मिळून हें एक पुरुषांचें बंडच प्रस्थापित केलें आहे. काय वेडेपणा आहे? असें करण्यानें का ह्यांचा निभाव लागणार आहे. निसर्गानें उत्पन्न केलेली जोडी का कोठें मानवी–प्रयत्नानें नाहींशी होते? स्त्रिया आणि पुरुष हीं मुळीं एकमेकावर अवलंबून राहावयाचीं, तीं अशी निराळी ठेवून भागेल का? असें जर कायमचेंच झालें, असें धरून चाललें तर जगांतील लहान बालकांचें

बोबडे बोल ऐकूं येईनासे होतील. अशानें कांहीं वर्षें हिंदुस्थानांत माणसांची तूट पडणार नाहीं खरी, पण समाजरचना बिघडेल! पूर्वीं म्हणे एकदां बायकांनीं बंड केलें होतें; पण त्यांतील अधिकाऱ्यांना प्रथम फोडून मग राणीला अर्जुनानें वश केलेन, असें दाखवून बायकांकडे कमीपणा दाखवलेला आहे. पण मी म्हणतें ह्यांत पुरुषांकडेच कमीपणा येतो! कारण अर्जुनानें सतत त्यांच्या राज्यांत राहून नाना तऱ्हेनें त्यांना फोडलें आहे. पण आतां पुरुषांच्या बंडाची वेळ आली आहे. आतां आम्हांला तें मोडावयाचें आहे. पण आम्ही पुरुषांसारखें फसवून तें नाहीं मोडणार, तर जें सत्य आहे, परमेश्वरानें सांगितलें आहे, व महात्म्यांनीं लिहून ठेविलें आहे, तें पुरुषांकडून कबूल करावयास लावून मोडूं. आणि त्यांना त्यांचीं कर्तव्यें काय आहेत, ह्याची जाणीव करून देऊं. हे पुरुष स्वतः कांहीं करीत नाहींत, आणि आम्हाला कांहीं करूं देत नाहींत. हल्लींचा काळ स्वस्थ बसण्याचा नाहीं. जगांत कोण वडामोडी चालल्या आहेत! कित्येक ठिकाणीं नवीन शोध लागत आहेत, नवीन धंदे निघत आहेत. अशावेळीं आमच्या पुरुषांनींच तेवढें विश्वविद्यालयाच्या पदव्या घेऊन ठराविक धंद्यांत पडावें काय! त्यांनीं स्वतः उद्योग केले पाहिजेत. आम्हाला उद्योग करावयास शिकविलें पाहिजे. आमच्या ज्ञानार्जनाची सोय केली पाहिजे. म्हणजे आम्हीही त्यांना त्यांच्या कार्यांत मदत करावयास तयार होऊं. असें मला किती तरी वाटतें. किती तरी उद्योग आमच्या हातून सध्याच्या स्थितींत होण्यासारखे आहेत. धार्मिक चर्चा. ह्यांत बायका-मुलांपुरती कामगिरी स्त्रिया चांगली करतील.

प्राथमीक शिक्षण. चांगल्या स्त्री-शिक्षक उत्पन्न केल्यास त्या मुलांच प्राथमिक शिक्षण बघतील. परिचारिका वगैरेसारखे पुष्कळ उद्योग आहेत. निदान इतकेच का होईनांत तरी पुष्कळ झालें. स्त्रीजातींचे नैसर्गिक गुण खुलून त्या जर आपली प्रपंचांतील योग्य कामगिरी बजावून ईश्वरभजनीं लागतील तर, केवढें कार्य होईल! अहाहा! ही कल्पना सुद्धां मला आनंद देते आहे. मग प्रत्यक्ष तसें झाल्यास किती संतोष होईल! आज तसें होईलसें वाटतें आहे. कार्यारंभ तर ठीक नाहीं, चांगलाच झाला आहे. राणीसरकार आणि कुमुदिनी ताईसाहेबांसारखीं माणसें हातांत आलीं आहत. सर्व ठीक आहे. आतां त्या पुरुषांचें बंड मोडलेंच म्हणून समजा. ( जाते ).

---

## प्रवेश ३ रा.

( विकारानंद प्रवेश करतो. )

**वि०**—काय मजा आहे बघा, मी जेव्हां प्रथम बायकांचें प्रस्थ मोडावयाचें ठरविलें, तेव्हां हें कार्य इतक्या लवकर साधेल, असें वाटलें नव्हतें, पण आतां काय; राजा तर माझा शिष्य झालाच. त्याच्या सरदार—लोकांनींही आपल्या स्त्रियांचा त्याग केला. तेव्हां सध्या तर स्त्रियांची नांगी बरीच मोडल्यासारखी झाली आहे. आतां सध्या त्यांच्यावर चांगली नजर ठेऊन त्यांना वैराग्यमार्गाला लावून मग ईश्वराकडे लावलें पाहिजे. आणि अशा तऱ्हेनें जर सर्व पुरुष माझें ऐकतील आणि संसारबंधन सोडून स्त्रियांपासून दूर होऊन आत्मस्वरूपाकडे वळतील तर, किती तरी जनांना मी ईश्वरी मार्गा-

कडे लावल्याचें श्रेय मला मिळेल, आणि जनांचा उद्धार होईल. मग चोंहींकडे पूर्वीसारखे ऋष्याश्रम दिसतील, आणि ह्या आपमतलबी दुष्ट स्त्रियांचा जगांतून नायनाट होईल. अहाहा ! तेव्हां काय मजा होईल ! तरी ही माझी इच्छा पूर्ण व्हावी, आणि ह्या कामांत राजा व त्याचे सरदार वगैरेंना मानसिक बळ मिळावें, म्हणून तपश्चर्येला आरंभ करावा हेंच बरें. चला तर शुभस्य शीघ्रम्.

( जातो. )

---

## प्रवेश ४ था.

( बागेचा देखावा, राजा व एक सरदार आणि एक हुजऱ्या येतात. )

**राजा**—( बागेंत हिंडून पाहून ) अरे ही बाग अशी सुकत कां चालली ? हे गुलाबाचे ताटवे असे वाळले कां ? ह्याची कोणी काळजी घेत नाहीं कां ?

**स०**—वाळलेले दिसतात खरे. असें कां बरें ? ह्याच्यावर तर चांगला माळी आहे. ( शिपायास ) अरे बोलाव त्याला ( शिपाई जातो. )

**रा०**—काय करावें ? दरबारांतून उठलें म्हणजे मन रमविण्याकरितां कोठें तरी फिरावयास जावें म्हणतों—पण मुळीं चैनच पडत नाहीं; असें कां बरें व्हावें ? महालांत गेलों, तेंच; बागेंत आलों, तेंच; म्हणूनच आम्हाला आत्मानुभव येत नाहीं. उगिच नाहीं, नाहीं तर आमचे गुरुजी समाधीसुखांत कसे दंग असतात; आणि आमचेंच कसें लक्ष लागत नाहीं, कोण जाणें !

( शिपाई माळ्याला घेऊन येतो ).

**शि०**—( माळ्यास ) सरकार काय म्हणतात? कीं, ही बाग वाळली कशी?

**मा०**—जी सरकार सुकली खरी, पण काय करावं? सरकारच्या हुकमापरमाणं बायकोला घालवली. आतां घरांत चार पोरं, तवा भाकर करावी लागती. समद काम बघावं लागतं. त्यांत सारा ईळ जातो. थोडं पाणीबी घालतो, पण सरकार भाकरी करायची आणि पोरं संभाळायची सव नाय तवा मग थकतो, आणि जरा कलंडतोबी.

**रा०**—अरे असा भाकरी करायला किती वेळ लागणार, फारतर एक तासभर; म्हणून इतकी सुकावी का!

**मा०**—सरकार तास भर कां कीतीबी वाडुळ लागतो. आणि काय ईतकबी करून तिची सर नाय येत. तें तर बायकाचें काम बायकाच करूं जाणे. माझी घरधनीण होती तर, आम्ही दोवं एखाद वेळ लई झगडावं, तरी बी मला टाकून शेनी तुकडा खात नव्हतीं. एवढं काईबी मिळालं कीं निसावं, करावं आणि त्याचें कोरड्यास करावं; मी जरा रागावूनशानीं निजलों कीं, मला दहावखुत बोलवावें-काम बी करूं लागावें, काय सांगू सरकार; तिची पीरत पण म्यां मुर्खानें कीं हो घालवली.

**शि०**—अरे लेका, सरकार तुला झाडाचें विचारतात आणि तूं लावलं बायकोचं रडगाणं.

**मा०**—तसं नाहीं हो, जरा तोंडाला आलं ते बोललोजी. असं रागावुं नकाजी.

**रा०**—बरं बायको टाकली म्हणून वाईट काय झालें? जी गोष्ट चांगली ती राजानें प्रजेकडून करवलीच पाहिजे. रुक्मांगदराजानें

नाहींका सर्वांनां उपवास घालून उद्धरलेंन? चालायचेंच. आतां तूं असं कर, तुझ्या हाताखालीं आणखीं दोन माणसें जास्त ठेव. पण बाग दुरुस्त कर.

मा०—जी सरकार ( लवून मुजरा करून निघून जातो. )

स०—सरकार ! काय गम्मत आहे बघा. हा मांळी पण ह्याला ळेकालासुद्धां बायकोबद्दल काय वाटतें बघा.

रा०—अहो प्रेम हें जातीवर का वाटलें आहे. तें सर्वांनां सारखेंच. पण त्या प्रेमापासून मनाला ओढून आळा घालून ईश्वरभजनी लावलें पाहिजे. तरच देहाचें सार्थक होईल.

स०—खरें आहे सरकार ! आणि त्या करितां मी रोज पोथी जास्त वाचीत असें. पण त्यांत बायकांच्या गोष्टी फार यावयास लागल्या, तेव्हां आतां तें सोडून माळ जपतों, आणि तासभर गुरुजींजवळ बसतों.

रा०—हें ठीक करता. संतसमागमाशिवाय संसारांतून मन उडणार नाहीं, म्हणून मलासुद्धां वाटतें कीं, स्वामीमहाराजांच्या सन्निध राहावें, म्हणजे मन चंचल होणार नाहीं. आणि ही उदासीनता जाऊन शांति येईल; हल्लीं मी खातों, जेवतों. पण कशांत गोडी नाहीं. पानावर बसतों, उठतों, झालं. जेवलों कीं, पुढें काय ? नोकर चाकर निजतात, इकडे तिकडे जातात, मी आपला एकटा. बरं त्यानां कोणाला जवळ बसवावें तरी, त्यांच्या त्या बोलण्यांत गोडी, मृदुता, नाहींच मुळीं. सारांश काय, मनाला कोठें शांती नाहीं. असो आतां जरा करमणूकीकरितां राज्यकन्येला घेऊन ये म्हणून युवराजाला सांगितलें.आहे, तो बहुतेक आतां येईलच.

शि०—सरकार युवराजांची स्वारी आली आहे.

रा०—येऊंदे ( इतक्यांत युवराज येतो. )

शि०—आलेच ते.

( युवराज प्रवेश करून प्रणाम करतो. )

रा०—चंद्रकांता, राजकन्या कोठें आहे ! ती मागें कां राहिली?

चं०—महाराज ती येत नाहीं.

रा०—कां बरें, ती कांहीं आजारी आहे का ?

चं०—नाहीं. पण मासाहेबांचा निरोप आला कीं, आम्ही कांहीं तिला कोणाही पुरुषापुढें पाठविणार नाहीं.

रा०—काय? राणीचा निरोप आणि तो मला आला? छे! कधीं होणार नाहीं. नीट माझें नांव सांगितलें नसशील.

चं०—नाहीं महाराज, मी नीट पुन्हा निरोप पाठविला कीं, महाराजांनीं मुद्दाम भेटावयासाठीं ताईला बोलावलें आहे.

रा०—हां! हेंच तें, निरोप कां पाठिवलास! तूं कां नाहीं गेलास?

चं०—महाराज आपण मला आज्ञा नाहींका केली, कीं मी मासांहेबांच्याकडे जाऊं नये, आणि कोणाही स्त्रीचें मुखावलोकन सुद्धां करूं नये म्हणून.

रा०—खरेंच, मला अगदींच स्मरण नाहीं. म्हणून तिनें असा निरोप पाठवला कां? कसा पाठवला पुन्हां सांग पाहूं.

चं०—जसा तुम्ही पुरुषांनीं स्त्रियांचें मुखावलोकन सुद्धां करावयाचें नाहीं, म्हणून नेम केला आहे, तसाच आम्ही स्त्रियांनीं सुद्धां

असा नेम केला आहे कीं, कोणाही पुरुषाचें तोंड पाहावयाचें नाहीं. व त्यांच्याशीं कोणच्याही प्रकारचा संबंध ठेवावयाचा नाहीं.

रा०—असें कां ? एकूण ह्या आमच्या बायका आमच्या वरचढ होणार ! आणि आम्हाला असे उद्दाम निरोप पाठवणार ? म्हणजे जशा कांहीं आजच आम्हीं बांगड्या भरल्या. मला राणीशीं बोलावयाचें नसलें म्हणून काय झालें ? राणीला शिक्षा केलीच पाहिजे. सरदार प्रधानजीनां बोलवा. (इतक्यांत प्रधान प्रवेश करून मुजरा करतो.) आं तुम्ही इकडे कोणीकडे ?

स०—आतांच सरकार आपली आठवण करीत होते.

प्र०—तर मग मी वेळेवरच येऊन पोचलों म्हणावयाचा. काय आज्ञा आहे ?

रा०—आतां माझ्याकडे राणीकडून एक उपमर्दकारक निरोप आला आहे. त्यामुळें राणीला शिक्षा करावयाची आहे; तेव्हां ह्या कामांत आपल्या सल्ल्याची जरूरी आहे.

प्र०—असा काय निरोप आहे ? तो मला कळण्याजोगा आहे का ?

रा०—हो त्यांत काय हरकत आहे. मला कोठें चैन पडेना. म्हणून करमणुकीकरितां मी राजकन्येला बोलावणें पाठवलें होतें; तर निरोप आला कीं, आम्हीही तुम्हा पुरुषांप्रमाणेंच निश्चय केला आहे कीं, पुरुषांचें दर्शन घ्यावयाचें नाहीं. सबब पाठवीत नाहीं.

प्र०—होय, उत्तर जरा चमत्कारिकच; पण मी म्हणतों वाईट काय ! आपलें अनायसें काम होईल; आणि बायकांच्या मोहिनीजाळानें आपण फसावयाचें भय नाहीं. असें मला वाटतें.

रा०—होय तें खरें, आपलें काय अडलें आहे; पण बायकोनें नवऱ्याला असा निरोप पाठवणें म्हणजे अपमान नव्हे का? तेव्हां माझा असा मानस आहे कीं, त्यांना आम्ही पुरुषांनीं बांधलेला राजवाडा सोडावयाचा हुकूम करा.

प्र०—सरकार तेंच सांगण्याकरितां मी येथें आलों होतों. राणीसरकार वाडा सोडून गांवाबाहेरच्या शिवालयाजवळ पर्णकुटी बांधून राहिल्या आहेत; तेव्हां आतां आपण घालवावयाची आवश्यकता नाहीं. आणि मी म्हणतों कीं, जर आपण पुरुषांनीं त्यांना सुख देण्याचा नवरेपणाचा अधिकार सोडला, तर शिक्षा करण्यापुरता नवरेपणा आपल्याजवळ कोठून. मग त्यांनीं असं जशास तसं केल्याबद्दल आपल्याला राग कां यावा! उलट बरें झालें. स्त्रियांच्या दूर जाण्यानें अनायासें मोक्षप्राप्ती आणि स्वतंत्रता, आणि म्हणूनच कीं काय गावांतील बऱ्याच स्त्रियांनीं पुरुषांना स्वतंत्र केलें आहे, व आपला अपमान होऊं नये, म्हणून दूरदर्शी राणीसाहेबांनीं गांवाबाहेर जाऊन शिवालयामध्यें उग्र तपश्चर्येला आरंभ केला आहे.

रा०—स्त्रियांनीं पुरुषांना स्वतंत्रता दिल्याचें काय म्हणालात.

प्र०—म्हणजे, जेव्हां गांवांतील सर्व धंदेवाले लोक बायकांना बहिष्कार घालूं लागले; तेव्हां त्यांनींही संप करून पुरुषांना बहिष्कार घातला आहे, आणि गांवाबाहेर जसें कांहीं दुसरं एक स्त्रीराज्य वसविलें आहे. तेथें बायकांनीं सर्व जातींचीं दुकानें घातलीं आहेत. तेथें सोनार, शिंपी, वाणी, कापडवाला, सर्व बायकाच.

चं०—हं? इतकें सगळें करण्यास त्यांच्यांत कोणीतरी पुढारी असेलच.

प्र०—होय, तें काम कुमुदिनीताई करीत आहेत.

रा०—म्हणजे कोण ?

प्र०—आपले पहिल्या दर्जाचे सरदार राजे मानसिंग यांची कन्या.

रा०—होय, बरोबर. तिचें नांव कुमुदिनी आहे खरें. त्याला तेवढी एकच मुलगी असून, त्यानें तिला चांगलें शिक्षण दिलें आहे. एवढें आम्ही ऐकलें होतें. पण तिची मजल येथपर्यंत जाईल, अशी कल्पनाही नव्हती.

चं०—अशी ती किती शिकलेली आहे !

प्र०—त्या का! त्या इंग्रेजी चांगलें शिकल्या आहेत. संस्कृतांतही त्यांची चांगली गती आहे. कांहीं दिवस त्या मुंबईस मेडिकल कॉलेजांत होत्या. पण पुढें तें सोडून त्या आल्या. त्या स्वरूपानें जशा सुंदर आहेत तशा गुणानेंही आहेत. पण सध्या त्यांनीं हा मार्ग स्वीकारला आहे.

रा०—हें पाहा, प्रधानजी ! ह्या प्रापंचिक गोष्टी ऐकून मला अगदीं कंटाळा आला आहे. व माझें मन कशांतच लागत नाहीं, तेव्हां मी जरा गुरूजींच्या पर्णकुटीकडे जातों. म्हणजे मन शांत होऊन तें ईश्वराकडे लागेल. ( तो आणि सरदार जातात. )

चं०—प्रधानजी, मलाही कंटाळा आला आहे, म्हणून मी राजवाड्यांत जातों, आणि आमच्या मंडळीला खेळावयास बोलावणें पाठवतों; आपण येणार का येथें हवा खाणार ?

प्र०- मी का ! आतां घराकडे जाईन म्हणतो, कारण थोडें काम आहे. आपण जावें. ( चं. जा. )

प्र०—( स्वगत ) काय मजा आहे ! आमच्या राजेसाहेबांनीं निश्चय केला. राणीसाहेबांनीं केला. आम्हाला नाहीं हा पंथ धरतां येत नाहीं तो येत. दोन्हीकडे पंचाईत. बरं सोडून घरीं वसूं म्हटलें, तरी ह्या गादीचें पुष्कळ दिवस अन्न खाल्लेलें तेव्हां तसं-ही करतां येत नाहीं. एकदां हें सुयंत्रित झालें म्हणजे बरं. बाकी हा निरोप आमच्या राणीसाहेबांचा दिसत नाहीं. त्यांना कोणी गुरू असावासें वाटतें. बाकी, प्रसंग काय शिकवित नाहीं ! बरं आहे. काय होईल तें पहावं झालं. ( जातो. )

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

( दोन तरुण सरदार प्रवेश करतात ).

**रघुनाथराव**—काय हो तुकोजीराव, हल्लीं आपली चैन आहे नाहीं. एवढाल्या जागा, चार गडी-माणसें, पुष्कळ पैसा, मजा आहे, नाहीं ?

**तु०**—होय आहे खरी, पण ती झाली केव्हां, चंद्रकान्त महाराजांना राज्य मिळालें, तेव्हां ना ?

**र०**—होय तें तर साहजिक आहे; मोठ्या वयाच्या मालकापेक्षां बरोबरीचा मालक कोणालाही आवडतो. पण काय हो ! चंद्रकान्त महाराजांच्यावर इतक्यांतच राज्यभार टाकावयास काय झालें?

**तु०**—अहो सर्व राज्य दिलें असें नाहीं, तूर्त त्यांनीं प्रधानजींच्या सल्ल्यानें काम चालवावें, असें सांगितलें आहे.

**र०**—अहो तें नको सांगावयाला. राज्याभिषेक होता तर समजलें नसतें का ? पण असं तरी करावयास काय झालें ?

**तु०**—तुम्हाला नाहीं का ठाऊक ? अहो महाराजानां राज्यांत कोठें चैन पडेना, ईश्वरचरणीं मन लागेना, तेव्हां स्वामीसान्निध राहण्याकरितां महाराज तेथें गेले; आणि जातांना सांगून गेलें कीं, राज्यांतील महत्वाचीं कामें तेवढीं माझ्याकडे पाठवीत जा. बाकी युवराज बघतील.

र०—पण त्यामुळें आपल्यासारख्या तरुण सरदारांची चैन आहे नाहीं ?

तु०—हो, तें काय विचारतां, जोडीचा, लहान वयाचा हौशी मालक, पुष्कळ पैसा, मग काय कमी. नाहींतर एवढ्या हुद्याची जागा मिळवावयास आपल्याला किती दिवस लागले असते; पण ह्या बायकांच्या नादानें म्हातारे सरदार घरीं राहिले, आणि आपली चैन झाली.

र०—पण मला तर बोवा ह्याचाही आतां कंटाळा येत चालला आहे; कारण घरीं जावें तों आई नाहीं; बहीण नाहीं; त्यामुळें कसें सुनें सुनें वाटतें. ब्राह्मण येतो खाणं-पिणं करतो, आणि जातो मुकाट्यानं. पण बायका नसल्यामुळें घर केवढें वाटतें.

तु०—खरंच, खोटं नाहीं, जर सड्या पुरुषांनींच राह्यचं ठरलं तर हीं घरं सोडून द्यावीं लागतील. आतां, एका मोठ्या ठिकाणीं दरेकानें आपल्याला दोन दोन खोल्या घेऊन, जेवणाची सोय एकत्र करावी म्हणजे दरेकाला सोबत होईल; पण तोंपर्यंत काय करावें ? कांहीं करमणूक तर पाहिजे.

र०—हो पाहिजे खरी, पण मी म्हणतों लग्न केलें नाहीं, म्हणजे झालं, पण एरवीं गाण्या बजावण्याला काय हरकत आहे ?

तु०—आणि माझ्याही मनांत तेंच आलें होतें. तेव्हां कांहीं तरी असें संधान बघितलें पाहिजे.

र०—हो पण आतां दरबारची वेळ झाली तेव्हां जावें हें बरें, नाहीं का ? (जातात).

---

## प्रवेश २ रा.

खुर्ची अगर सिंहासन वगळुन एका बाजुला चंद्रकान्त बसला आहे व आसपास सरदार बसले आहेत. )

**ए० स०**—महाराज, नाच गाण्या शिवाय दरबार कसला ?

**दु० स०**—त्याला मुळीं शोभाच नाहीं.

**ति० स०**—दरबारी थाटाला तें अवश्य पाहिजे.

**चं०**—महाराजांनीं स्वामींच्या आज्ञेप्रमाणें तो बंद केला आहे.

**ए० स०**—पण सरकार ती अट मोठ्या महाराजांपुरती होती.

**दु० स०**—आणि आपण फक्त स्त्रीशीं संबंध ठेवावयाचा नाहीं म्हणून बांधले गेलों आहों. नाच गाणं बघूं नये असें कोठें आहे ?

**चं०**—प्रधानजी, दरबार म्हटला म्हणजे थोडं गाणं पाहिजे नाहीं ?

**प्र०**—होय, आणि त्या करतां गवयाची योजना केली आहे. तो अजून कां बरें नाहीं आला ? ( गवई येतो ).

**गवई**—सरकार माझं घड्याळ मागें पडलें असल्यामुळें येण्याला वेळ लागला.

**प्र०**—तुमची आतां आम्ही आठवण केली होती. करा आरंभ.

( गवई तंबोरा घेऊन सा सा री री करतो ).

**ए० स०**—छे छे, हें कसलं गाणें ?

**दु० स०**—अहो त्यांत गोडी नाहीं ?

ति० स०—आणि आवाजांत मृदुता नाहीं.

प० स०—तुम्ही आपले बंद करा कसे.

ग०—अहो सरदार लोक हो, मला तुम्ही थोडें गाऊं द्याल कीं नाहीं ?

दु० स०—हें पाहा आम्हाला हें गाणें ऐकावयाचें नाहीं.

ति० स०—आणि महाराजांची ही इच्छा नाहीं.

प० स०—गाणें ऐकावें कलावंतिणीचें.

ग०—मग मला बोलावलंत कशाला ? हा घरी चाललों. (उठतो.)

चं०—हें पहा बुवा, रागावूं नका. आतां आमच्या कामाचीही वेळ झाली, तेव्हां गाणें बंद करावें हें बरें—पण तुम्हाला योग्य बिदागी मिळेल. प्रधानजी, ह्यांच्या बिदागीची तजवीज करा.

प्र०—बरें आहे, संध्याकाळीं तुमच्या बिऱ्हाडीं पोचवूं. ( गवई जातो ).

चं०—दिवाणजी कांहीं अर्ज असले तर काढा.

प्र०—( एक कागदाचें बिंडाळें काढतो ) हीं दोन जमाबंदीचीं कामें आहेत. हा एक अर्ज येथील सावकाराच्या बायकोचा आहे. ती म्हणते माझ्या नवऱ्यानें मृत्युपत्रांत सर्व इस्टेट मुलानां दिली आहे, तर असा कायदा कां ? नवऱ्याच्या मागें योग्यतेप्रमाणें बायकोला स्वतंत्र पोटगी अगर उत्पन्न कां नसावें ? असा तिचा अर्ज आहे. एक अर्ज गांवच्या नागरिकांचा आहे कीं, बायकांनीं संप केल्यामुळें मोलकरणी मिळत नाहींत, गवळिणी दूध घालीत नाहींत.

चं०—हें पाहा, हे लेखी अर्ज तूर्त ठेवा. त्यांचा विचार मग. कोणाचे तोंडी अर्ज असले तर पुकारा.

प्र०—( शिपायास ) अरे अर्जदारानां पुकार. ( शिपाई पुकारतो व कापडवाला, सोनार, कासार, कलावंतीण व शिंपी वगैरे येतात ).

चं०—कां शेटजी, तुमची काय तक्रार आहे.

का०—सरकार आपण जो बायकांना कापड न देण्याचा हुकूम केला आहे, त्यानें आमचा धंदा बसला. बाजारांत धोतर आणि पांढरें कापड ह्या शिवाय विक्री नाहीं. आणि ज्यांत मिळकत लुगडीं, खण जरीचा कपडा, एरवींचा कपडा, ह्याला बायका शिवाय कोण विचारतो, आणि त्यांत तर आमचें पोट तेव्हां कायदा फिरवा; नाहींतर आम्ही सगळे कापडवाले आपल्या गांवातून जाऊं.

सो०—( पुढें होऊन ) अहो तुमचें कांहीं तरी बरें हो, कारण पांढरं कापड तरी खपतं. पण आमचा मुळीं धंदाच बसला. कारण वर्षांतून एखादी आंगठी अगर सल्याची जोडी घडवायला आल्यास नशीब, नाहींतर काय खावं ? तेव्हां आधीं आमचें जास्त नुकसान झालं.

का०—अहो तुमचें दोघांचें कांहीं तरी बरें, परंतु माझें सर्वस्वी नुकसान जाहालें. जोंपर्यंत पुरुष बांगड्या भरीत नाहींत, तोंपर्यंत माझा मुळींच धंदा चालणार नाहीं.

क०—( पुढें येऊन ) सरकार, आपल्याकडून आम्हाला निरोप मिळाला आहे. आणि आतां आम्ही स्त्रियांनीही तुम्हां पुरुषांचें वारें घ्यावयाचें नाहीं अशी शपथ घेतली आहे. तेव्हां ह्यापुढें जर आपला

कोणी सरदार आमच्या घरीं येईल, तर त्याला धक्के मारून बाहेर काढण्यांत येईल. त्याच्याबद्दल फिर्याद झाल्यास आम्ही जबाबदार नाहीं. आणि आज आपल्या बागेंत आम्हाला नाचाबदल बोलावणें आले आहे. पण आतां आम्हाला बोलावणें पाठवावयाचा आपल्याला अधिकार नाहीं. कारण आपण आम्हाला रजा दिली आहे. मात्र ह्या पुढें आपली ही सरदार—मंडळी आमच्या मोहल्यांत येऊन आम्हाला त्रास देणार नाहीं, अशी तजवीज करण्याबद्दल अर्ज आहे.

**प्र०**—आमच्या बागेंत गाण्याला आमंत्रण कोणी बोवा केलें.

**चं०**—आणि त्रास देणारा सरदार कोण बोवा ?

**क०**—आपल्या सभेंत बसलेल्यापैकींच.

**प० स०**—इतका कायदा असतां असें कोण करील !

**दु० स०**—आणि शपथ घेतलेली कोण मोडील !

**ति० स०**—कडकडीत ब्रह्मचर्यानें राहाण्याचें व्रत आम्हीं पत्करलें असतां, असें कसें होईल !

**क०**—अहो सरदार हो, जास्त बोलून आपलें नांव कां फोडून घेतां. मनाला ब्रह्मचर्य बाणल्या शिवाय नुसती शपथ काय करावयाची. खरें ब्रह्मचर्य असें रस्त्यावर लोळत नसतें. विस्तवाजवळ लोणी ठेवलें म्हणजे जशी त्याची परिक्षा, तशी तुम्हा पुरुषांच्या पवित्रतेची परीक्षा, आमच्या मोहल्यांत येणारांच्या संख्येवरून करण्यांत येते.

**चं०**—अहो प्रधानजी, अर्जदारांना सांगा तुमचे अर्ज महाराजांपुढें रुजु करून आठ दिवसांनीं जबाब देऊं. बाई, तुमच्याबद्दलही तजवीज करूं. (प्रधान तसें सांगतो व सर्व जातात. )

चं०—कायहो प्रधानजी, आपल्या राज्यांत तर मोठी चमत्कारिक स्थिती झाली. ( सरदारांस ) तुम्हाला नाहीं कां तसं वाटत ? पहा, एक कलावंतीण येते काय, आणि ती आपल्या सरदारमंडळीवर फिर्याद करते काय ! शिवाय सर्व धंद्याच्या लोकांनीं जर गांव सोडला तर मग आपण राज्य तरी कुणावर करायचं ! साधुमहाराजांच्या वक्तृत्वापुढें कांहीं शंका काढवेना. आणि तेवढ्या वेळेपुरतं तें खरें वाटे ! पण आतां प्रत्यक्ष अनुभव घेतां, त्यांत किती तरी अडचणी वाटतात. गांवांत गेलं तर सर्व मोहल्ले उदास ! सर्व प्रजेचे चेहरे म्लान ! जसं कांहीं एकादं भयंकर संकट प्रजेवर आलं आहे ! तेव्हां अशा या प्रजेवर राज्य करणाऱ्या राजाला तरी गोडी काय वाटणार ? प्रजा सुखी तर राजा सुखी ! नाहींतर काय ! पण म्हणतातना आपण काय हुकमाचे ताबेदार ! पण हें कर्तव्य बजावतांना मला किती अवघड वाटतं ! आतां मी दरबारांतून उठलों, कीं लागलीच मासाहेबांच्याकडे जायचा तिथं त्या किती प्रेमानं माझ्याशीं बोलायच्या, माझी विचारपूस करायच्या, ताईनें माझी किती थट्टा करायची, आमच्या ताईसारख्या गोड, प्रेमळ आणि विनोदी बहिणीचा वियोग दरएकाला दुःसह वाटेल ! आणि मातृप्रेमाशिवाय व भगिनीप्रेमाशिवाय राज्यांत गोडीही पण नाहीं ! कांहो सरदार, तुम्हाला कसं वाटतं ?

प० स०—होय महाराज, तें खरें ! आई व बहीण घरांत असलीं म्हणजे एकप्रकारची मजा खरी. पण त्यामुळं पुष्कळवेळा आपल्याला हवीतशी मजा मारायला नाहीं सापडत !

**दु० स०**—होय. मीही तसंच म्हणतो कीं, गोड गोड आणि नानातऱ्हेचे पदार्थ करून घालण्यापुरत्या त्या असाव्या ! पण सदा त्यांचा पहारा आपल्यावर नसावा ! पण तसं होणं शक्य नाहीं. तेव्हां त्या नसलेल्या बऱ्या ! म्हणजे त्यामुळं, गाणं बजावणं, चैनीनें राहणं, बरोबरीच्या चार स्नेह्यांशीं गप्पागोष्टी करणं, वगैरे वगैरे-सारख्या गोष्टी मनसोक्त करायला सापडतात !

**चंद्र०**—वगैरे वगैरे म्हणजे कायहो !

**दु० स०**—नाहींहो, आपलं म्हटलं म्हटलं !

**चंद्र०**—म्हटलं म्हटलं म्हणजे मला वाटतं मघाच्या त्या बाईच्या फिर्यादिशीं आपला कांहीं संबंध आहे वाटतं ! शपथेची आठवण आहे का ?

**दु० स०**—( घाबरून ) मी मी आणि काय हें काय माझं नांव काय म्हणून !

**चंद्र०**—बरं प्रधानजी चला, सध्यां आपण महाराजाकडे जाऊं आणि मग त्याचा निवाडा करूं.

( जातात पडदा पडतो ).

---

## प्रवेश ३ रा.

**यमुनाबाई**—काय बाई हा धुमाकूळ चालला आहे ? इकडे महाराजांनीं वेड्यासारखी अट घातली, तर लगेच बायकांनीं तोडीस तोड दिली, मिळून धुमाकूळ. पण त्यांत आमच्या येथल्यासारखे

विचारी पुरुष किती निघाले ! फारच थोडे. मात्र स्त्रीस्वातंत्र्याच्या गप्पा मारणाऱ्यांचें ह्या वेळेस चांगलेंच फावलें; कारण ते म्हणतात, आम्ही तर पहिल्यापासून स्त्रियांना स्वतंत्रता देण्याच्या मताचे; तेव्हां त्यांना सोडावयासमुद्धां त्यांचा विचार पाहिजे. ह्या सबबीवर ते बायका घेऊन राहिले आहेत; पण ह्या स्वातंत्र्याभिमानी पुरुषांच्या घरांत जाऊन बायकांची स्वतंत्रता पहावी ! म्हणजे मी फार सुखी म्हणून ईश्वराचे आभारच मानावे लागतील. सभेंत स्त्रियांच्या हक्काच्या गप्पा मारतांना हे जसे शूर दिसतात, तसेच घरीं आल्यानंतर धर्मपत्नीशीं क्षुल्लक कारणावरून काठीशीं खेळतांना दिसतात, आणि तें पाहिलें म्हणजे क्षणभर असा विचार येतो कीं, हे सुशिक्षित पदवीधर म्हणविणारे पुरुष जर आपल्या बरोबरीच्या आपल्या धर्मपत्नीला चापटपोळ्या देतांना शुद्धरहीत होतात, तर मग त्यापेक्षां आम्ही बायका काय वाईट; आणि अशा ह्या शूरवीर पुरुषांना आम्हाला अडाणी आणि रानटी म्हणावयाचा आणि आमच्या सुधारणेबद्दल विचार करण्याचा तरी काय अधिकार ? पण असें नुसतें बडबडून काय उपयोग. जोंपर्यंत आम्हाला आमची योग्यता कळत नाहीं, तोंपर्यंत असें चालावयाचेंच; आणि ती कळावयास हा प्रसंग बरा आला आहे. अशावेळीं बायकांची सर्व बाजूंनीं उन्नती होण्याकरितां देवीसरस्वतींनीं पुराणाची व प्रवचनाची जी तऱ्हा काढली आहे, ती खरोखरच उत्तम आहे. माझ्याही मनांत आहे कीं, त्यांचें एक पुराण आपल्या येथें करवावें. आज आल्यावर विचारीन; पण चला बाई, आधीं जाऊन चहा करूं दे; येण्याची वेळ झालीच.

( आंत जाते. )

( यशवंतराव येतो आणि खुर्चीवर बसतो. )

**यमुना**—( प्रवेश करून चहाचा पेला हातांत देते.) म्हटलं मी आज कांहीं विचारणार आहे.

**य०**—एवढी प्रस्तावना करून असं काय बोवा मोठं विचारायचं आहे. कांहीं मागायबिगायचें असेल तर आतां कांहीं आम्ही पूर्वींचे सरदार राहिलों नाहीं ! आम्ही झालों आहों गरीब.

**यमुना०**—पण गडे खरंच सांगायचं. ह्या पैशाच्या गरींबींत पण आपण मनाच्या श्रीमंतपणामुळें आनंदांत नाहीं का ? हल्लीं आपल्याला जें सुख मिळत आहे तें मोठमोठ्या श्रीमंतांच्यासुद्धां वांट्यास येत नाहीं, मग त्या मेल्या नुसत्या पैशाच्या गरिबीबद्दल एवढें कां बरें वाटावयाचें ? आणि असें होतें, तर नोकरी कां सोडली ?

**य०**—अग, त्या वेळेस सोडली; पण आतां पश्चात्ताप होतो.

**यमुना०**—मग अजूनही मला सांगायचें, म्हणजे मी जातें, म्हणजे आपल्याला आपली जागा परत मिळेल.

**य०**—पण तूं कोठें जाणार ?

**यमुना०**—हात्तेच्या, माझें काय ? जाईन कोठें तरी, नाहीं तर राहीन कुमुदिनीताईच्या आश्रमांत.

**य०**—अरेच्या, हल्लीं ह्या कुमुदिनीताईचें बंड बरेंच माजलें आहे, आणि बरं आपणही सर्व तजविज केली आहे, तर मग आतां मी करारनामा ल्याहावयास उठतों ( उठतो. )

**यमुना०**—हें काय गडे, चहा नाहीं का घ्यायचा ?

य०—हो खरंच, अगदींच विसरलें ( बसून पीऊं लागतो ) बरं तर, आतां करारनाम्याची तजवीज करूं.

यमुना०—हो, जर खरोखर त्रास होत असला, तर करावी.

य०—त्रास आणि तो मला, काय म्हणून ?

यमुना०—आपण म्हटलेनां कीं पैसा नाहीं, त्यानें त्रास होतो.

य०—अग पण तो मला नव्हे, तुझ्याकरितां. अग आम्हां पुरुषांना गरजा फार थोड्या असतात, आम्ही तुमच्या सहवासांत राहिलों म्हणजे त्या वाढतात; तेव्हां दुःख माझ्याकरितां नाहीं, पण तुला काम करतांना पाहिलें म्हणजे मला वाईट वाटतें. एखादें कांहीं काम करूं म्हटलें तरी, पैशाची अडचण. शेती पिकून उत्पन्न येईल तेव्हां खरें. आजपर्यंत आपण त्या उत्पन्नाची काळजी घेतली नाहीं, जवळ पैसा ठेवला नाहीं, त्याचा हा परिणाम आहे. देखनेमें ढबु अन चलनेमें शिवराई; अशी हल्लीं आपली स्थिति झाली आहे.

यमु०—माझ्या कामाचें काय मोठें, पण बाकी गोष्टीकरतां पैसा पाहिजे खरा. पण त्या मासिकाकडे पाठविलेल्या लेखाचं काय झालं ? आणि कादंबरी कोणच्याशा बुकसेलरकडे पाठविली होतिना ? त्याचे काय मिळालें !

य०—कादंबरीबद्दल त्या एजन्सिनें ५० रु. देऊं केलें. म्हणजे इतकी आमची त्यानीं किंमत केली. कारण त्यावरून लेखकाला आपल्या वेळेचें आणि श्रमाचें किती महत्त्व आहे, हें कळतें. आणि संपादक—महाराजानीं आज कोठें उत्तर पाठवलें.

**यमु०**—काय उत्तर पाठवलें? नेहेमीं असें लेख पाठविल्यास काय देऊं म्हणाले?

**य०**—अग, आज जेव्हां किंमत मागून आपण लेख द्यावयास गेलों, तेव्हां लगेच पहिलें पारडे फिरलें. त्यांनीं लिहिलें आहे कीं, आमच्याकडे प्रसिद्ध लेखकांचे इतके लेख येऊन पडलेलें आहेत कीं, त्यांत असलें भिकार लेख घेण्यास मुळींच जागा नाहीं; असे लेख फुकट छापण्याची मारामार, मग पैसे देऊन कोण छापतो.

**यमु०**—खरें कीं काय? आपल्या सारख्याच्या लेखाला त्यांनीं असें म्हटलें, आणि ह्या मानानें पाहिलें तर हल्लीं त्यांच्या मासिकांतून जे लेख येतात तें काय मोठें चांगलें असतात.

**य०**—अग, पण तें कोणाला सांगतेस, हल्लीं काळ असा आहे कीं, खरें थोडें आणि मुलामा फार. मला तर त्या मुलाम्याचा फार वीट येतो. मी आज एक स्वतंत्र मासिक काढण्याच्या विचारांत आहे, आणि आपल्या मळ्याचीही व्यवस्था आपण करून त्यांत कांहीं डोकें घालावें, अस मला वाटतें म्हणून तिकडेच जातों आहे.

**यमु०**—कल्पना चांगली आहे. वरं, मग मी सरस्वतीदेवीचें पुराण करवूंनां पण!

**य०**—हेंच का तूं विचारणार होतीस? बरं, पण तूं त्यांना बिदागी काय देणार? मोठा खर्च करण्याची आज आपल्याला शक्ति कोठें आहे!

**यमु०**—पण त्या बाई कोणाकडेही कसलीच बिदागी घेत नाहींत. फुकट चार शब्द आपल्याला सांगतात. हवे तर धरलें, नाहीं तर सोडले.

य०—वा, ही अशी कोण बोवा बाई आहे? मग खुशाल कर. मला विचारायची काय जरूर. तुझ्या घराची तूं मालकीण आहेसच आणि पैसे पडत असले म्हणजे मला विचारायला हवे असें नाहीं कांहीं, पण आपली खरी स्थिती मी तुला सांगितली.

यमु०—वा! आणि तें का मला कळत नाहीं, इतकीका मला वेडी समजायची!

य०—आणि वेडी म्हणेल कोण! आपण तर आमच्याहूनही शहाण्या. बरं, पण मी आतां जातों. (जातो.)

(यमुनाबाई आंत जाते, तो जानकीबाई प्रवेश करते)

जा०—अहो यमुनाबाई तुम्हाला कळलीका बातमी?

यमु०—(येऊन) अहो कसली बातमी?

जा०—अहो, काल म्हणे मोटार पडून अपघात झाला.

यमु०—खरं कीं काय! कोण कोण पडलं.

जा०—अहो काय विचारतां? युवराज पडले आणि त्यानां बरीच दुःखापत झाली आहे. एक दोन माणसानांहीं लागलें. पण बाई, नगाऱ्या पुढें टमिकीचा नाद कोठें! युवराजानां राजवाड्यांत नेऊन सगळे डाक्टर वैद्य तिकडे धांवलें आणि बिचाऱ्या नोकरांची दादही नाहीं. मग आपल्या सरस्वतीदेवी तिकडून गंगास्नान करून परत येत होत्या त्यांना ते दिसले, त्यांनीं लगेच सेवासदनांतील बाया पाठवून त्यांना डोल्या करवून नेलें. आणि हल्लीं तें कुमुदिनी-ताईच्या हॉस्पिटलमध्यें आहेत.

यमु०—अगबाई, येथपर्यंत झालें का? देव करो आणि युवराज लवकर बरे होवोत. पण काय हो, पुरुषांशीं कोणच्याही प्रकारें संबंध न ठेवणाऱ्या ह्या बायकांनीं त्या पुरुष नोकरानां कसें नेलें.

जा०—अहो तसें नाहीं, देवी सरस्वती म्हणाल्या कीं, त्यांच्याशीं आपण स्नेहसंबंध ठेवावयाचा नाहीं, काम करून घ्यावयाचें नाहीं, पण भूतदया ही सर्वांत जास्त पुण्यप्रद आहे, तिच्यांत कोणच्याही तऱ्हेचा भेदभाव नसतो. तेव्हां दुःखी अशा प्राण्याचें दुःख दूर करणें, हें भगिनीमंडळाचें पहिलें काम आहे. तेथें स्त्री पुरुष हा भेदभाव नाहीं. तेव्हां त्यांना तेथें नेलें. तेथें खुद्द कुमुदिनीताईसाहेबांच्या देखरेखीखालीं त्यांची व्यवस्था चालू आहे.

यमु०—खरेंच बाई, किती परोपकारी बायका, आपणही तसं व्हावसं वाटतं.

जा०—मी सुद्धां आतां तिकडेच चाललें आहे, आज भजन आहे.

यमु०—खरं कीं काय? मला ही जायचें आहे, पुराणाचें सांगायला. चला तर (दोघी जातात).

---

## प्रवेश ४ था.

(पडद्यांतून चोर चोर, चोर, पकडा पकडा असा आवाज ऐकूं येतो.)

(जमादार, पोलीस शिपाई वगैरे गस्त घालीत येतात.)

शि०—अरे आवाज कुठला?

ज०---अरे त्या समोरच्या घरांत जा.

( शिपाई जातात आणि मग एका ब्राह्मणाला धरून येतात. )

शि०---हरामखोर कोठला. लोकांच्या घरांत शिरतो.

दु० शि०---आणि नुसति चोरी न करतां बायकांच्या आंगावर हात टाकतो साला.

ज० पोषाखाची वगैरे तर खूप ऐट आहे.

ब्रा० अहो पण जमादारसाहेब, जरा ऐका तर खरें.

शि०---( दोन रट्टे घालतो ) अहो राव, सर्व कांहीं ऐकलें; आतां खुद्द चोरी करतांना पकडलें आहे.

ब्रा०---अहो पण जरा मला सोडा; अहो मी महाराजांजवळचा ब्राह्मण आहें.

शि०---मग चांगलें झालें. राजवाड्यांत दरोडा घालण्यापूर्वी पकडलें.

ज०---अरे त्याच्याशीं काय बोलतां, काय माल असेल तो काढा.

शि०---हं काढ लवकर काय चोरलेंस तें.

( त्याचा झाडा घेतात. )

ब्रा०---नाहीं हो राव, कांहीं नाहीं बरं, मी चोर नव्हे; मी चोरी करायला गेलो नव्हतों.

शि०---चोर नव्हे तर चोराचा बाप तूं.

---अहो नव्हे मी माझ्या बायकोच्या घरांत जात होतों.

ज०––आं; येथें कोठें तुझी बायको? आणि मग ती कां ओरडली?

ब्रा०—अहो त्या रांडेचीनें माझी ही दशा केली हो, जरा मोकळा सोडा कीं तिचा समाचार घेतों.

शि०—आधीं तुझा समाचार आम्ही घेतों; मग तूं तिचा घे.

ज०—बरं मग बायकोकडे येथें कोठें? तुझें घर कोठें आहे?

ब्रा०—अहो माझें घर नाहीं हो.

ज०––मग बायको कुठली?

ब्रा०—अहो बायको आहे ती येथें राहते, मी महाराजांजवळ असतों.

ज०—अस्सं, मग आपली स्वारी ईकडे कशी आली आणि बायको ओरडली कशी?

शि०—द्या एखादी लोणकडी ठेऊन. ह्या लोकानींच जमादार-साहेब घाण घातली आहे.

दु० शि०—परवाची चोरी ह्यानेंच केली असेल. बोल लेका खरं ( त्याला मारतो )

( इतक्यांत एक शिपाई जानकीबाईला घेऊन येतो )

शि०—साहेब ह्या बाई आतां शुद्धीवर आल्या तशी त्यांना घेऊन आलो.

ज०—कां बाई तुमचें काय काय गेलें?

बाई०—माझें कांहीं गेलें नाहीं. कायसें खडबडलें म्हणून मी जागी झालें तों चाहुल लागली.म्हणून दिवालावायसाठीं काड्याची

पेटी बघायला लागलें, तों माझा हात चोराच्या पायाला लागला, तेव्हां मी ओरडलें. तों चोरानें ओरडूं नको म्हणून हात धरला. इतक्यांत आपली मदत आली.

**ब्रा०**—गेलें नाहीं. काय म्हणे हात धरला; काय शिंचीचें भय आहे का ? चारचौघांत हात धरून घरांत आणली आहे.

**बायको**—( त्याच्याकडे बघून ) स्वगत अगबाई ही स्वारी येथें कोठून आणि शिपायांच्या ताब्यांत कां !

**ज०**—बाई तुम्हीं त्याला ओळखता का ?

**ब्रा०**—नाहीं ओळखीत म्हणूंदे शिंचीला, कीं थोबाडच रंगवीन.

**शि०**—अरे ए गप बैस, मध्यें बोलूं नकोस, नाहीं तर देईन एक चांगली.

**ब्रा०**—हें पहा शिपाईबोवा तोंड संभाळून बोला बरं; नाहीं तर जड जाईल, मी महाराजांचा मनुष्य आहें.

**बा०**—होय, ते काय विचारावें ? त्यांची ओळख कशी विसरेन. ( लाजते )

**ज०**—ह्यांचा तुमचा काय संबंध ?

**बा०**—हें काय भलतेंच विचारणें ?

**ब्रा०**—आणि तूं केलेंस तें. आतां कां तोंड गप्प. सांग मी बायको बायको; बोल बायको म्हणून ( जमादाराकडे पाहून ) अहो जमादारसाहेब जरा सोडाहो, म्हणजे रांडेचीचीं हाडें मऊ करतों.

**ज०**—बाई हा तुमचा कोण ? खरें खरें बोला.

ब्रा०—अहो मी गमत करण्याकरितां असें केलें.

बा०—(वेडावून) गमत, मोठं मेलं प्रेम वाया जातं आहे कीं नाहीं; अहो जमादार मी येऊं दिलें नसतें;

ज०—कां बरें! तो तुमचा नवरा खराना?

बा०—होय खरं, पण त्यांनीं आपण बायको सोडली असें म्हटलें आहेना; आतां नवरेपणा कोठें उरला?

ब्रा०—(वेडावून) कोठें उरला; एकदां नाहीं हजारदां!

ब्रा०—बरं बरं, पाहीन, माझी पाहिरी तर चढा कीं करीन फिर्याद.

ज०—बरं तर तुम्ही अपरात्रीं असें हिंडला आणि खोटा करारनामा करून बायकोला भिववायला गेला म्हणून तुम्हाला थोडी फार शिक्षा होईल. (शिपायास) चलरे ह्याला चावडींत घेऊन.

ब्रा०—अहो जमादार,बायकोकडे गेलों हा गुन्हाका,अहो ऐका.

ज०—हें पाहा मी तुम्हांला उद्यां महाराजांपुढें उभा करीन, मग पुढें ते म्हणतील तसें करूं.

ब्रा०—अहो नकोहो, नकोहो, अहो जमादारसाहेब पायां पडतो पण महाराजांपुढें नेऊं नका.

बा०—कां आतां कां, मला कशी सर्वां देखत घालवली आणि पुन्हा पुन्हा मी कांहीं बायक्या नाहीं, बायक्या नाहीं असं म्हटलें. आतां जगाला तरी कळेल.

ब्रा०—बरं बरं शिंचे, ह्यांच्या हातांतून एकदां सुटुंदे म्हणजे तुला सांगतों.

ज०—( शिपायास ) चलारे चला उशीर झाला. ( शिपाई त्याला घेऊन जातात ) ( स्वगत ) हें पाहिलें जुलमाचें ब्रह्मचर्य कसें आहे तें. असाच सर्व ह्या मंडळीचा गोंधळ असेल झालें. पण आपल्याला काय ? हुकमाचे चाकर. ( जातो. )

बा०—( स्वगत ) बरं झालं ! जेव्हां तेव्हां माझ्या वाटेस जातात, भली खोड मोडली, बाकी खरेंच माझी कांहीं कल्पना नव्हती हे असतील म्हणून. मी आपली एकदम घाबरून बेशुद्ध पडलें, पण झालें तें चांगलेंच झालें. आतां आपण निजावें ( जाते )

---

## प्रवेश ५ वा.

( राजवाड्यांतील एका दालनांत युवराज चंद्रकान्त निजला आहे. जवळ दोन सेवक बसले आहेत, त्या पैकीं एक खुर्चीवर पेंगतो आहे असा पडदा उघडतो. )

चं०—( विव्हळत ) आई आई, अग आई, काय करूं ? तहान लागली. पाणी द्यारे.

( एक सेवक पाण्याचें भांडें तोंडाशीं नेतो. )

चं०—अरे मला उठून पित्रवेलका. थोडें पाजारे, अरे चमच्यानें घालाना. अरे, कोठें गेला सगळे ?

से०—सरकार जवळच तर आहों, हं! हें घ्या ( चमच्यानें पाजतो.

चं०—अरे, माझ्या पाठीला अगदीं पडून पडून कळ लागली. जरा हात फिरव रे. ( सेवक तसें करतो ) अरे, किती रे हे हात कठीण लागतात; आणि असें धसफस, काय रे करतां ?

से०—सरकार, कसेंही केलें तरी आपल्याला पसंत पडत नाहीं; मग आम्ही काय करावें.

चं०—कसलें काय करता कोण जाणे, एक काम धड नाहीं. मला भूक लागली, तरी खायला दिलें नाहींत.

से०—आम्ही काय करणार? आचारी आणिल तेव्हांना. आपण सांगाल तर चवकशी करतों.

चं०—( कण्हत ) नाहींरे माझ्यानें बोलवत, जा. जा. जा.

से०—( दुसऱ्याला हलवून ) अरे उठनारे, झोंप काय घेतोस ? येथें बैस, मी जरा खायचें आणतों.

दु० से०—( जांभया देत ) हं बसतों जा. ( प० जातो. )

चं०—आई आईग, कपाळ दुःखतें, घेरी येईलसें वाटतें, आतां मी कसें करूं.

दु०से०—आपण स्वस्थ पडा, मी हवें तर कपाळ चेपतों.

चं०—पडा काय शिंच्यानों, माझा जीव चाललाना, मला कांहीं औषध द्या, अरे माझा पाय उचल. ( सेवक तसें करतो. ) अरे मला ह्या कुशीवर कर ( तसें करतो ) इतक्यांत गेलेला मनुष्य एक मोठें खिरीचें पातेलें घेऊन येतो ) अरे मला पुन्हा असा कर.

से०—( तसें करून एकीकडे ) काय शिंचा त्रास आहे, एकसारखें नाचायचें, रात्रीं झोंप नाहीं, दिवसा नाहीं.

प० से०—जशीं कांहीं जागरणें तूंच काढीत असशील? आतां ही खीर घाल त्यांनां मी ईझीचेअरवर पडतों.

दु०—तूंच घाल, मी काय म्हणून? आपल्याला नाहीं होत ती दगदग. मी काल साऱ्या दिवसांत कोंडलेल्या जागेंत वसून आहें.

चं०—( अरे मला पांघरूण घालारें ) ( कोणी ऐकत नाहीं. )

प:—आणि येथें कोण लेकाचा बाहेर गेला होता.

दु०—तें कांहीं मला ठाऊक नाहीं. मी हा चाललों.

प०—आपल्या बापाच्यानें ही कटकट सोसवत नाहीं, मी हा चाललों.

दु०—जाशिल, येथें बसलेंच पाहिजे, तुझी पाळी आहे.

( डाक्तर येतो. )

डॉ०—अरे अरे, हें काय? रो॰याच्या खोलींत कटकट.

प०—डाक्टरसाहेब, हा माझ्यावर काम टाकून झोंप घेतो.

दु०—डाक्टरसाहेब मी सारी रात्र जागतों पण आपल्याला फिरावयास जाण्याची संवय आहे.

चं०—अरे मला भूक लागली आहेनारे. अरे आधीं मला खायला घाला; अहो कोणी घालाहो ( असें म्हणून मुर्च्छीत होतो ).

डॉ०—( त्याच्याजवळ जाऊन ) आज ह्यांना औषध बरोबर पोचलें का? ( बाटलीकडे पाहातो ) अहो तुम्हीं आधीं रोग्याकडे पाहा; आणि मग खोलीच्या बाहेर जाऊन भांडा, बाटलींत औषध तसेंच आहे; दिलें नाहीं वाटतें.

दु०—होय रात्रीं थोडी गुंगी आली त्यांत विसरलों वाटतें.

डॉ०—आणि खावयास केव्हां घातलें !

प०से०—घालावयाचें आहे. ते पाहा आणलें आहे.

डॉ०—त्यांना ग्लानीनें मुर्च्छा आली आहे, आणा पाहूं तें.

( सेवक पातेलं पुढें करतो. )

डॉ०—( प्रधानाकडे पाहून ) अहो पथ्याचें फार थोडें केलें आहे! आणि तेंसुद्धां निवालें, तें आणतांक्षणीं घालूं नये का ?

प०—घालावयासाठींच आणलें, इतक्यांत आमच्यामध्यें वादविवाद सुरू झाला, आणि तें तसेंच राहिलें.

डॉ०—वा ! तुम्हाला तुमच्या मालकाच्या प्रकृतीची काळजी पुष्कळच आहे म्हणावयाची, आतां थोडें गरम दूध आणा पाहूं. ( से० जातो ) ( डॉक्टर तपासतो ) ह्यांना आज पुन्हां ताप चढला औषध वेळवारी जात नाहीं, शुश्रुषा व्हावी तशी होत नाहीं. त्यामुळें हें दु:खणें उलट खाणारसें वाटतें. तुम्ही जर त्यांची वेळींच काळजी घ्याल तर बरें; नाहींतर अवघड जाईल !

प्र०—डॉक्टरसाहेब, शक्य तितका वेळ मी स्वत: जवळ बसतो आणि सकाळीं मी स्वत: देखरेख करितों. पण आज मी सकाळी राणीसरकारकडे विनंतीकरितां गेलों होतों, कारण काल मला वाटल कीं, माझ्यानें कांहीं राज्यकारभाराची व्यवस्था संभाळून त्यांची काळजी घ्यावी तशी घेववत नाही, तेव्हां त्या जर आल्या तर मी काळजींतून मुक्त होईन. ह्याकरतां माझे सकाळचे तीन तास मोडले.

डॉ०—होयें, आपण म्हणता तसें झाल्यास बरें होईल खरें; पण अद्याप हे सावध कां बरें होत नाहींत ( दूध येतें तें पेल्यांत घेऊन दोन चमचे तोंडांत घालतो. आणि कांहीं उपचार करूं लागतो. )

( एका दासासह राणी येते )

दा०—राणीसरकार आल्या.

( डॉ. प्र. तिचा सन्मान करतात )

रां०—प्रधानजी कोठें आहे माझा बाळ? ( चंद्रकांताजवळ जाऊन ) प्रधानजी तो कांहो बोलत नाहीं? बाळा चंद्रकांता, बोलरे. तुला कोठें लागलें? फारका त्रास होतो? अरे कां बोलत नाहींस? मी लवकर नाहीं आले म्हणून का? तूं कां बोलत नाहींस!

डॉ०—राणीसाहेब, त्यांना प्रबळ मुर्च्छा आली आहे पण ते लवकरच सावध होतील. त्यांच्या पोटांत थोडें दूध गेलें पाहिजे, ( दूध पाजतो ) त्यांना ताप चढत चालला आहे, अशावेळीं शांतता आणि स्वस्थपणा व उत्तम शुश्रूषा ह्याची फार जरूरी आहे व ती असली तरच आमच्या औषधांचा उपयोग.

रा०—डॉक्तर तें तुम्हाला नाहींका करतां येणार? माझ्या बाळाला बरं केल्याचें श्रेय तुम्ही नाहीं का घेणार?

डॉ०—राणीसाहेब, आम्ही औषधोपचार करूं शकूं, पण सतत जवळ बसून शुश्रूषा करणें, आमच्या हातून चांगलें व्हायचें नाहीं. आपण सांगाल तर करूं. तरी पण मदतनीस पाहिजे.

ए० से०—डॉक्टरसाहेब आमच्या हातून तें व्हायचें नाहीं—

दु० से०—आपल्याला नोकरीची जरूर नाहीं.

प्र०—डाक्टरसाहेब कांहीं तजवीज करा.

डॉ०—मी काय करणार ? औषध देईन.

रा०—तर मग ह्यावरून दिसतें कीं, तुमच्या हातून कांहीं हें काम नीट होणार नाहीं. तेव्हां तें स्त्रियांच्या हॉस्पिटलच्या बायकां कडेसच सोंपवलें पाहिजे. ( दासीस ) जाग कुमुदिनीला म्हणावें, तुम्हाला मी बोलावलें आहे. तसेंच देवी सरस्वतीना सांग, म्हणजे त्यांच्या परवानगीनें कुमद आणि दुसऱ्या परिचारिका येतील.

डॉ०—बरें आहे, तर मग मी जातों.

प्र०—मीही थोडी राजकारभाराची व्यवस्था बघतों.

रा०—जा आतां मी अशीच माझ्या बाळाजवळ बसून त्याची शुश्रूषा करणार.

( पडदा पडतो. )

---

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

स्थल–कुमुदिनीच्या वाड्यातील भाग.

( एक स्त्री हातांत चाबुक घेऊन कोचमनाच्या वेषांत येते. )

**कोचमन**—चला आपली गाडी जोडून तयार झाल्याची वर्दी ताईसाहेबांना द्यावी.

( एक स्त्री शिपाई हातांत कागदाचें भिंडोळें घेऊन प्रवेश करिते. )

**शि०**—कायग, गाडी तयार आहेका ?

**को०**—हो, आाणि तेंच कळविण्याकरितां मी इकडे येत होत्यें.

**शि०**—अगबाई त्या पहा ताईसाहेबच इकडे आल्या.

( सरस्वती देवी, कुमुदिनी आणि शांता प्रवेश करितात. )

( शिपाई कोचमन मुजरे करितात. )

**को०**—सरकार, गाडी तयार आहे.

**कु०**—बरं चला, मी आलेंच. तूं ते कागद गाडींत ठेव आणि आमच्या बरोबर चल.

( दोघी जातात. )

**स०**—ताईसाहेब आतां युवराजांची प्रकृति कशी काय आहे ?

कु०—आतां त्यांना पुष्कळ बरं आहे. कालरात्रीं ते शुद्धीवरहि आले होते. पण पुन्हा मुकाट्यानेंच निजले. मला वाटतं ईश्वर करील तर यशाचा वांटा आपण घेऊं.

स०—आणि तसं झाल्यास आज आपण केवढं कार्य केलंसं होईल !

शांता०—काय बरं फायदा ? ते वांचतील; आपल्याला बरं म्हणतील; एवढंच. त्या शिवाय काय फायदा हो ? उलट आपण सर्वांनीं केलेला निश्चय आपणच मोडून ह्या पुरुषांना आपल्या इस्पितळांत जागा कां बरं दिली ? बरं भूतदयेमुळें केलं म्हटलं, तर आतां पुढं आपल्याला काय फायदा ! बरं, शिवाय आपण त्यांना अशा रीतीनें जागा देतों म्हटलं, कीं जो तो पुरुष आपल्या दयाळु-त्वाचा फायदा घेऊन पुन्हा आपल्याला त्रास द्यावयास तयारच. आणि आपण इस्पितळ काढतांना असं म्हटलं होतं कीं, बायका व लहान मुलें घ्यावयाचीं, जेव्हां विशेष महत्वाचा प्रसंग येईल तेव्हां पुरुष घेऊं, तें खोटं केल्यासारखं नाहीं कां होत ?

कु०—अग आपण आपली अट मोडायला तयार झालों असं नाहीं. पण जेव्हां राणीसाहेबांनीं आम्हाला अगदीं गहिंवरून विनंति केली, आर्जव केले, आणि त्या म्हणाल्या कीं, पुरुष डॉक्ट-रच्या हातून कांहींच होत नाहीं तेव्हां ह्याची तजवीज करून मला पुत्रदान द्या. असं म्हटल्यावर कोणाला वाईट वाटणार नाहीं ? तेव्हां देवींनीं शेवटीं राणीसाहेबांकरितां असं कबूल केलं, कीं त्यांना आमच्या दवाखान्यांत पाठविल्यास आम्ही त्यांची व्यवस्था करूं.

आणि तसं करणं अशावेळीं जरूर नव्हतं कां ? कारण ते युवराज आणि आपण त्यांच्या राज्यांतील प्रजा, आपण जर त्यांच्या उपयोगी पडावयाचं नाहीं, तर काय करावयाचं ?

**शां०**—प्रजा झालों म्हणून ? त्यांनीं जर आम्हाला त्रास दिला आहे, तर नकोका उलट तसं करावयास ? मग आपण बहिष्कार तरी कां घातला ? आणि एवढा खटाटोप तरी कशाला ?

**स०**—शांताबाई आपण बहिष्कार काय उद्देशानें घातला सांगा बरं.

**शां०**—पुरुषांना वठणीवर आणण्याकरितां.

**स०**—होय ना ? मग तें आपण कसं आणणार ?

**शां०**—त्यांना अडवून, त्रास देऊन, बायकांची किंमत त्यांना कळविणार.

**स०**—मग पुढें ?

**शां०**—पुढें काय ?

**कु०**—एक पुरुषांचं आणि एक स्त्रियांचं अशीं दोन राज्यें नेहमींच कां चालू ठेवण्याची आपली इच्छा आहे ?

**शां०**—नाहीं.

**कु०**—मग तीं एक कशीं व्हावीं ?

**शां०**—त्याचा कांहीं मी विचार केला नाहीं.

**स०**—आणि नेहमींच असे बायका–पुरुष निराळे राहिल्यानें त्यांना व आपल्याला सुख होईल कां ? आणि जग म्हणून म्हणतात

तें कसं चालेल ? सर्व धंद्यांची काय स्थिति होईल, ह्याचा तुम्ही विचार केला कां ?

शां०—नाहीं, त्याचा कांहीं आम्ही कोणी विचार केला नाहीं. मात्र माझ्याप्रमाणं सर्वांना वाटतं आहे. तेव्हां आपण काय तें सर्व मला खुलाशानें सांगा.

स०—हें पहा जेव्हां राजापासून ह्या पुरुषांच्या डोक्यांत हे पुरुषी-बंडाचे विचार शिरले व ते जेव्हां बायकांस निष्कारण त्रास द्यावयास लागले, तेव्हां आपण त्यांना आम्हींही तुमच्या तोडीस तोड आहों, असें दाखविण्याकरितां हें बायकांचें गांव वसविलें; खरेंना ?

शां०—हो.

कु०—आणि तेथें तुमच्या सारख्या आज्ञाधारक भगिनींच्या साहाय्यानें आम्हाला यश आलें.

शां०—त्यांत आपण कराल ती आज्ञा कोणत्याहि तऱ्हेची शंका न काढतां बजावणें, हें तर आमचें मूळ तत्व, परंतु आज मी हें मैत्रिणीच्या नात्यानें विचारीत आहें.

कु०—आणि तुमच्या ह्या गुणामुळें तर सर्व चाललें आहे.

स०—आणि मीहि तुम्हाला सर्व मोकळ्या मनानें सांगत्यें. हें पहा, बायकी गांव वसविण्यांत आपला मुख्य उद्देश पुरुषांना शुद्धीवर आणावयाचे, त्यांना आपल्या गुणांची किंमत कळायाला अवसर ठेवायचा आणि योग्य वेळ आल्यास पुन्हा आपण एक व्हावयाचें. म्हणजे मग ते आपल्याला जास्त आदरानें वागवितील. बेटा, स्त्रीपुरुष ही ईश्वरानें उत्पन्न केलेली जोडी आहे. ती जर

आपण फोडूं म्हटलं तर शक्य नाहीं. तसं केल्यास आपण निसर्गाचा गुन्हा केल्याप्रमाणें होईल. ज्यांना खरं वैराग्य उत्पन्न झालं असेल त्यांची गोष्ट सोड. पण त्याकरितां तुम्हा सर्वांना मी अविवाहित रहा, म्हणून उपदेश करणं चुकीचं होईल. आणि तो मी कां करावा ? तुम्हाला माता ह्या पदवीपासून कां दूर कराव्या ? तेव्हां आतां राजपुत्र बरा झाल्यास काय फायदा आहे, हें तुला समजलं ना ? आतां आम्ही फायद्याकरितांच केवळ करितों, असं नव्हे. पण परमार्थाबरोबर स्वार्थ साधल्यास कां करूं नये ?

**शां०**—होयं. ताई, देवी, आतां मी समजलें. मला चुकीची क्षमा करा.

**कु०**—चला चला. उशीर होतो. आतां रोग्याजवळ बसावयाची माझी वेळ आहे. ( जाते )

**स०**—चला शांताबाई, आपण हि जाऊं. आपल्या मंडळांत हें सर्व मी समजून सांगत्यें. ( जातात. )

## प्रवेश २ रा.

( दवाखान्याची एक खोली. चंद्रकान्त पलंगावर निजला आहे, जवळ सरला बसली आहे, एका टेबलावर औषधाच्या बाटल्या; ग्लास, पाणी वगैरे आहे; दोन बाजूला दोन फ्लॉवर-पॉट्स आहेत, असा पडदा उघडतो. )

**चं०**—( डोळे उघडून ) मी कोठें आहे ?

स०—आपण सुरक्षित जागीं आंहां. स्वस्थ पडा, म्हणजे बरं वाटेल.

चं०—तुम्ही कोण ?

स०—मी एक परिचारिका आहे. पण आपण बोलूं नका. स्वस्थ पडा.

चं—तुमचें नांव काय ?

स०—सरला.

चं०—काल रात्रीं मी थोडा शुद्धीवर आलों होतों, तेव्हां माझ्याजवळ कोण बाई होत्या ?

स०—कुमुदिनी ताईसाहेब. पण आपण स्वस्थ पडा. आजारी माणसानें फार बोलूं नये. त्रास होतो.

( चंद्रकान्त स्वस्थ पडतो. सरला तेथें जवळच खुर्चीवर बसतें. )

कु०—( प्रवेश करून ) सरला, तूं जा, आतां मी बसतें. आतां ह्यांचं कसं आहे ?

स०—आतां ते सावध झाले आहेत. बाकी डॉक्टरीण म्हणाल्या कीं, बरं आहे. मी आतां जातें. ( जाते )

कु०—( शाल काढून घड्याळ पाहतें; टेबलाजवळ जाऊन एका बाटलींतलें औषध ग्लसांत ओतून रोग्याजवळ जाते; तें काळजीपूर्वक त्याला पाजून एका रुमालानें त्याचें तोंड पुसतें आणि दुसऱ्या रुमालानें कपाळावरचा घाम पुसते. )

चं०—तुम्ही कोण ?

कु०—मी एक परिचारिका आहे. आतां आपल्याला बरं वाटतंना ?

चं०—तुमचें नांव काय ?

कु०—कुमुद, पण आपण स्वस्थ पडा म्हणजे बरं वाटेल. ( त्याच्या अंगावर शाल घालते. )

चं०—मला कसंसंच होतं आहे.

कु०—( त्याच्या अंगावर हात फिरवून ) तुम्हाला भूक लागली आहे, त्यानें असं वाटतं. आतां थोडं दूध देतें हां ! ( दोन चमचे पाजते ) आतां बरं वाटलंना ?

चं०—हो.

( ती खुर्चीवर बसते. )

चं०—माझ्या हाताला कंड सुटली आहे. ( कुमुदिनी त्याच्या हातावर हळुहळु चोळते. )

---

## प्रवेश ३ रा.

**राजा**—( स्वगत ) काय करावं ? कसं तें चैन पडत नाहीं. राज्यांत कंटाळा आला म्हणून सद्गुरुचरणाजवळ आलों. पण चैन नाहीं. मनाला शांतता मुळींच नाहीं. उलट मी प्रपंचांत असतांनाच ह्यापेक्षां जास्त शांत होतों. युवराज पडल्याचें ऐकलें. म्हटलें आपल्याला ह्या प्रपंचाची ओढ कशाला ? म्हणून मी गांवांत गेलों नाहीं. युवराजाचा समाचार सुद्धां घेतला नाहीं, पण मनाचा ओढा सारखा

स०—आपण सुरक्षित जागीं आहां. स्वस्थ पडा, म्हणजे बरं वाटेल.

चं०—तुम्ही कोण ?

स०—मी एक परिचारिका आहे. पण आपण बोलूं नका. स्वस्थ पडा.

चं—तुमचें नांव काय ?

स०—सरला.

चं०—काल रात्रीं मी थोडा शुद्धीवर आलों होतों, तेव्हां माझ्या-जवळ कोण बाई होत्या ?

स०—कुमुदिनी ताईसाहेब. पण आपण स्वस्थ पडा. आजारी माणसानें फार बोलूं नये. त्रास होतो.

( चंद्रकान्त स्वस्थ पडतो. सरला तेथें जवळच खुर्चीवर बसतें. )

कु०—( प्रवेश करून ) सरला, तूं जा, आतां मी बसतें. आतां ह्यांचं कसं आहे ?

स०—आतां ते सावध झाले आहेत. बाकी डॉक्टरीण म्हणाल्या कीं, बरं आहे. मी आतां जातें. ( जाते )

कु०—( शाल काढून घड्याळ पाहतें; टेबलाजवळ जाऊन एका बाटलीतलें औषध ग्लसांत ओतून रोग्याजवळ जाते; तें काळजीपूर्वक त्याला पाजून एका रुमालानें त्याचें तोंड पुसतें आणि दुसऱ्या रुमालानें कपाळावरचा घाम पुसते. )

चं०—तुम्ही कोण ?

कु०—मी एक परिचारिका आहे. आतां आपल्याला बरं वाटतंना ?

चं०—तुमचें नांव काय ?

कु०—कुमुद, पण आपण स्वस्थ पडा म्हणजे बरं वाटेल. ( त्याच्या अंगावर शाल घालते. )

चं०—मला कसंसंच होतं आहे.

कु०—( त्याच्या अंगावर हात फिरवून ) तुम्हाला भूक लागली आहे, त्यानें असं वाटतं. आतां थोडं दूध देतें हां ! ( दोन चमचे पाजते ) आतां बरं वाटलंना ?

चं०—हो.

( ती खुर्चीवर बसते. )

चं०—माझ्या हाताला कंड सुटली आहे. ( कुमुदिनी त्याच्या हातावर हळुहळु चोळते. )

---

## प्रवेश ३ रा.

**राजा**—( स्वगत ) काय करावं ? कसं तें चैन पडतं नाहीं. राज्यांत कंटाळा आला म्हणून सद्गुरुचरणाजवळ आलों. पण चैन नाहीं. मनाला शांतता मुळींच नाहीं. उलट मी प्रपंचांत असतांनाच ह्यापेक्षां जास्त शांत होतों. युवराज पडल्याचें ऐकलें. म्हटलें आपल्याला ह्या प्रपंचाची ओढ कशाला ? म्हणून मी गांवांत गेलों नाहीं. युवराजाचा समाचार सुद्धां घेतला नाहीं, पण मनाचा ओढा सारखा

तिकडे. वाटतें,जावें, पहावा, भेटावें अशी मनाची स्थिति. राममूर्तीचें ध्यान करावें, तों पुढें राणी दिसते. पोथी वाचायला लागलों म्हणजे प्रजेचे विचार आठवतात. मन नेहमीं उदास. रात्रीं निद्रा नाहीं. स्वामीच्या संगतींतहि आतां पूर्वीप्रमाणें सुख वाटत नाहीं. मग माझ्या हातून संन्यास कसा घेववेल आणि देहाचें सार्थक कसें होईल.हे प्रभो! मी एक दीन बालक आहें. मला कांहीं सुचत नाहीं. प्रपंचावरची माझी आसक्ती अद्याप कमी होत नाहीं. बायकामुलांचे विचार अजून मला सोडित नाहींत,मग माझें पुढें कसें होईल? हे परमेश्वरा ! मृत्यूनंतर तूं मला कोठें ठेवशील ? मी काय करावें ? कसें वागलों तर मला सुख होईल ? युवराजाला भेटण्याची माझी इच्छा तर आज फार प्रबळ होत आहे तेव्हां आतां काय करूं ? ( विचार करितो. ) स्वामीकडे जावें आणि त्यांच्या आज्ञेनें अगर त्यांना घेऊन युवराजाच्या समाचारास जावें, ( जातो. )

---

## प्रवेश ४ था.

( बागेंत चन्द्रकान्त फिरतो आहे ).

**चं०**—( स्वगत ) आतां मला थोडं बरं वाटायला लागलं आहे, ह्मणून आज मला बागेंत हिंडण्याची परवानगी देण्यांत आली आहे. आतां एक दोन दिवसांत मला येथून जावं लागेल, असं काल सरस्वतीदेवी ह्मणाल्या. कारण आतां मी रोग्याच्या यादींतून निघणार. पण मला तें कससंच वाटतं आहे. कारण ही आजारीपणाची स्थिति मला फार सुखकर वाटत होती. त्यामुळं मला

आपण अजून आजारी आहों, असंच दाखवावसं वाटतं. मला आजारी पाडण्यांत सुद्धां ईश्वराचा कांहीं तरी अंतिम हेतु असावा. असें मला वाटतें. आणि तो हेतु म्हणजे मी आहे, ह्यापेक्षां मला जास्त सुखी करण्याचा. कारण मी पडलों ह्मणून येथें आलों. येथें मला आजारी–स्थितींत कितीतरी सुख होत होतं. जेव्हां जेव्हां कुमुद माझ्या जवळ येई, तेव्हां तेव्हां मला किती तरी आनंद होई म्हणून सांगूं. ती दुसरी परिचारिका सुद्धां माझी चाकरी काळजीपूर्वक करीत असे. तरी पण ताईसाहेबांची सर नाहीं. त्यांचा तो स्वाभाविक गोड स्वभाव, मृदुस्पर्श मला किती सुखकर वाटत होता ! पण जसं जसं माझं दुखणं कमी होत चाललं, तसं तसं त्यांचं येणं कमी होऊन दुसऱ्या बायका यावयास लागल्या. कारण असें कळलें कीं, असाध्य रोग्याशिवाय त्या कधीं दुसऱ्या जवळ बसत नाहींत. त्यांच्या मैत्रिणींच्या बोलण्यावरून कळलें कीं त्या जर दवाखान्यांत आल्या नाहींत तर सर्व रोग्यांना चैन पडत नाहीं. त्या रोज सगळीकडे हिंडतात. सर्वांचा समाचार घेतात. मुलांना उचलतात आणि मग घरीं जातात. खरेंच, ती एवढी शहाणी, विद्वान् आणि सुस्वरूप असून तिची ही वागणूक तिच्या गुणांना फारच खुलविते. ही मुलगी नुसती शिकलेली म्हणून मी ऐकलं होतं. पण लिहिण्यावाचण्याच्या शिक्षणाखेरीज दुसरे किती तरी अमूल्य गुण हिच्यांत भरले आहेत, ह्याची दुसऱ्यांना कल्पनाच नसावी असं वाटतं. खरोखर ही ज्या कोणाला मिळेल, तो धन्य असो. ( विचार करून ) पण मला येथें आणण्यांत ईश्वराचा कांहीं हेतु नसेलच, असं कोणी म्हणावं ? हिची माझी जन्माची गांठ

पडणार नसेल कशावरून ? आतां माझं वय किती आहे ? माझ्या वयाच्या मुलांची लग्नें होतात, ) पण माझं अद्याप राहिलं आहे त्यांत कदाचित् हाहि हेतु असावा. एखाद्या राजाची खुळी पोर गळ्यांत अडकवून घेण्यापेक्षां हें रत्न किती चांगलें ? आणि राजा मानसिंग म्हणजे आमच्या सारख्यांना पुरून उरणारे राजेच आहेत. राज्य म्हणून नाहीं इतकेंच, तेव्हां त्या बाबतींत कांहीं आई बाबा नाहीं म्हणणार नाहींत, पण बाबांचें हल्लींचें वेड मात्र ह्याला आडवें येईल. आधीं तिची खुषी आहे का, ह्याचा अदमास काढूं. तसें असल्यास मग बाकीची युक्ती करितां येईल. पण ती नाहीं म्हणाली, तर मग माझी आणि वेड्याची स्थिती एकच होणार. पण शंका कां ? त्या आल्याच. त्यांना विचारावं म्हणजे झालं.

कु०—( प्रवेश करून ) युवराज, आपण येथें फार वेळ फिरूं नये. तें आपल्याला सोसणार नाहीं. आपण थोडं क्रमा क्रमानं वाढवा.

चं०—होय, मला येथें येऊन थोडासा वेळ झाला खराच. पण मी आजच प्रथम बागेंत आल्यामुळं माझं मनहि येथें रमलं, आणि विचारांतही वेळ गेला म्हणून समजलें नाहीं.

कु०—आजारी माणसानं फार वेळ विचार करूं नये. त्यापासून मस्तकाला त्रास होतो.

चं०—पण वाईट विचार करूं नये ना ? आनंददायक विचार करायला हरकत नाहीं. आणि त्या विचारांत तुमचाहि संबंध होता.

कु०—माझा संबंध ? आणि तो कसा ?

चं०—हें पहा ताईसाहेब, माझ्या ह्या दुखण्यांत मी जो वांचलों, तो केवळ तुमच्या शुश्रूषेमुळं वांचलों, असं खुद्द तुमच्या स्त्री–डॉक्टरचें सुद्धां म्हणणं आहे.

कु०—अं:, त्यांत काय? पण आपण कीं नाहीं, माझ्या सारखीला ताईसाहेब ह्मणूं नये.

चं०—कां बरं?

कु०—कोणत्याही तऱ्हेनं तसं ह्मणून घेण्याचा माझा अधिकार नाहीं.

चं०—तें कसं?

कु०—आपण राजे आहां. आह्मी प्रजा. तेव्हां आपण नांवानंच हांक मारलेली बरी.

चं०—पण तसें करणें म्हणजे नेहमीची सर्वांची वहिवाट मोडल्याप्रमाणें होईल.

कु०—त्यांत वहिवाट कसली? ह्या आपल्या मुली कांहीं तरी ह्मणतात झालं.

चं०—मग एकेरी नांवानं हांक कोण मारतं?

कु०—तशी कोणाहि माणसाशीं अजून संघटनाची वेळ आली नाहीं. ज्यांच्याशीं आली आहे ती आपल्याला आमच्याहून जरा कमी लेखून मला मोठेपणा देतात.

चं०—तेव्हां अजून आपल्याहून मोठं असं कोणी आपल्याला भेटलं नाहीं?

कु०—तसं नव्हे. एक तर मोठं किंवा एक अगदीं आप्तपणातलं लागतं. म्हणजे तसं म्हणतां येतं. तेव्हां मोठ्याशीं असा पहिला प्रसंग आपल्याशींच पडला आहे.

चं०—होय पण जर मी ताईसाहेब म्हणायला नको असेल, तर तुम्हाला माझी एक अट कबूल करावी लागेल.

कु०—ती काय बरें ?

चं०—मला जवळचा आप्त करण्याची म्हणजे माझी धर्मपत्नी होण्याची.

कु०—काय मी हें काय ऐकतें आहे ?

चं०—युवराजाची पत्नी होण्याचें.

कु०—छे! आपल्याला अशक्त प्रकृतीमुळें मतिभ्रम झाला असावा.

चं०—नाहीं, ताईसाहेब मी चांगला शुद्धीवर आहे, माझ्या दुखण्यांत माझी केलेली शुश्रूषा मला चांगली आठवते आहे.

कु०—मग त्यांत काय ! आह्मी आमचे कर्तव्यच केलें, त्याच्या फेडीकरितां कां आपण हा उपाय शोधला !

चं०—नाहीं, तुमच्या उपकाराची फेड केव्हांच होणें नाहीं, पण त्या उपकारांत आणखी ह्या उपकाराची आपण भर घालावी अशी इच्छा आहे.

कु०—छे कांहीं तरीच. शिवाय आपण पुरुषांनीं हल्लीं जे नियम केले आहेत, ते आपण विसरलांत का ?

चं०—नाहीं. मला त्याचें चांगलें स्मरण आहे. पण मला ते नियम नको आहेत. कारण मला तुझ्याशिवाय आतां चैन पडणें शक्य नाहीं.

कु०—पण समजा तसं झालं तर आपल्या वडिलांचा आपल्यावर केवढा रोष होईल? आपण राज्याला मुकाल ह्याची काय वाट? शिवाय मी सरदारकन्या आहे. आपल्या सारख्यांला किती तरी राजकन्या सांगून येतील.

चं०—ह्या बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं. मला राज्याची मुळींच जरूरी नाहीं. मी कोठेंहि पोट भरीन. आतां राजकन्याबद्दल म्हणशील, तर एखादी मूर्ख आणि अडाणी अशी मुलगी निवळ राजकन्या म्हणून पत्करण्यापेक्षां तुम्ही मला सहस्रपटीनें आवडता.

कु०—शिवाय आपल्याला हेंहि लक्ष्यांत घ्यावें लागेल कीं, मी अलीकडच्या काळाप्रमाणें शिकलेली मुलगी आहें. तेव्हां जुन्या बायकापेक्षां आमच्यामध्यें स्वातंत्र्याचें आणि हक्काचें वारें बरेंच असणार.

चं०—बरं, आणखी कांहीं?

कु०—आणि हें सर्व झाल्यावर मग माझ्या मनाचा रुकार आणि वडिलांचें अनुमोदन.

चं०—आतां पहिल्याबद्दल म्हणाल तर मी सर्वस्वी तुमच्या स्वाधीन होतों, म्हणजे पराधीन करणार कोणी उरलेंच नाहीं. आतां आपल्या वडिलांचें अनुमोदन मी कसेंहि करून मिळवीन. पण आपलें स्वतःचें ठरविणें सर्वस्वी तुमच्या स्वाधीन आहे.

कु०—( विचार करित. )

चं०—कां ताईसाहेब, आतां मी तुम्हाला काय म्हणावयाचें हें ठरविणें सर्वस्वी तुमच्यावर अवलंबून राहिलें ना? बोला आतां ताईसाहेब म्हणूं, कां माझी कुमुद म्हणूं? बोला.

कु०—(विचारकरून) आपण हा एक मोठा बिकट प्रश्न माझ्यापुढें ठेविला आहे—आणि त्याचें उत्तर माझ्या तोंडून नाहीं, असें ऐकण्याची आपली इच्छा दिसते.

चं०—कां बरं ?

कु०—एक तर हा विचारहि कधीं माझ्या मनांत आला नव्हता.

चं०—पण आतां मी आणला ना ?

कु०—मी जी आपली शुश्रूषा केली, ती निर्हेतुक केली. त्याला माझ्या सर्व भगिनी हा हेतु लावतील.

चं०—मग आपल्या भगिनीमंडळाला आपल्याबद्दल बरीच खात्री आहे म्हणावयाची ! बरं, ह्या शिवाय आणखी ?

कु०—स्त्रियांच्या व एकंदर समाजाच्या उन्नतीबद्दल पुष्कळशीं कामें करावीं, असा माझा हेतु आहे.

चं०—येवढेंचना ? मग राज्ञी-युवराज्ञी-ह्या पदावरूनहि तीं करितां येतील.

कु०—पण येथें राहिलें तर तें पदना ? लग्न केल्यानंतर आपल्याला ह्या राज्यांत रहावयास मिळायचें नाहीं.

चं०—कां बरें ?

कु०—त्या स्वामीमुळें. कारण त्यानं आपल्या सर्वांच्या डोक्यांत हें खूळ असं कांहीं चमत्कारिक तऱ्हेनं घातलं आहे कीं, त्याच्यापुढें आपण आपली सारासारशक्ती पार विसरला, आणि देवतेप्रमाणें पूज्य अशा स्त्रियांना आपण नरकाच्या पाहिरीवर नेऊन ठेवल्यात. अशा तुम्हा पुरुषांचें वारं नको.

चं०—पण सहवास घ्याना ? अथवा आपला आम्हाला द्या. आमच्या हातून चूक झाली खरी. त्याची आम्ही क्षमा मागतों.

कु०—नुसत्या क्षमेनें काय होणार ? माझं म्हणणं जर आपल्याला खरोखरच पसंत पडलं असेल, तर लग्नाच्या आशेनें नाहीं पण न्यायाकरितां म्हणून आपण हा अन्याय दूर करण्याचा प्रयत्न करा.

चं०—एवढं सर्व करण्याबद्दल बक्षिस म्हणून जर आम्हाला आपला सहवास घडणार असेल तर; नाहीं तर काय फायदा ?

कु०—आत्मसमाधान. कोणचीहि न्यायाची गोष्ट केली म्हणजे एक प्रकारचं आत्मसमाधान मिळत असतं, आणि शिवाय ईश्वरी कृपा.

चं०—हें पहा कुमुद, तुझ्या सहवासाशिवाय आतां मला आत्मसमाधान नाहीं. तुझा शब्द माझ्या कानांत सारखा घुमतो. दुखणाईत स्थितींतला तुझा स्पर्श मला सारखा आठवतो. माझी ईश्वरी तूं. तुझी कृपा होते, असें कळल्याशिवाय मी कां व्यर्थ श्रम करावे ? (पुढें होऊन) तर मग सांग तूं मला नाहीं कां हो म्हणणार ? माझ्या आशा तूं नाहीं कां पूर्ण करणार, आणि तुला आवडणारें असें तुझें एकेरी नांव घेण्याचा अधिकार मला नाहीं कां देणार ?

कु०—ही जागा कोणची, हें स्थळ काय, येथें परोपकाराच्या कृत्यांच्या गोष्टी ऐवजी ह्या भलत्याच गोष्टी कोठें काढल्यात. एकेरी नांव घ्या म्हणण्यांत माझा कांहीं असा अर्थ नव्हता. चला, बराच वेळ येथें मोडला. शांता माझी वाट पाहील. आपणहि चलावंच. (जाते).

चं०—( स्वगत ) शेवटीं जरा ती रागावली असावीशी वाटते. पहावें काय होतें तें ( जातो. )

## प्रवेश ५ वा.

कु०—( प्रवेश करून स्वगत ) काय चमत्कार आहे. माझी कधीं कल्पना सुद्धां नव्हती कीं, अशा तऱ्हेनं लग्नाचा प्रश्न माझ्या-पुढं उभा राहील म्हणून, पण आज मला ह्या गोष्टीसंबंधीं विचार करणं भाग पडलं. युवराज ज्याप्रमाणें रूपानें सुरेख आहेत, त्याच-प्रमाणें त्यांचं बोलणं हि कसं गोड आहे, आणि माणसाच्या तोंडा-वरून जर अंतःकरणाची परीक्षा होत असेल, तर त्यांचं अंतःकरणहि तसंच शुद्ध आणि निर्मळ असावसं वाटतं. किती झालं तरी, ते राणीसाहेबांचेच चिरंजीवना ? मग ते त्यांच्यासारखेच पवित्र असणार, ह्यांत काय नवल ? बाकी खरंच, मी विचाराच्या भरांत कोठें चाललें ? जर असं झालं, तर माझ्या मैत्रिणी काय म्हणतील ? जनापवाद काय येईल? सगळे म्हणतील कीं, तरुण मुली जर मुलांच्या शेजारीं राहिल्या तर असें व्हावयाचेंच. शिवाय मीं हातीं घेतलेल्या कार्याची काय वाट ? बाकी लग्न झाल्यावर हीं कामें करितां येणार नाहींत, असें नाहीं. प्रजा ह्या नात्यानें मी माझ्या भगिनीकरितां जें करूं शकेन, त्यापेक्षां राज्ञी ह्या नात्यानें मी पुष्कळ सुधारणा करीन. माझ्या शिक्षणाचा उपयोग माझ्या प्रजेला देईन. आणि इतर राज्यामध्यें सुधारणेंत माझ्या राज्याचा नंबर वर लावीन. (चपापून) अगबाई ! इतक्यांत मी माझें

राज्य म्हणून सुद्धां म्हणायला लागलें ! ( हंसते ) बरं, शिवाय बायकांच्या संबंधानें केलेला अन्यायाचा ठराव महाराज कसा फिरवितील, हा एक प्रश्न आहेच; आणि तसें झाल्याशिवाय तर माझं लग्न होणं शक्य नाहीं. तें त्यांनीं कबूल केलें कीं, लग्न करण्याची संमति मला सहजच द्यावी लागेल. तर मीं काय करावें ? हे प्रभो, तूं मला साह्य हो. आणि ह्या सगळ्या जन्माच्या गोष्टीसंबंधीं मला नीट विचार करून योग्य तें उत्तर देण्यास धीर दे. आतां ही गोष्ट प्रथम सरलेकडून बाबांच्या कानावर घातली पाहिजे. बाकी बहुधा त्यांचेकडून कांहीं नकार मिळणार नाहीं; तेव्हां आपला काय तो निश्चय करण्याकरितां देवी सरस्वतीकडे जावें, म्हणजे त्या ह्यांत योग्य तो सल्ला देतील. ( जाते. )

---

## प्रवेश ६ वा.

( राजा आणि स्वामी सेवकासह येतात. दवाखान्याच्या दरवाजावर एक स्त्रीशिपाई पहारा करीत आहे. )

**से०**—हे महाराज स्वामीसह युवराजांच्या समाचाराला आले आहेत.

**स्त्री शि०**—पण कुमुदिनी ताईसाहेबांच्या परवान्याशिवाय कोणाही पुरुषाचा येथें प्रवेश होणें नाहीं.

**से०**—अग, हे महाराज आहेत.

शि०—आम्ही ताईसाहेबांचे शिपाई; मालकाशिवाय कोणालाहि ओळखित नाहीं.

से०—अग, हे ह्या प्रांताचे राजे आहेत. तुझ्या ह्या बोलण्याचा परिणाम चांगला होणार नाहीं.

शि०—ज्याला राज्य नाहीं ते राजे कसले, आणि आम्ही कोठें त्यांच्या हद्दींत आहों ? आणि असलों तरी, आम्ही आमची चिंता कां वाहावी. ज्याचा मालक न्यायी असून खबरदार आहे, त्याच्या नोकरानें आपण योग्य काम बजावल्याबद्दल मुळींच भय बाळगूं नये. जोंपर्यंत ताईसाहेबासारखा मालक आहे, तोंपर्यंत आमच्या केसासहीं धक्का लागायाचा नाहीं. हीं कांहीं पुरुष-राजधानी नव्हे, समजलात. तेव्हां जायचं असेल तर मुकाट्यानं ताईसाहेबांचा परवाना आणा.

रा०—अरे, तिच्याशीं कां तूं घासाघीस घालतोस ? ती काय, हुकुमाचा चाकर. चला आपण राजा मानसिंगाच्या वाड्यांत जाऊं.

( जातात. )

---

## प्रवेश ७ वा.

( युवराज खुर्चीवर बसला आहे; त्याच्या एका बाजूच्या कोंचावर राजा व स्वामी बसले आहेत; जवळ सरला परिचारिकेच्या पोषाखांत उभी आहे, असा पडदा उघडतो. )

यु०—महाराज आज तरी आपण माझ्या भेटीला आलात, हें पाहून मला फार संतोष होतो. ( सरला बाहेर जाते. )

रा०—युवराज, मी हळु हळु प्रपंचाचा त्याग करावयाचा विचार केला असल्यामुळें, ह्या मोहपाशांतून सुटणार होतों; पण शेवटीं मायेचा जय झाला! ( सरला येते. )

स०—युवराज, देवी, राणीसाहेब, ताईसाहेब व डॉक्तरीणबाई आल्या आहेत.

यु०—येऊं देत. महाराज, आज मा येथून राजवाड्यांत जाणार असल्यामुळें सर्व माझें स्वागत करण्याकरितां येत आहेत.

( सर्व येतात. )

( त्या येऊन बसतात तों राजा मानसिंग येतो, आणि मुजरा करून बसतो. प्रधान त्याचा सत्कार करतो. )

यु०—महाराज, ह्या सरलाबाई आणि ह्या कुमुदिनी ताईसाहेब ह्यांनीं माझी दुखण्यांत अतिशय व्यवस्था ठेविली, आणि ह्या ह्यांच्या गुरुजी देवी स्वरस्वती, ज्यांच्या कृपाप्रसादानें मी आज आपल्या दृष्टीस पडत आहें. जर देवींनीं मातोश्रींची विनंती मान्य केली नसती, तर मी येथें आलों नसतों; आणि माझी प्रकृतिहि इतक्या लवकर सुधरली नसती. उलट मी वांचलों असतो कीं नाहीं ह्याबद्दल शंकाच आहे.

रा०—तुला ज्यांनीं वरें केलें, त्यांचे माझ्यावरही एक प्रकारचे उपकारच आहेत. मानसिंगजी आम्ही आपल्या वाड्याकडे गेलों होतों.

मा०—होय सरकार. स्वामी वाड्याकडे आल्याचें कळलें. म्हणूनच मी बागेंतून घाईघाईनें आलों, तों आपण येथें आल्याचें

कळलें. तेव्हां आमच्या ताईसाहेबांचा परवाना आणवून मग मी येथें आलों.

रा०—वा! तुम्हालासुद्धां परवाना लागतो वाटतें!

मा०—होय. कारण जो नियम सर्वांना लागू. त्यांत मीच अपवाद कसा राहीन? पण मला वाटतें कीं, आपण युवराज येथें आल्यापासून आजच पहिल्यानें आला.

रा०—होय.

मा०—युवराजांची प्रकृति फार अत्यावस्थ होती, असें प्रधानजी म्हणाले.

प्र०—तें अगदीं खरें आहे.

राणी—आणि जर देवींनीं माझ्या विनंतीला मान दिला नसता, तर आज हे दिवस दिसले नसते.

प्र०—ह्याकामीं ह्या दवाखान्याच्या बायकांनीं आम्हाला कायमचें ऋणी करून ठेविलें आहे.

स० दे०—कांहीं नाहीं. ह्यांत आम्ही कांहींच केलं नाहीं. फक्त आम्ही आमचं कर्तव्य बजावलं. ज्या ईश्वराचीं आम्हीं लेंकरें आहों त्याच ईश्वराच्या दुसऱ्या लेंकरांची म्हणजे आमच्या भावंडांची काळजी घेणें, हें आमचें कर्तव्यच आहे, त्यांत जर कांहीं विशेष असल, तर तें मी केलं नसून आमच्या ह्या दोघी परिचारिकांनीं—विशेषत: आमच्या ताईसाहेबांनीं—केलें आहे. आमच्या सरलाबाई चांगल्या परिचारिका आहेत. पण आमच्या ताईसाहेबांच्या स्वाभाविक गुणांनीं त्यांच्या कामगिरींत जी भर पडते ती अपूर्वच आहे.

त्यांच्यासारखी परिचारिका मिळाली म्हणूनच युवराजाना लवकर गुण पडला. पण आपण आजपर्यंत समाचाराला कसे आला नाहीं, याचें मात्र आम्हाला नवल वाटतं.

रा०—देवी सरस्वती ह्याबद्दल मी तुमचा व तुमच्या दोन्ही परिचारिकांचा फार आभारी आहे, आणि तुम्हा सर्वांच्या बोलण्यावरून मला असें वाटतें कीं, ह्यांत सरलाबाईनीं आणि कुमुदिनीताईनीं फार श्रम घेतले आहेत. मानसिंगजी, अशा प्रकारची धन्यवाद देणारी कन्या तुम्हाला मिळाली, ह्यामुळें तुम्ही धन्य आहा.

मा०—महाराज आपल्यासारख्यांच्या कृपेनें हें माझें रत्न मला लाभलें आहे खरें, आणि तें मला पुत्रप्राप्तिपेक्षांहि जास्त आनंद देते.

वि०—शिव शिव, बायकांची स्तुती!

रा०—आणि आज ह्यामुळें त्यांच्या गुणाची माहिती होण्याचा योग आला, हें बरें झालें. ह्याच्या पूर्वींच मी यावयाचा, पण आतां हा संसारपाश सोडून संन्यास घेण्याचा माझा विचार असल्यामुळें मी ह्या पाशांत अडकूं नये, म्हणून बघत होतों, पण शेवटीं मायेनें आपलें जाळें टाकलेंच, आणि त्यांत मी गुरफाटलों. इतकेंच नव्हे तर स्वामीजींनाहि त्यांच्या इच्छेविरुद्ध युवराजाजवळ आणलें.

वि०—( स्वगत ) आणि मी तरी हा ह्या मायापाशांत कदाचित गुरफटेल, तर वेळींच सावध करून पर्णकुटीकडे न्यावा, म्हणून आलों.

स०दे०—पण आपल्याला सन्यास घेण्याचं काय कारण?

रा०—अहो ह्या नरदेहाचें सार्थक, हें लहान का कारण आहे?

**स० दे०**—पण तें प्रपंचांतहि होतें. मनाला पक्कें वैराग्य भिनल्याशिवाय अगर गृहस्थाश्रमाचीं कर्तव्यें पूर्ण झाल्याशिवाय संन्यास घेऊं नये, अशी शास्त्राची आज्ञा आहे.

**रा०**—पण प्रपंच म्हटला कीं, स्त्रियांशीं संबंध येतो, आणि स्त्रिया ह्या तर मोक्षाच्या आड येणाऱ्या कांटेरी जाळ्या आहेत.

**स०**—असं आपल्याला कोणी सांगितलं ?

**वि०**—मीं, मीं सांगितलें.

**स० देवी**—आपण असं रागावूं नका. पण आपण कशावरून म्हणतां ?

**वि०**—कशावरून म्हणजे? आजपर्यंतच्या आधारावरून म्हणतो.

**स० दे०**—(स्वगत) हा आवाज तर ऐकला असावासा वाटतो. (उघड) आजपर्यंत आपल्याला काय आधार सापडले कीं स्त्रिया कांटेरी जाळ्या आहेत म्हणून ?

**वि०**—इतकेंच नव्हें, तर स्त्रिया नरकाचें द्वार आहेत, असें खुद्द शास्त्रांत म्हटलें आहे.

**स० दे०**—पण त्याच शास्त्रांतून त्या देवता आहेत, असंहि म्हटलं आहे.

**वि०**—त्यांच्या अनर्थाच्या गोष्टी पुष्कळ आहेत. त्यांच्यापासून कधीं कोणाला सुख झालें नाहीं. त्या आपल्या मायाजालानें माणसाला ईश्वरी-सान्निध्यापासून दूर करितात म्हणून, साधुसंत त्यांची निंदा करितात, आणि त्यांच्यापासून दूर रहा म्हणतात. राजा शंतनु बायकोलाच भुलला, मोहिनीचा प्रताप रुक्मांगदाला भोवला,

शकुंतलावृत्तांत तर प्रसिद्धच आहे. सारांश, बायका म्हणजे आधी व्याधी आणि उपाधी आहेत. हेंच पहा, ह्या राजाला तुमच्यासारख्या सुरेख स्त्रिया दिसतांच तो आपली शपथ विसरून तुमच्याशीं बोलला त्याच्या संगतीला मी आल्यामुळें आज कित्येक वर्षांचा नेम मोडून मला बोलावें लागलें. संगती संगदोषेण.

स०दे०—आपण हीं एक बाजूचीं उदाहरणें सांगितलीं. पण ह्याहून उलट किती सांपडतील बरं? याज्ञवल्क्यानं वानप्रस्थाश्रमांत सुद्धां मैत्रेयीला बरोबर नेलं. मग तो कुठं परत आलेला ऐकला नाहीं? प्रत्यक्ष परमात्मा परमेश्वर. त्याच्या डोक्यावर गंगा बसली आहे, ती स्त्रीच आहे. रामाबरोबर सर्वस्वाचा त्याग करणारी सीता स्त्रीच होती, आपला पती, राज्य वगैरे परत मिळवून आणणारी सावित्री तीही स्त्रीच. पण त्यांनीं कोणीहि आपले पती अगर आप्तस्वकीय नरकांत नेल्याचं ऐकलं नाहीं. आतां त्यांच्या रूपाला मोहणारे तुम्ही पुरुष. त्याला त्यांनीं काय करावें? पण जे त्यांहूनहि श्रेष्ठ दर्जाचे होते, ते त्यांतूनहि तरले. ह्याचें प्रत्यक्ष उदाहरण आपण सांगितलेल्या शंतनूच्या मुलाचें, भीष्माचेंच-घ्या. शुकाला मोह पाडायला जेव्हां रंभा गेली, आणि तिनें आपल्या स्वरूपाचें वर्णन केलें, तेव्हां शुक काय म्हणाला, कीं तूं सुंदर आहेस, तशी जर माझी आई सुंदर असती, तर मीहि सुंदर झालों असतों. मला हें आधीं कळतें तर तुझ्या पोटीं जन्म घेतला असता. तेव्हां आम्हाला दोष देण्यापेक्षां आपण आपल्यालाच कां घेत नाहीं! ज्याची दृष्टीच दोषास्पद, त्याला कोरड्या वैराग्यानं काय होणार! आपण ज्या रंगाचा चष्मा लावावा तसें

दिसतं, आम्ही सुस्वरूप आहों, हें कदाचित् महाराजांच्या लक्षांतही नसेल, पण तें आपल्यासारख्या वैरागी मनुष्याच्या लक्षांत तोंड फिरविलं असूनहि आलं; आणि मी म्हणत्यें आम्ही सुंदर असलों म्हणून काय झालं ? ह्या जगांत अशा पुष्कळ सुंदर वस्तु आहेत, पण त्या सर्वांचा उपयोग अधिकाराप्रमाणें, योग्यतेप्रमाणेंच होतो. आपल्या बहिणी अगर लेकी सुरेख नसतात का ? आणि त्यांना तशा सुंदर पाहिल्या म्हणजे जसा पित्याला व बंधूला आनंद होतो, तसा तुम्हांसहि होऊं द्या, पण जर तसं होत नसेल, तर ह्या लटक्या वैराग्याच्या गोष्टी कशाला ? असं खोटं वैराग्य स्वीकारा, असं कोणच्याहि साधूनीं म्हटलें नाहीं.

**वि०**—तुम्ही जरी हीं उदाहरणें दाखविलींत तरी सुद्धां स्त्रियांपासून अनर्थ झाल्याचीं पुष्कळ उदाहरणें आहेत; आणि प्रपंचाचा लोभ सोडल्याशिवाय कधींहि परमार्थ साधत नाहीं. त्या परमार्थसाधण्याच्या बाबतींत बायका नेहमीं आडव्या येतात, म्हणूनच साधु म्हणतात,कीं बाबारे, प्रपंच सोडा आणि नरदेहाचें सार्थक करा.

**स० दे०**—पण आपण म्हणता तेच साधु असं म्हणतात कीं, पुरतें वैराग्य बाणल्याशिवाय प्रपंच सोडूं नका. तसंच बायका पोरं झालीं म्हणजे त्यांना टाकून वैराग्य घेऊं नका. तर उलट संत, शिरोमणी रामदास म्हणतातः—

**विवेकेंविण वैराग्य केलें । तरी अविवेकें अनर्थी घातलें ।**
**अवघें व्यर्थचि गेलें । दोहींकडे ॥**
**ना प्रपंच ना परमार्थ । अवघें जिणेंचि झालें व्यर्थ ।**
**अविवेकें अनर्थ । ऐसा केला ॥** दा० द० १२

वि०—अहो पण स्त्रीमुळें पुरुषांची स्थिति अशी होते:—

**स्त्रीकारणें सोडिली भक्ती । स्त्रीकारणें सोडिली विरक्ती ।**
**स्त्रीकारणें सायुज्य मुक्ती । तेहि तुच्छ मानिली ॥**

दा० द० ३-२-५६

आणि म्हणून प्रपंच सोडून ईश्वरभजनी लागल्याशिवाय मनुष्याला मोक्ष नाहीं. नाहींतर मग जन्ममृत्यूचे चौऱ्यांशी फेरे आहेतच.

**स० दे०**—पण त्याला युक्ती याहून सोपी आहे. ज्या बायकामुळें असें अनर्थ होतात, त्यांना तुम्ही ज्ञान द्या, म्हणजे जात्याच धार्मिक अशा आम्ही बायका तुम्हाला त्या कामांत मदत करूं, म्हणजे रामदासांनीं म्हटल्याप्रमाणें:—

**आधीं प्रपंच करावा नेटका ।**
**मग घ्यावें परमार्थ विवेका ॥**
**येथें आळस करूं नका ।**
**विवेकी हो ॥** दा० १२–१–१

( राजास ) महाराज तसंच रामदास पुढें म्हणतात:—

**प्रपंच सांडून परमार्थ कराल ।**
**तेणें तुम्ही कष्टी व्हाल ॥**
**प्रपंच परमार्थ चालवाल ।**
**तरी तुम्ही विवेकी ॥**

दा. १२–१–२

वि०—बाई, हा मार्ग अज्ञानी-जनाकारितां आहे. ज्ञान्यांना वैराग्यच योग्य आहे. ईश्वर-प्राप्तीचे मुख्य तीन मार्ग आहेत, आणि त्यांत ज्ञानमार्ग श्रेष्ठ आहे, म्हणून त्या मार्गानें राजाला नेण्याचा माझा उद्देश आहे. त्यांत आपण आपलें मोहिनीजाल टाकून आपल्या स्त्रीजातीच्या नांवाप्रमाणें कृती करूं नका.

स० दे०—पण ज्याला खरं ज्ञान झालं आहे, त्याला आमच्या सारख्यांचं भय कां वाटावं? जर ह्या राजाला खरी उपरती झाली होती तर त्याला मुलाच्या मायेनं कां ओढलं? मुलगा कोणाचा आणि बाप कुठला? त्याच्याशीं काय संबंध? ज्ञान्याला ह्या उपाधी तरी कशाला हव्या? पंचतत्वाचा देह त्यांत मिसळणार आणि आत्मतत्त्व तर निराळें राहणार. त्याला नातें ना गोतें. नातें देहाला असून आपल्यासारख्या ज्ञानी महात्म्यांच्या संगतींत राहणाऱ्या आपल्या शिष्याला मायेनं कां पछाडलं? आणि अशा ज्ञानी महात्म्याला ह्या देहाचं एवढं भय कां वाटतं? आपण जर ज्ञानी आहां तर ह्या देहावर आपली आसक्ती खास नसणार, आणि ह्या आत्मतत्त्वाला तर स्त्री-पुरुष भेदच नाहीं. मग आपल्यासारख्या ज्ञानी महात्म्यांनीं हें स्त्रीत्यागाचें पुरुषांचें बंड कां काढलें? जर आपण खरोखरच ज्ञानी असाल, व आपले शिष्य तसे करावयाची आपली इच्छा असेल, तर आपण आपल्या शिष्यांना नीट ज्ञान द्या; म्हणजे ह्या स्थूलदेहाचें बंड राहणार नाहीं, आणि लिंगदेहाला मुळीं भीतीच नाहीं. जर हें आपल्याला कबूल नसेल, तर आपलं शास्त्र काय आहे तें मला सांगा.

वि०—( विचार करतो ).

स० दे०—कां साधुजी विचार कशाला ? आपण ज्ञानी आहां, आपण जीवन्मुक्त आहां, मग आपण आमच्या सारख्यांना कां भिता. अहो महाराज, ज्ञानमार्ग जितका बोलायला सोपा आहे, तितका करण्याला नाहीं, म्हणून आपल्यांतील सर्वांत श्रेष्ठ असा धर्मग्रंथ जी गीता त्यांत म्हटलें आहे कीं:—

यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ॥

भ. अ. १८–४६

कारण ज्ञानमार्ग अवघड आहे पण कर्ममार्ग आणि भक्तिमार्ग हे सोपे आहेत. अशा मार्गाला माणसाला लावणें, हें आपल्यासारख्यांचं कर्तव्य आहे. मग योग्यतेप्रमाणं मनुष्य आपोआप वर जातो. कारण ही माया नुसती तरायला अवघड आहे. पण भक्तीनें तें साध्य होतें. कृष्ण म्हणतात.

दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ।
मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरंति ते ॥

भ. अ. ७–१४

तेव्हां आपल्यासारख्यांनीं ह्या काळांत हा असा भलता मार्ग सोडून योग्य मार्गानं लोकांना नेलं पाहिजे. नाहीं तर आरंभाला जरी कांहीं दिवस आपल्यासारख्यांचा जय झाला; तरी एकदां लोकांचा विश्वास उडाला, म्हणजे लोक आपल्याला विचारणार नाहींत. जरी ह्या महाराजांसारखे कांहीं राजे आपल्या वेडगळकल्पनांनीं भारले

गेले, तरी शेवटीं जय आम्हां स्त्रियांचाच होणार. कारण आम्ही स्त्रिया ह्या ईश्वराचीं आवडतीं लेंकरें आहों. आपण जरी आम्हांला टाकूं म्हटलें, तरी आम्ही आपण होऊन आपल्या पाया पडायला येऊं इच्छित नाहीं. आपल्यासारख्या अर्धज्ञानी माणसाच्या ताबेदारीपेक्षां आम्हाला हजारपटीनं स्वतंत्रता आवडते. पण आपल्या शिष्यवर्गाला असा भलताच उपदेश केल्यानें आपण मात्र ईश्वराचे खरे खरे गुन्हेगार व्हाल. स्त्री आणि पुरुष ही जोडी ईश्वरानेंच उत्पन्न केलेली आहे. तेव्हां ईश्वराच्या घरीं कांहीं त्यांच्यासंबंधीं कमीअधिकपणा नाहीं. त्यानें दोघांना सारखीच बुद्धी दिली आहे; सारखेच हक्क ठेविले आहेत. निसर्गानें उत्पन्न केलेल्या वस्तूंचा दोघांनाहि सारखाच उपभोग घेण्याचा अधिकार आहे, व एकमेकांच्या संगतीशिवाय दोघांचेंहि अडतें. नुसता चंद्रो-दय ज्याप्रमाणें माणसास आवडत नाहीं, त्याचप्रमाणें नुसत्या सूर्याच्या तेजानें आंगाची आग होईल. त्याला शांतता आणण्याकरितां चांदण्याची जरूरी आहे. त्याचप्रमाणें पुरुषांच्या राकट स्वभावाला कोमलत्व आणण्यासाठीं स्त्रियांची जरूरी आहे. त्यांच्या नैसर्गिक नाजुकतेचें रक्षण करणें पुरुषांकडे आहे. ह्मणून आपण निसर्गाचे नेम मोडून चालणार नाहीं. आणि ह्याचकरितां आपल्यासारख्या साधूंनीं हा असला उपदेश सोडावा आणि जनाला योग्यरीतीनें कर्ममार्ग सांगून भक्तिमार्गाला लावावें म्हणजे वेळ आली असतां ते आपोआप ज्ञानमार्गाला लागतील. शिवाय इतकेंहि करून ज्याला संसारबंधन नको असेल, तें तो पत्करणार नाहीं. पण त्याकरितं सक्ती कशाला ? मला स्वतःला जर यावज्जन्म ब्रम्हचर्यानें राहवसं

वाटलं, तर मी तशी राहीन. पण दुसऱ्यांनींही लग्न करूं नये, हा जुलूम कां ? ज्याच्या आंगांत प्रपंच करून परमार्थ साधण्याची योग्यता आहे, त्यांना तो करूं द्या. जे परमेश्वराला अजिबात विसरले असतील, त्यांना त्याची आठवण करा; पण अशा जुलमाच्या वैराग्यानें जगांत अनीति कशी वाढते, ह्याचं उदाहरण पाह्यचं असल्यास रात्रीं गांवांत संचारास निघा, आणि संप केलेल्या कसबिणींच्या मोहोल्यांत जाऊन रोज किती पुरुष येऊन जातात, ह्याची यादी मागा. ( राजास ) महाराज, आपल्याला हवें असल्यास आपण ह्या ब्रह्मचारी-सरदारांवर राज्य करा, हवें असल्यास आपल्या धर्मपत्नीशीं सुखानं नांदणाऱ्या प्रजेवर राज्य करा. मला सांगावयाचं तें मी सांगितलं.

चं०—देवी आपलें सर्व म्हणणें मी लक्ष्यपूर्वक ऐकलें, आणि त्यावरून वाटतें कीं, आपण ह्या लोकींच्या नसून स्वर्गलोकींच्या असाव्या. असो, आपल्या सांगण्याचा विचार करितां मला ह्या लटक्या वैराग्यापेक्षां कर्ममार्गच अधिक पसंत आहे. त्याकरितां मी गृहस्थाश्रमी होणार. तेव्हां महाराजांची खुषी असल्यास त्यांनीं मला राज्य द्यावें; अगर देऊं नये. बायकासंबंधी केलेला अन्यायाचा कायदा मला मुळींच मान्य नाहीं.

मा०—मंला पहिल्यापासूनच नव्हता.

प्र०—एकंदरीनें विचार करितां मला युवराजांचें म्हणणें अधिक योग्य वाटतें.

वि०—एकंदरींत आपण सर्व ह्या स्त्रीला भुललात ! राजा, तुझं तरी काय मत आहे ? बोल बोल लवकर बोल.

रा०--महाराज, इतका वेळ देवींनीं विचारलेल्या प्रश्नांना उत्तर कां नाहीं दिलें ?

स० दे०—उत्तर काय देणार ? आमच्या ह्या भरतभूमीच्या दुर्दैवानं तिच्या पोटीं हीं अशीं विद्वान् पण हट्टी व एककल्ली माणसं जन्माला येतात, आणि त्यामुळें—त्या त्यांच्या विद्वत्तेमुळें—घरांत, बाहेर, देशांत, सर्वत्र नानामतें होऊन देशांत दुफळी व कलह वाढ-तात. त्या सर्वांचें पाप ह्यांच्यासारख्या विद्वानांच्या डोक्यावर पडतें.

वि०—काय? काय? पुन्हा बोल. आमच्यासारख्याच्यामुळें देशाचा नाश होतो ?

स० दे०—हो होतो. फार लांब नको जावयास. आपण ह्या राज्यांत हे जे खेळ केलेत, त्यानें कितीकांना काय काय त्रास झाला ह्याची जरा चवकशी करा बरं ! तिजोरीचं उत्पन्न कमी झालं, व्यापार मंदावला, पोरं तरफडलीं, कित्येक आई आणि बाप दोघांच्या अभावीं मृत्युमुखीं पडलीं. अशा एक ना दोन हजारों गोष्टी झाल्या. इतकेंच नव्हे तर, जर ह्या भगिनीमंडळानें मदत केली नसती, तर ह्या राजाला पुत्रशोकाची वेळ आली होती. आणि तसं झालं असतं तर त्याच्या पाठीमागं राजा व राणी मरणपंथाला लागती. वारसाच्याक-रितां राज्यांत लढाई सुरू होऊन रक्तपात होता. असे अनेक तोटे आहेत. आतां तुम्ही आपले फायदे सांगा.

वि०—(विचार करितो.) (स्वगत) हिला काय बरें उत्तर द्यावें ?

स० दे०—आपला ईश्वरी मार्ग कुठें तो मला दाखवाल कां ?

वि०--बाई, तुझ्यापुढें मला बोलतां येत नाहीं, व ही मंडळी तर तुझ्या गोड बोलण्याला भुलणारसें दिसतें. तेव्हां मी आपला रानांत तपश्चर्येला निघून जातों.

रा०--महाराज, जरा ऐका.

स० दे०--हां थांबा, जातां कोठें? एक तर आपण केलेली गोष्ट अन्यायाची आहे, असें कबूल करून सर्व स्त्रीजातीच्या केलेल्या अपमानाबद्दल क्षमा मागा; नाहीं तर उत्तर द्या.

वि०--( विचार करितो. ) स्वगत-काय बरें उत्तर द्यावें? हिनें म्हटलेल्या कांहीं कांहीं गोष्टी प्रत्ययाला आल्या खऱ्या, पण तसें म्हणून उपयोग नाहीं.

कु०--देवी कदाचित् आपल्या बोलण्यानें मोह पडेल म्हणून ते गप्प बसले आहेत.

राणी--पण देवी कुमारिका रहावयाच्या असल्यानें मोह पडला तरी त्या लग्नाची मागणी घालतील अशी भीति नको.

स० दे०--बरोबर आहे. कारण लग्न पुन्हा लागत नसतें.

राणी--म्हणजे?

स० दे०--तें आतांच समजेल.

वि०--हें पहा आमचीं कामें जरी दाखवितां आलीं नाहींत, तरी तीं ईश्वराकडे रुजू होतात आणि मनाची उन्नती करितात.

स० दे०--कशी? बारा बारा वर्षें तपश्चर्या केली, तरी बायका सुरेख आहेत कां कुरूप आहेत, हें ओळखण्याची?

वि०—अहो, तें नेत्रांचें काम त्यांनीं केलें आणि तें मुद्दां पावलावरून सहज मी तर्कानें बोललों. कारण मला कोणाहि स्त्रीचें मुख पहावयाचें नाहीं. (स्वगत) मात्र इतकी ही विद्वान् स्त्री कोण असावी, तें पहाण्याची इच्छा झाली आहे; पण हुं खबरदार डोळ्यांनीं पहाल तर?

स० दे०—काय स्वस्त्रीचें सुद्धा? महाराज माझ्याकडे पहा आणि मी कोण आहे तें ओळखा. हल्लींच्या आपल्या वेषाला आपलं दोघांचं कांहींच नातें नाहीं; पण पूर्वाश्रमीची मी आपली धर्मपत्नी आहे.

वि०—(आश्चर्यानें तिच्याकडे तोंड करून) कोण? सरस्वती! माझी पत्नी! जिचा मी त्याग केला तीच तूं?

स० दे०—होय तीच मी.

(सर्व आश्चर्यचकित होतात.)

राणी—देवी, मग आपली खरी हकीकत काय आहे?

कु०—आपलं लग्न कधीं झालं होतं?

स० दे०—मी सांगितलेली सर्व हकीकत खरी आहे. फक्त लग्नाची गोष्ट मी मुद्दाम गाळली होती, ती आतां आपल्याला कळलीच. माझं लग्न होतांच स्वारी पळाली. मग मी विद्या केली आणि येथें आलें, तों येथें हि स्वारी नांव बदलून होतीच; पण समक्ष कधीं गांठ पडली नसल्यामुळें मला ओळखतां आलं नाहीं.

स०—आतां आपण कसं ओळखलं?

स० दे०—मला मघ्राशीच संशय आला; पण शेवटीं हाताच्या बोटाच्या खुणेवरून ओळखलं. त्यांच्या उजव्या हाताला सहा बोटें आहेत.

राजा—सरस्वती देवी, आज तुम्ही माझे चांगले डोळे उघडलेत आणि मला शुद्धीवर आणलेत; आणि माझ्या प्रजेवर व विशेषतः माझ्या राणीसंबंधीं मी जो अन्याय केला होता त्यांतून तुम्ही मला वांचवलेत, ह्याबद्दल आपले उपकार कोणत्या शब्दांत मानूं, तें मला सुचत नाहीं. ( राणीकडे पाहून ) ह्या अन्यायाच्या बद्दल मी राणीची क्षमा मागतों, आणि ती आपण करवाल अशी आशा आहे.

स०—महाराज, क्षमा हें आर्यस्त्रियांचं ब्रीद आहे. त्या ती आपल्या आपणच करतात.

राणी—दासीची कोठें क्षमा मागितली आहे काय? पण जर आपण प्रसन्न असाल तर माझं एक मागणं आहे?

राजा—काय तें बोल. अशा ह्या आनंदाच्या प्रसंगीं माझ्या हातून तुला काय मिळणार नाहीं?

राणी—ह्या बायकांनीं युवराजाचे प्राण वांचविले आहेत; इतकेंच नव्हें तर आपला नेहमींचा सहवासहि त्यांच्याच कृपाप्रसादानें मिळाला आहे. कारण जर सरस्वतीदेवी सारखी पंडिता आज येथें नसती तर आपल्या डोळ्यावरचें पटल कधीं दूर झालें असतें कोण जाणे? तरीं त्यांना कांहीं तरी देऊन आपण अंशतः त्यांच्या उपकाराचे उतराई व्हावें अशी माझी इच्छा आहे.

**राजा**—मग काय द्यावें, असें तुम्हाला वाटतें? युवराज, तुझी काय इच्छा आहे?

( युवराज लज्जेनें देवीकडे बघतो. )

**राणी**—देवी, सांगा मी तुमचें काय प्रिय करूं?

**स० दे०**—ह्या संस्थेला आपण आपली म्हणावी, एवढीच आमची इच्छा आहे?

**राणी**—ही संस्था आमची तर आहेच, पण ह्या गोष्टीचें नेहमीं स्मरण राहणारी अशी कोणची गोष्ट करितां येईल?

**यु०**—ती करणें राजे मानसिंगजींच्या अनुमतीवर आणि आपल्या उभयतांच्या इच्छेवर अवलंबून आहे.

**राजा**— म्हणजे?

**स० दे०**—म्हणजे ह्या संस्थेच्या अधिष्ठात्रीच्या ऋणांतून मुक्त होण्याची युवराजांची इच्छा आहे.

**राणी**—कुमुदताईला कांहीं विशेष बक्षिस द्यावें, असें कां तुला वाटतें? तर मग कुमुदताई तुम्हाला हवें तें सांगा.

**राजा**—मी तें मोठ्या खुषीनें देईन.

**यु०**—सरकार राजे लोकांचं वचन बदलंत नसतं.

**प्र०**—होय त्याची सरकारला चांगली जाणीव आहे.

**सरला**—ताईसाहेबांचा सहवास आपल्या सर्वांना नेहमीं मिळावा, अशी युवराजांची इच्छा आहे; आणि त्याला बाबासाहेब अनुमोदन देतील अशी आशा आहे.

यु०—आणि जिनें माझे प्राण वांचविले तिचा सहवास मला अक्षयीचा देऊन आपण त्यांच्या उपकाराची माझ्या हातून थोडी तरी फेड करवाल अशी विनंति आहे.

राणी—काय ? कुमुदिनी माझी सून ? बाबासाहेब, देवी, ह्या गोष्टीला आपली अनुमति आहे कां ?

दे०—महाराणी, आमच्या ताईसाहेबांसारखें रत्न आपल्या हातांत दिल्यानें आमच्या संस्थेची केवढी हानी होणार, हें तर आम्हाला दिसतेंच आहे. पण पुढें अशा पुष्कळ ताईसाहेब उत्पन्न व्हाव्या ह्या आशेनें आम्ही ही हानी सोशीत आहों; आणि त्याला बाबासाहेबांची अनुमती मिळेल अशी आशा आहे.

मान०—जी गोष्ट राणीसाहेबांना आणि महाराजांना पसंत आहे आणि ज्यांत देवीची अनुमति आहे त्या गोष्टीस खुद्द कुमुदची हरकत नसल्यास आपण नाहीं कशाला म्हणा ? खरं ना प्रधानजी !

प्र०—हो. कारण हा जोडा अनुरूपच आहे.

कु०—बाबा, आजपर्यंत दरेक गोष्टींत माझे लाड पुरविलेत आणि मीहि आपले आज्ञेबाहेर गेलें नाहीं. मग आतांच तसं कसं होईल ?

राजा—अशी सून मिळाली असतां कोण आपल्याला धन्य मानणार नाहीं ? मानसिंगजी, या आपण ह्यांचे हात एकमेकांचे हातांत घालूं.

मा०—माझी तयारी आहे. वृद्धपणीं आणखी कोणचें सुख पाहिजे ! आजपर्यंत वाढविल्याचें सार्थक झालें.

वि०—सरस्वती, माझ्या दुराग्रहानें जे एकंदर घोटाळे आणि नुकसान झालें असते त्यांचा शेवट तुझ्या चातुर्यानें असा गोड झाला हें पाहून आनंद होतो. मीं संन्यासदीक्षा घेतली असल्यामुळें मला आतां गृहस्थाश्रम स्वीकरतां येणें शक्य नाहीं. तरी झाल्या गोष्टीचें प्रायश्चित्त म्हणून मी तुझ्या कार्यांत तुला यश मिळण्याकरितां तपश्चर्येला आरंभ करितों.

स० दे०—आपला गैरसमज दूर झालेला पाहून मला फार आनंद झाला. मला ह्या लहानशा संसाराची आतां मुळींच आसक्ती नाहीं. जग हा माझा संसार आणि ईश्वराचीं मुलें तीं माझींच मुलें आहेत. त्यांच्या संबंधाच्या कामांत मला जेव्हां जेव्हां गरज लागेल तेव्हां ती मी आपल्यापाशीं मागेन. कारण आपण स्थूलदेहानें निराळे असलों तरी सूक्ष्म देहानें एकच आहों. असो युवराज, आपण उभयतांहि परस्परांच्या सहवासानें सुखी व्हा असा माझा तुम्हांला आशीर्वाद आहे. आणि आपण दोघेंही जर बरोबरीचीं आहों असं धरून चाललां तर हक्काचा आणि श्रेष्ठ कनिष्ठाचा प्रश्न कधींही उत्पन्न होणार नाहीं. स्त्री आणि पुरुष हीं दोघेही ईश्वराला सारखींच प्रिय आहेत. पुरुष आणि प्रकृती ह्यांत जितका भेद तितका स्त्री–पुरुषांमध्यें आहे, बाकी दोघंहि बरोबरीचींच.

युव०—देवी, आपलें सांगणें लक्ष्यांत ठेवीन आणि आजपासून बायकांसंबंधानें होणारे अन्याय ताबडतोब दूर करीन.

स० दे० व वि० —आपला सदा विजय असो.

समाप्त.